# प्रथम वर्ष कला

# अभ्यासपत्रिका क्र. १

# सूक्ष्म अर्थशास्त्र

# सत्र - १

# विषय कोड : UBA 1.35

(शैक्षणिक वर्ष २०१९ - २० पासून IDOL विद्यार्थ्यांसाठी लागू)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. राजश्री पंडीत**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. मनिषा सामंत**
ओम विद्यालंकार संस्थेचे अस्मिता महाविद्यालय,
विक्रोळी, मुंबई - ४०००८३

: **डॉ. मुक्ता पोटे**
एस. के. सोमैया कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,
विद्याविहार, मुंबई - ४०००७७

: **प्रा. सोनाली राजपूत**
एस. के. सोमैया कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय,
विद्याविहार, मुंबई - ४०००७७

**डिसेंबर २०२०, प्रथम वर्ष कला, अभ्यासपत्रिका क्र. १, सूक्ष्म अर्थशास्त्र**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र - १** | |
| | **प्रकरण - १ अर्थशास्त्राची दहा तत्त्वे** | |
| १) | अर्थशास्त्राची तत्वे भाग - १ | ०१ |
| २) | अर्थशास्त्राची तत्वे भाग - २ | ११ |
| | **प्रकरण - २ अर्थशास्त्र व त्याच्या पद्धती** | |
| ३) | अर्थशास्त्र आणि त्याच्या पद्धती | २६ |
| ४) | अर्थशास्त्रीय विश्लेषणाची साधने | ४५ |
| | **प्रकरण - ३ बाजारपेठ, मागणी व पुरवठा** | |
| ५) | बाजारपेठा, मागणी, पुरवठा व बाजार समतोल | ५७ |
| ६) | मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता | ७४ |
| | **प्रकरण - ४ परस्परावलंबित्व आणि व्यापार** | |
| ७) | परस्परावलंबित्व आणि व्यापार | ८६ |
| ८) | व्यापारापासून लाभ व व्यापार धोरण | ९६ |


❖❖❖❖

## प्रथम वर्ष कला, अभ्यासपत्रिका क्र. १
## अर्थशास्त्र अभ्यासक्रम
## (शैक्षणिक वर्ष २०१९ - २० पासून आयडॉलच्या विद्यार्थ्यांसाठी लागू)

### सत्र १
### सूक्ष्म अर्थशास्त्र

**प्रकरण १ अर्थशास्त्राची दहा तत्वे**

व्यक्तींना भेडसावणारे परिणाम वाटप - निर्णय प्रक्रियेमधील संधी खर्चाचे महत्त्व - सीमांत तत्त्व - प्रलोभनास प्रतिसाद - विनिमयापासून लाभ - बाजारामार्फत आर्थिक व्यवहाराचे संघटन व लाभ - बाजार यंत्रणेत सरकारची भूमिका - रहाणीमानाचा दर्जा व उत्पादन - चलन संस्थेतील वाढ व स्फिती - स्फिती व बेरोजगारी यातील परिणाम वाटप.

**प्रकरण २ अर्थशास्त्र व त्याच्या पद्धती**

वैज्ञानिक पद्धत - गृहितकांची भूमिका - आर्थिक प्रतिमाने : उत्पन्नाची चक्राकार प्रवाह व उत्पादन शक्यता वक्र - सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र - वास्तववादी अर्थशास्त्र व आदर्शवादी अर्थशास्त्र - अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद होण्याची कारणे - आलेखाची मूलतत्वे (एकचलीय आलेख, द्वीचलीय आलेख, वक्र, उतार - कारणे व परिणाम) फलन

**प्रकरण ३ बाजारपेठ, मागणी व पुरवठा**

बाजारपेठ म्हणजे काय? - स्पर्धा म्हणजे काय - मागणी वक्र : बाजार मागणी विरुद्ध वैयक्तिक मागणी - मागणी वक्रावरील हालचाली - मागणी वक्रातील अंतरण, पुरवठा वक्र : बाजार पुरवठा आणि वैयक्तिक पुरवठा - पुरवठा वक्रातील अंतरण - बाजार समतोल - बाजार समतोलातील बदलाचे विश्लेषण करण्याचे तीन टप्पे - वस्तुची कमाल व किमान किंमत - कर व त्याचे परिणाम - मागणीची किंमत सापेक्ष लवचिकता - एकूण प्राप्ती आणि मागणीतील लवचिकता - किंमतीच्या लवचिकतेचा प्राप्तीवर होणारा परिणाम

**प्रकरण ४ परस्परावलंबित्व आणि व्यापार**

विशेषीकरण आणि व्यापार - निरपेक्ष लाभाचा अर्थ - संधी त्याग खर्च आणि तुलनात्मक खर्च लाभ - तुलनात्मक लाभ व व्यापार - व्यापारापासूनचे लाभ - आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च लाभाचे उपयोजन - व्यापार धोरण : मुक्त व्यापार व संरक्षण व्यापार.

❖❖❖❖

मॉड्यूल १

# घटक - १

# अर्थशास्त्राची तत्वे
# (PRINCIPLES OF ECONOMICS)

**घटक रचना :**


१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ व्यक्तिना भेडसावणारे परिणाम वाटप
१.३ निर्णय प्रक्रियेतील संधी खर्चाचे महत्त्व
१.४ विवेकी व्यक्ति आणि सिमान्त लाभ
१.५ प्रलोभनास प्रतिसाद
१.६ समारोप
१.७ सरावासाठी प्रश्न


## १.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- अर्थशास्त्रातील मूलभूत तत्वाचा अभ्यास करणे.
- व्यक्ती परस्परविरोधी तत्वांचा सामना कसा करतात हे समजावून घेणे.
- संधी खर्च निर्णयावर कसा परिणाम करतो ते अभ्यासणे.
- सिमांत लाभ तत्वाचा अभ्यास करणे.
- व्यक्ति प्रलोभनास कसा प्रतिसाद देतात हे समजावून घेणे.

## १.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

इतर सामाजिक शास्त्राप्रमाणेच अर्थशास्त्र हे सुद्धा एक मान्यता पावलेले सामाजिक शास्त्र आहे. समाजाच्या आर्थिक व्यवहारांचा विश्लेषणासाठी अर्थशास्त्राचा वापर महत्त्वाचा आहे. मानवाच्या गरजा अमर्याद आहेत. परंतू त्या गरजा पूर्ण करण्यासाठी असलेली भूमी, नैसर्गिक साधनसंपत्ती, कच्चामाल, भांडवलीसाधने वगैरे उत्पादन साधनसामुग्री दुर्मिळ व मर्यादित आहे. मर्यादित साधनसामुग्रीचा प्रश्न व्यक्तिपुरताच मर्यादित नाही तर एकूण समाजाच्या दृष्टीने तो महत्त्वाचा प्रश्न आहे. दुर्मिळ साधनसामुग्रीचा महत्तम समाधान मिळविण्याच्या दृष्टीने कसा वापर करायचा असा प्रश्न निर्माण होतो. यालाच आर्थिक प्रश्न म्हणतात. साधनसामुग्रीच्या दुर्मिळतेतून

विविध मूलभूत आर्थिक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची अर्थव्यवस्थेला सोडवणूक करायची असते. उदा. कोणत्या वस्तूचे उत्पादन करावे? उत्पादन कसे करावे? उत्पादन कोणासाठी करावे? दुर्मिळ साधनसंपत्ती वापर पुर्णपणे केला जातो ना? साधनसंपत्तीचा अपव्यय होत नाही ना? असे प्रश्न अर्थव्यवस्थेपुढे असतात. अर्थव्यवस्थेला हे मुलभूत आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

साधनसंपत्ती मर्यादित असल्याने लोकांना हव्या असणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन करणे अशक्य असते. आणि म्हणूनच दुर्मिळ साधनसामुग्रीचे व्यवस्थापन कसे होते याचा अभ्यास अर्थशास्त्र करते. समाज व्यवस्थेमध्ये साधनसामुग्रीचे वाटप कुटूंब आणि संस्थाच्या सामुहिक कृतीतून होत असते. म्हणून लोक निर्णय कसा घेतात? परस्परांशी संवाद कसा साधतात? प्रलोभनास प्रतिसाद कसा देतात? बाजार यंत्रणेत सरकारची भूमिका काय असते? बाजारयंत्रणे मार्फत आर्थिक व्यवहाराचे संघटन कसे होते. समग्र अर्थव्यवस्था कशी कार्य करते? बाजारव्यवस्थेत किंमती कशा निश्चित होतात? याचा अभ्यास अर्थतज्ञ करीत असतात.

अर्थशास्त्र ही मानव्य विद्येतील एक महत्त्वाची ज्ञानशाखा आहे. अर्थशास्त्रातील मूलभूत तत्वे समजून घेतल्याशिवाय संबंधित अर्थशास्त्रीय योजना तयार करणे शक्य होणार नाही. जर अर्थशास्त्रीय योजना चुकीच्या असतील तर लोकांना मोठ्या संकटाना तोंड द्यावे लागेल म्हणून या प्रकरणात आपण अर्थशास्त्राच्या मूलभूत दहा तत्वापैकी चार तत्वाचा अभ्यास करणार आहोत. ही तत्वे लोक निर्णय कसे घेतात? म्हणजेच अर्थव्यवस्थेतील व्यक्तीगत निर्णय प्रक्रियेशी ही तत्वे संबंधीत आहेत. ही तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

तत्व १ व्यक्तीना भेडसावणारे परिणाम वाटप / सममूल्यन, व्यापरबंदी.
तत्व २ निर्णय प्रक्रियेतील संधी खर्चाचे महत्त्व.
तत्व ३ विवेकी व्यक्ती सिमांत तत्वाचा विचार करतात.
तत्व ४ लोक प्रलोभनास प्रतिसाद देतात.

## १.२ व्यक्तिना भेडसावणारे परिणाम वाटप (TRADE OFFS FACED BY INDIVIDUALS)

### तत्व १ व्यक्तीना भेडसावणारे परिणाम वाटप / सममूल्यन, व्यापरबंदी / परस्पर विरोधी तत्व

### Principle 1 - Trade offs Faced by Individuals.

दैनंदिन जीवनात व्यक्तिला अनेक प्रकारच्या परिणाम वाटपाच्या समस्येला सामोरे जावे लागते. म्हणजेच सामान्यपणे आपणाला आवडणारी वस्तू मिळविण्यासाठी आपल्याकडील दुसरी वस्तू द्यावी लागते. यालाच अर्थशास्त्रात सममूल्यन म्हणतात. एखादी गोष्ट मिळविण्यासाठी आपल्याला दुसऱ्या एखाद्या वस्तूचा त्याग करावा लागतो. या वस्तूस्थितीला अर्थशास्त्रात व्यापारबंदी परस्पर विरोधी तत्व असे म्हणतात.

दैनंदिन जीवनात आपण अनेक प्रकारच्या परिणाम वाटपाला सामोरे जातो. उदा. तुम्ही अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी तुमचा वेळ खर्च केला तर तुम्हाला क्रिकेट मॅच खेळता येणार

नाही. म्हणजेच एक गोष्ट शक्य झाली तर दुसरी साध्य होत नाही. क्रिकेट मॅच खेळल्याने तुम्हाला मानसिक समाधान मिळेल. पण अभ्यास न केल्याने नुकसान होईल कारण अध्ययन करण्यात अडथळे येतील. थोडक्यात एकात वाढ झाली असता दुसऱ्यात घट हाते.

समजा कुटूंबाचे उत्पन्न कसे खर्च करायचे असा निर्णय कुटूंबप्रमुखाला घ्यायचा आहे. समजा त्याने दैनंदिन गरजा अन्न, वस्त्र, निवारा या खर्चाबरोबर कार खरेदी करायची ठरवली तर भविष्यासाठी बचत करता येणार नाही आणि मुलांच्या उच्च शिक्षणावर पैसा खर्च करता येणार नाही. म्हणजेच एका वस्तूवर जास्त पैसे खर्च केले तर दुसऱ्या वस्तूवर कमी खर्च करावे लागतील. साधने मर्यादित आणि पर्यायी उपयोगाची असतात. त्यामुळे त्या साधनांचा वापर एका पर्यायासाठी केल्यास दुसऱ्या पर्यायासाठी त्याचा त्याग करावा लागतो. तुम्ही जर पिक्चर बघायचा ठरवला तर तुम्हाला अभ्यास करता येणार नाही, संध्याकाळी तुम्ही रोज एक तास फेरफटका मारण्यास जाता पण एक दिवशी त्याचवेळी टी.व्ही. पहाण्याचे ठरवले तर फेरफटका मारता येणार नाही. म्हणजेच परिणाम वाटपाची समस्या निर्माण होते.

अर्थव्यवस्थेचा विचार करता वेगवेगळ्या परिणाम वाटपाला तोंड द्यावे लागते. उदा. सरकारने पैसा नॅशनल पार्कसाठी खर्च करावा कि समाजाच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी खर्च करावा हा निर्णय सरकारला घ्यावा लागतो. कारण नॅशनल पार्कवर जास्त पैसा खर्च केला तर समाजाच्या जीवनावश्यक गरजांवर कमी पैसा खर्च होईल.

सरकारने युद्धसाहित्यावर जास्त खर्च केला तर अन्न धान्यावर कमी खर्च करावा लागेल. युद्धसाहित्यावर कमी खर्च केला तर देशाच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होईल आणि जीवनावश्यक वस्तूवर कमी खर्च केला तर लोकांचा रहाणीमानाचा दर्जा खालावेल. म्हणजेच देशाच्या संरक्षणासाठी युद्धसाहित्यावरील खर्च आवश्यक आहे. तर रहाणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी अन्नधान्यावरील खर्च आवश्यक आहे. म्हणजेच परिणाम वाटपाची समस्या निर्माण होते.

समाजव्यवस्थेला आणखी एका परिणाम वाटप समस्येला तोंड द्यावे लागते आणि ती म्हणजे कार्यक्षमता आणि समता होय.

**कार्यक्षमता** - कार्यक्षमता म्हणजे दुर्मिळ साधनसंपत्तीच्या सहाय्याने महत्तम समाधान प्राप्त करणे.

**समता** - समता म्हणजे उपलब्ध साधनसंपत्तीचे समाजामध्ये समान वाटप करणे होय.

देशाच्या सरकारला दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी कल्याणकारी योजना सुरु करायच्या आहेत. यासाठी सरकार श्रीमंतावर प्रत्यक्ष कर आकारते आणि मिळणाऱ्या महसूलाचा वापर गरीबांच्या कल्याणासाठी करते. यावेळी परिणाम वाटपाची समस्या निर्माण होते. कारण श्रीमंतावर कर आकारल्यामुळे श्रीमंताचे उत्पन्न घटते. त्यामुळे त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. परंतू यासाठी सरकार गरिबाचे कल्याण साधण्याकडे दुर्लक्ष करु शकणार नाही. कारण समाजामध्ये त्याचवेळी चांगले निर्णय घेता येतात कि जेव्हा त्याच्याकडे इतर अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

आधुनिक समाजव्यवस्थेत स्वच्छ पर्यावरण आणि औद्योगिकरण यात परिणाम वाटप दिसून येते. प्रदूषण होऊ नये, पर्यावरण स्वच्छ रहावे यासाठी उद्योग शहरात स्थापन करण्यावर बंधने येतात परंतू त्यामुळे उत्पादन, उत्पन्न, रोजगार यात घट घडून येते.

अशाप्रकारे व्यक्ति समाज, आणि अर्थव्यवस्था या सर्वानांच परिणाम वाटपाच्या समस्येला तोंड द्यावे लागते.

**कृती** - तुमच्या रोजच्या जीवनातील व्यापारबंदी / परस्परविरोधी तत्वे सांगा.

**उदाहरण :**

१) अमीतने मोबाईल खरेदी करायचा ठरवला तर त्याला बूट खरेदी करता येणार नाहीत.

२) तुम्ही संध्याकाळी बागेत फिरायला गेलात तर तुम्हाला त्याचवेळी अभ्यास करता येणार नाही.

३) धर्मशाळामध्ये रहाणाऱ्या साधूचा भौतिक जगाशी काहीही संबंध नसतो. ते आपला सर्व वेळ अध्यात्मिक कामासाठी खर्च करतात. ते सकाळी लवकर उठतात, स्नान करुन प्रार्थना करतात आणि जास्त वेळ अध्यात्मिक ग्रंथाचे वाचन करण्यात घालवतात. जास्त वेळ अध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करायचे असेल तर प्रार्थनेसाठी किंवा झोपण्यासाठी त्यांना कमी वेळ द्यावा लागेल.

४) तुम्ही शेतात तांदळाचे पिक घेता तर त्याच शेतात गव्हाचे पीक घेण्याची संधी गमवता.

५) जर तुम्ही मित्रांसोबत एक सिनेमा पहायला जायचा बेत करता तेव्हा तुम्ही वेळ खर्च करता जो तुम्ही इतर कुठल्याही गोष्टीसाठी खर्च केला असता. म्हणजेच तुम्हाला एक संधी मिळते तेव्हा तुम्ही दुसरी संधी गमवत असता.

## १.३ निर्णय प्रक्रियेतील संधी खर्चाचे महत्त्व (SIGNIFICANCE OF OPPORTUNITY COST IN DECISION MAKING)

### तत्व २ निर्णय प्रक्रियेतील संधी खर्चाचे / वैकल्पिक खर्चाचे महत्त्व.

### Principle 2 - Significance of opportunity cost in Decision Making.

दैनंदिन जीवनात आपण जेव्हा एखादी क्रिया करतो तेव्हा दुसरी गोष्ट करण्याची संधी आपल्याला सोडून द्यावी लागते. जेव्हा आपण एखादी गोष्ट खरेदी करतो तेव्हा आपल्याला किंमत मोजावी लागते आणि ही किंमत म्हणजे जी दुसरी गोष्ट आपण सोडून दिलेली असते. त्याची किंमत असते त्यालाच संधीखर्च म्हणतात. श्रीमती रॉबीनसन यांच्यामते एखादा उत्पादन घटक एखाद्या विशिष्ट उपयोगात किंवा उद्योगात रहावा म्हणून जी किंमत द्यावी लागते त्या किंमतीला संधी खर्च किंवा वैकल्पिक खर्च म्हणतात.

**उदा.**

१) एक एकर शेतात कापूस पेरला असता ६०,००० रुपये उत्पन्न मिळते. तर कापसाऐवजी गहू पेरल्या तर ५०,००० रुपये उत्पन्न मिळते. म्हणजेच ६०,००० कापूस मिळविण्याकरता ५०,००० रुपये गव्हाचा त्याग करावा लागतो. म्हणून कापूस उत्पादनाचा संधीखर्च ५०,००० रुपये आहे. थोडक्यात जगात कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. तुम्हाला काही फायदा हवा अेल तर दुसऱ्या कोणत्यातरी संधीस मुकावे लागते. आणि म्हणूनच निर्णय घेत असताना व्यक्ति मिळणारा फायदा आणि गमवावा लागणाऱ्या संधीपासून मिळणारा फायदा यांची तुलना करत असतो आणि त्या आधारे कोणत्या संधीची निवड करायची याचा निर्णय घेतो.

२) एखाद्या व्यावसायिक खेळाडू देशासाठी खेळण्याचा निर्णय घेतो तेव्हा तो कॉलेज शिक्षणाची संधी गमावतो. परंतू व्यावसायिक खेळातून त्याला जास्त लाभ मिळतात. आणि कॉलेजला जाण्याचा त्याचा संधी खर्च जास्त असतो. कारण त्याला शिक्षणासाठी फी, पुस्तके, प्रवासखर्च इत्यादी वर खर्च करावा लागतो. म्हणून लाभ ही खर्चाची किंमत असते. त्यानुसार निर्णय घेतला जातो.

संधी खर्च म्हणजे सध्या विशिष्ट वापरात असल्यामुळे दुसऱ्या सर्वोत्तम संधीबद्दल सहन करावे लागणारे नुकसान होय.

३) जर तुम्ही पैसा आणि वेळ सिनेमा पहाण्यासाठी घालवता तर तूम्ही तो वेळ घरी पुस्तक वाचण्यासाठी घालवू शकत नहाी. तसेच सिनेमा पहाण्यासाठी जो पैसा वापरता त्याचा वापर दुसऱ्या कारणासाठी करता येत नाही.

४) तुम्ही ठरवता आहात सुट्टीतील सहलीसाठी महाबळेश्वरला फिरायला जायचे. तुम्हाला प्रवासखर्च, हॉटेल खर्च यासाठी भरपूर पैसे खर्च करावे लागतील. पण सुट्टीतील सहलीतून मिळणारा आनंद हा मानसिक असेल. अशा परिस्थितीत लाभ आणि खर्च यांची तुलना तुम्ही कशी कराल?

जेव्हा लाभ मानसिक असतो तेव्हा तुम्ही विचार करता सुट्टीतील सहलीवर पैसा खर्च करावा का या पैशातून एखादा मोबाईल खरेदी करावा. ज्यामुळे मला लाभ जास्त मिळेल. थोडक्यात व्यक्ती संधीची निवड करत असताना मिळणाऱ्या लाभाचा आणि कराव्या लागणाऱ्या खर्चाचा विचार करते.

५) आपण जेव्हा आईस्क्रिम खातो तेव्हा आपण ते पैसे दुसऱ्या कुठल्यातरी गोष्टीवर खर्च करण्याची संधी गमावतो. आपण तो आनंद गमावतो कारण आपण त्यावर पैसा खर्च करु शकत नाही. कारण आपला दुसरा उत्तम पर्याय म्हणजे आईस्क्रिम खाण्यासाठीचा संधी खर्च होय. साहजिकच आपण आईस्क्रिम खाण्यासाठी तेव्हाच पैसा खर्च करतो जेव्हा आईस्क्रिम खाण्यासाठीचा संधी खर्च हा त्यापासून मिळणाऱ्या आनंदापेक्षा जास्त नसतो.

६) तुम्ही बाजारात खरेदी करण्यासाठी जाता तुम्हाला चिकन आणि चीज खरेदी करावयाचे आहे. पण तुमच्याकडे एकच वस्तु खरेदी करण्यासाठी पूरेसे पैसे आहेत. दोन पर्यायातून

एकाची निवड करायची असते तेव्हा तुमच्या खर्च होणाऱ्या पैशाचे मूल्य काय आहे हे विचारात घेऊनच पैसे खर्च करावे लागतात.

मर्यादित आणि पर्यायी उपयोगाची साधने असतात. त्यामुळे तुम्हाला कोणत्या पर्यायासाठी कमी खर्च येईल आणि समाधान जास्त मिळेल याचा विचार करुन निर्णय घ्यावा लागतो.

७) तुम्हाला उच्च शिक्षणासाठी कॉलेजला प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यामुळे तुम्हाला बौद्धिक लाण होईल. चांगली नोकरी मिळेल. उच्च पगारामुळे प्रतिष्ठा वाढेल. पण त्याचवेळी कॉलेजची फी, पुस्तके, हॉस्टेल खर्च, जेवण खर्च, इ. चा विचार करावा लागेल. परंतू कॉलेजला प्रवेश घेतला नाही तरी जेवण खर्च, रहाणीमान खर्च करावाच लागेल. त्याचप्रमाणे कॉलेजला जर गेले नाहीतर अभ्यासासाठी खर्च होणाऱ्या वेळात एखादी नोकरी पकडली तर पैसे मिळतील. थोडक्यात कॉलेजला जावे किंवा नाही हा निर्णय घेत असताना संधी खर्चाचा विचार करावा लागतो.

थोडक्यात एक गोष्ट प्राप्त करण्यासाठी दुसऱ्या संभाव्य वस्तूच्या उत्पादनास मुकावे लागते. त्याचा त्याग करावा लागतो. तात्पर्य एक वस्तू प्राप्त करण्यासाठी दुसऱ्या संभाव्य वस्तूचा त्याग करावा लागतो. अशा खर्चाच संधी त्याग खर्च म्हणतात.

संधी खर्च ही महत्त्वाची अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. मिसेन जोन रॉबीनसन यांनी आधुनिक खंड सिद्धांत मांडताना या संकल्पनेचा वापर केला आहे. निर्णय प्रक्रियेत संधी खर्च, संकल्पनेस फार महत्त्व आहे. वस्तूच्या किंमत निर्धारण प्रक्रियेत देखील संधी खर्च विचारात घेतला जातो. कमी लाभ मिळवून देणाऱ्या उत्पादनाकडून जास्त लाभ मिळवून देणाऱ्या उत्पादनाकडे उत्पादन घटक वळवण्याच्या दृष्टीने संधी खर्च संकल्पनेस महत्त्व आहे.

**कृती** - खालील उदाहरणातील संधी खर्च ओळखा.

१) एका जागेवर शाळा आहे ती आता रेल्वे प्रकल्पामध्ये रुपांतरीत होणार आहे.

२) एका शेतकऱ्याला दोन एकर गहू उत्पादनातून ३०,००० रुपये उत्पन्न मिळते तरी तो त्या जमिनीवर कापूस उत्पादन घेतो.

३) मी माझ्या वार्षिक परीक्षेआधी संध्याकाळी अभ्यास करणे निवडतो. तेव्हा टी.व्ही. वर क्रिकेट सामने दाखविले जाणार आहेत. मी क्रिकेटचा चाहता आहे.

## १.४ विवेकी व्यक्ति आणि सिमांत लाभ (RATIONAL PEOPLE AND MARGINAL PROFIT)

### तत्व ३ विवेकी व्यक्ती सिमांत तत्वाचा विचार करतात.

### Principle 3 - Rational people think at the Margin.

विवेकानुसार निर्णय घेणारे लोक नेहमच सिमांत लाभ हा सिमांत खर्चापेक्षा जास्त आहे ना? याचा विचार करुनच निर्णय घेतात.

**उदा.**

१) कंपास बॉक्स उत्पादन करण्यासाठी येणारा खर्च १०० रुपये आहे आणि ती एक कंपास बॉक्स बाजारात १४० रुपयांना विकली जाते. अशा स्थितीत विवेकी उत्पादक नक्कीच कंपास बॉक्सचे उत्पादन करणार. कारण त्यामुळे त्याला ४० रुपये नफा मिलतो. याउलट जर कंपास बॉक्सची किंमत ८० रुपये झाली तर विवेकी उत्पादक कंपास बॉक्सचे उत्पादन करणार नाही. कारण एक कंपास बॉक्स उत्पादन करण्यासाठी येणारा खर्च म्हणजे सिमांत खर्च १०० रुपये आहे. आणि कंपास बॉक्स ८० रुपयांना विकला जातो म्हणजेच त्याला २० रु. तोटा होतो. म्हणजेच सिमांत खर्च हा सिमांत लाभापेक्षा जास्त असल्याने उत्पादक कंपास बॉक्सचे उत्पादन करणार नाही.

२) समजा एक तास जादा अभ्यास केल्याने तुम्हाला २ मार्क्स जादा मिळतील. परीक्षा जवळ आली असताना एक तास जादा अभ्यास करुन २ मार्क्स जादा मिळविणे महत्त्वाचे आहे. आणि जादा मार्क्स मिळाल्याने तुम्ही आनंदी होता. पण समजा त्यासाठी जास्तीच्या जागरणामुळे तुमची झोप कमी होऊन तुम्ही उदास होऊ शकता. तुम्ही जास्त तास अभ्यास करावा का नाही हे एका गोष्टीवर अवलंबून असते ती म्हणजे ते जास्तीचे दोन मार्क्स तुमच्या कमी झोपेमुळे होणाऱ्या त्रासापेक्षा वरचढ असतील तर कधी कधी लोकांचा गोंधळ उडतो निर्णय घेणे अशक्य होते.

३) दादरच्या होलसेल मार्केटमध्ये कांदे १० रु. किलो आहेत आणि विक्रोळीच्या मार्केटमध्ये १५ रु. किलो कांदे आहेत तर विक्रोळीच्या माणूस कांदे खरेदीसाठी दादरच्या मार्केटमध्ये जाणार नाही कारण दादर विक्रोळी रेल्वे तिकिटचा विचार करता विक्रोळीतच कांदे खरेदी करणे फायद्याचे ठरेल.

४) एका व्यक्तीकडून तुम्हाला १५०० रु. येणे आहे. आणि ते मिळविण्यासाठी दुसऱ्या शहरात जावे लागते. दुसऱ्या शहरात जाण्यासाठी येणारा खर्च १७०० रुपये असेल तर आपले पैसे आणण्यासाठी तुम्ही दुसऱ्या शहरात जाणार नाही कारण प्रवासखर्च मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

सर्व साधारणपणे वरील सर्व उदाहरणात व्यक्ति सिमांत लाभ तत्वाचा विचार करुन निर्णय घेते. जर सिमांत लाभ सिमांत खर्चापेक्षा जास्त असेल तर तो निर्णय विवेकी आणि योग्य आहे असे म्हणता येईल.

**उदाहरण :**

१) तुम्ही एक कंपास बॉक्स आणि एक मोबाईल विकत घेण्याचे ठरवता. तुमच्या घराजवळच्या दुकानात मोबाईल फोन १०,००० रुपयांना तर कंपास बॉक्स २५० रुपयांना मिळतो. तुमच्या घरापासून २ कि.मी. दुरच्या दुकानात मोबाईल फोन ९७०० रुपयांना तर कंपास बॉक्स २५० रुपयांना उपलब्ध आहे. त्या दुकानात जाण्यासाठी तुम्हाला २०० रुपये प्रवास खर्च येतो. तर तुम्ही कमी किंमतीसाठी त्या दुकानात जाल का ? निर्णय घ्या.

२) तुम्ही एक कंपास बॉक्स आणि एक मोबाईल विकत घेण्याचे ठरवता. तुमच्या घराजवळील दुकानात मोबाईल फोन १०,००० रुपयांना तर कंपास बॉक्स ३५० रुपयांना आहे. दोन किलो

मीटर दुरच्या दुकानात मोबाईल फोन १०,००० रुपयांना पण कंपास बॉक्स ५० रुपयांना आहे. त्या दुकानात जाण्यासाठी तुम्हास ५०० रुपये प्रवास खर्च येईल. कमी किंमतीसाठी त्या दुकानात जावे का ? निर्णय घ्या.

३) ललीताबेन ड्रेस विक्रेत्या आहेत. त्या शहरात घरोघरी फिरुन ड्रेस विक्रीचे काम करतात त्यांचे ग्राहक शहरात सर्वत्र पसरलेले आहेत. एक ग्राहक फोन करुन दोन ड्रेसची मागणी करतो. दोन ड्रेस विकले तर ललिताबेनला ४०० रु. नफा मिळतो पण ग्राहक दूर रहात असल्याने ग्राहकापर्यंत पोहचण्यासाठी २०० रुपये प्रवास खर्च येतो. अशा स्थितीत ललिताबेन काय निर्णय घेतील ?

४) मन्नुभाई हा टॅक्सी ड्रायव्हर आहे. दिवसभर टॅक्सी चालवून तो थकून गेला आहे. तो घरी जाण्याचा निर्णय घेतो. तरीसुद्धा एक प्रवासी त्याला विनंती करतो की, दुसऱ्या ठिकाणी जायचे आहे. टॅक्सीभाडे १००० रु. होणार असते. आणि टॅक्सी ड्रायव्हरला एक तास आणखी टॅक्सी चालवावी लागणार असते. प्रवासी १००० रुपयाच्या बदली प्रवासी ११०० रुपये देण्यास तयार आहे. मन्नुभाईला १०० रुपयाची कदर आहे त्याचप्रमाणे एक तास जादा आरामाची पण गरज आहे. मन्नुभाई काय निर्णय घेईल ?

## १.५ प्रलोभनास प्रतिसाद (RESPONSE TO INCENTIVES)

**तत्व ४ लोक प्रलोभनास प्रतिसाद देतात.**

**Principle 4 - People respond to Incentives.**

माणसे चालताना प्रतिसाद देतात. व्यक्ती खर्च आणि लाभाची तुलना करुन निर्णय घेत असतात. याचाच अर्थ लोक उत्तेजनास किंवा प्रलोभनास प्रोत्साहन देतात. मुलांना सांगितले जाते चांगला अभ्यास केल्यास चांगले मार्क्स मिळतील आणि तुला बक्षीस मिळेल. अशा स्थितीत बक्षीसाच्या अपेक्षेने मुल अधिक अभ्यास करण्यास प्रवृत्त होतात. जिथे मिळणारे बक्षीस वाढत जाते ते यशाची शक्यता जास्त असते. असे घडते कारण लोक चालताना प्रतिसाद देतात. बढती मिळण्यासाठी चालना ही व्यक्तीला त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक काम करण्यास प्रवृत्त करते. व्यक्ती खर्च आणि लाभाचा विचार करुन निर्णय घेतात.

**उदा.**

१) बाजारात हापूस आंब्याची किंमत वाढते तेव्हा ग्राहक देवगड हापूस आंबा खरेदी करण्याऐवजी स्थानिक आंबा खरेदी करणे पसंत करतात. कारण यात ग्राहकांना पर्यायी आंबा कमी किंमतीत उपलब्ध होतो. थोडक्यात अर्थव्यवस्था कशी काय करते हे समजण्यासाठी आंब्याची बाजारपेठ हा महत्त्वाचा घटक ठरतो.

२) शेतकरी शेतात काबाडकष्ट करतो कारण त्याला अपेक्षा असते कि त्याच्या पिकाला भरपूर नफा मिळेल. जर किंमत वाढून नफा मिळण्याची शेतकऱ्याला आशाच दिसत नसेल तर तो जास्त कष्ट करणार नाही. सर्वचजण चालताना प्रतिसाद देतात.

३) समाजात सभेला वेळेवर येण्याचे फायदे जास्त असतील तर माणसे सभेला वेळेवर येतील. जर वेळेवर न येण्याचे फायदे जास्त असतील तर लोक वेळ पाळणार नाहीत. आधुनिक बाजार अर्थव्यवस्थेची रचना ही फार गुंतागुंतीची आहे. पण लोकांना हव्या असलेल्या सर्व गोष्टींचा ती पुरवठा करते.

४) मला भूक लागली आहे आणि समोरच इडली, डोसा स्टॉल आहे. मी दुकानात जाऊन इडली, डोसा खातो याचा अर्थ माझ्यावरच्या प्रेमाने दुकानदाराने दुकान काढले असा होत नाही तर दुकानदाराला नफा मिळतो म्हणून त्याने दुकान सुरु केले आहे.

५) सर्वसाधारणपणे व्यक्ती होणाऱ्या तोटयापेक्षा जास्त फायद्याचा विचार करते. करदात्याना कर भरण्यास आवडत नाही. कारण कर चुकल्यामुळे होणारा फायदा जास्त असेल तर व्यक्ती कर चूकवण्याचा प्रयत्न करतात. या उलट जर कर चुकविण्यावर सरकारने जबरदस्त दंड आकारला तर कर चुकविण्याचे प्रमाण नक्कीच कमी होईल. आधुनिक अर्थव्यवस्थेत व्यक्ती चालताना प्रतिसाद देतात हा अर्थव्यवस्थेच्या चालनेतील महत्त्वाचा घटक आहे. आधुनिक बाजार अर्थव्यवस्थेची रचना ही फार गुंतागुंतीची आहे. पण लोकांना हव्या असलेल्या सर्व गोष्टींचा ती पुरवठा करते.

६) उदा. ३०० पेजीस नोटबुक पाहिजे आहे. मला ती स्टेशनरीच्या दुकानात सहज मिळू शकेल. दुकानदाराने ती नोटबुक का ठेवली. कारण त्याला त्याच्या विक्रीतून नफा मिळेल. नोटबुक विक्रीस ठेवण्यामागचा दुकानदाराचा उद्देश माझी गरज भागविणे या पेक्षा त्याला उत्पन्न मिळविणे हा आहे. थोडक्यात उत्पन्न मिळविणे ही प्रेरणा त्याला नोटबुक दुकानात विक्रीस ठेवण्यास प्रवृत्त करते.

७) प्रेरणा जशा चांगल्या असतात तशा गैरदेखील असतात. उदा. अन्न सुरक्षा धोरणामुळे दारिद्र्य रेषेखालील लोकांना स्वस्त दराने अन्नधान्य उपलब्ध करुन दिले जाते. परिणामी कुपोषणाचे प्रमाण कमी होते. परंतू या धोरणाचे ऋणात्मक प्रलोभन म्हणजे लोकांची जादा कष्ट करण्याची प्रवृत्ती कमी होते. केवळ आठ ते दहा दिवस काम केले तरी संपूर्ण महिनाभर पुरेल इतके अन्नधान्य त्यांना मिळेल. म्हणून आपल्या उत्पन्नात वाढ करुन ते दारिद्र्य रेषेच्या वर येण्याचा प्रयत्न करणार नाहीत.

**क्रिया -**

१) कमी पगार मिळणारे कामगार हे जास्त पगार मिळणाऱ्या कामगारांपेक्षा कमी कार्यक्षम असतात.
२) मुंबईमध्ये गोविंदा पथकाना मिळणाऱ्या बक्षिसांच्या रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे गोविंदा पथकांच्या संख्येत तसेच दहीहंडीच्या थरांमध्येही दिवसेंदिवस वाढ होत आहे.

## १.६ समारोप (CONCLUSION)

या प्रकरणामध्ये आपण अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत निर्णय घेण्याच्या प्रक्रियेच्या चार तत्वाचा अभ्यास केला. पहिल्या तत्वामध्ये व्यक्तिला सममूल्यन किंवा परिणाम वाटपाला कसे तोंड द्यावे लागते याचा विचार केला तर दुसऱ्या तत्वामध्ये संधी खर्चाचे महत्व अभ्यासले आणि तिसऱ्या तत्वामध्ये विवेकी व्यक्ती सिमांत तत्वाचा विचार कसा करतात याचा अभ्यास उदाहरणाच्या सहाय्याने केला. चौथ्या तत्वामध्ये व्यक्ती व्यक्ती प्रलोभनास प्रतिसाद कसा देतात हे अभ्यासले.

## १.७ सरावासाठी प्रश्न (PRACTICE QUESTIONS)

१) व्यक्तिगत निर्णय प्रक्रियेतील अर्थशास्त्राची चार तत्वे सांगून त्यापैकी कोणत्याही एका तत्वाचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

२) परिणाम वाटप म्हणजे काय ? परिणाम वाटप तत्व स्पष्ट करा.

३) संधी खर्च म्हणजे काय ? निर्णय प्रक्रियेतील संधी खर्चाचे महत्त्व स्पष्ट करा.

४) लोक प्रलोभनास प्रतिसाद देतात याचे समर्थ करा.

५) निर्णय प्रक्रियेमध्ये संधी (वैकल्पिक) खर्च कसा परिणाम करतो ते दोन उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

६) प्रोत्साहनाला / प्रलोभनाला लोक प्रतिसाद देतात. हे तीन उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक -२

## अर्थशास्त्राची तत्वे
## (PRINCIPLES OF ECONOMICS)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ विनिमयापासून लाभ
२.३ बाजारामार्फत आर्थिक व्यवहाराचे संघटन व लाभ
२.४ बाजार यंत्रणेत सरकारची भूमिका
२.५ रहाणीमानाचा दर्जा आणि उत्पादन
२.६ चलन संस्थेतील वाढ आणि स्फिती
२.७ स्फिती आणि बेरोजगारी
२.८ समारोप
२.९ सरावासाठी प्रश्न

### २.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- लोक परस्परांशी सुसंवाद कसा करतात याचा अभ्यास करणे.
- समग्र अर्थव्यवस्था कशी कार्य करते हे समजावून घेणे.
- चलन संख्येतील वाढ आणि किंमतवाढ संबंध अभ्यासणे.
- स्फिती आणि बेरोजगारी यातील संबंध अभ्यासणे.

### २.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

पहिल्या प्रकरणात आपण लोक निर्णय कसे घेतात याचा अभ्यास केला. अर्थव्यवस्था हा लोकांचा असा गट असतो की जो आपल्या जीवनमानाच्या संदर्भात एक दुसऱ्याशी संवाद साधतो. अर्थशास्त्राची तत्वे भाग - २ या प्रकरणामध्ये आपण लोक परस्परांशी संवाद कसा साधतात याचा अभ्यास करणार आहोत.

१) विनिमयापासून लाभ किंवा व्यापार प्रत्येकासाठी चांगला असतो.
२) आर्थिक उपक्रम बाजाराच्या माध्यमातून आयोजित करणे अधिक कार्यक्षम असते.

३) खाजगी बाजाराचे उत्पादन सुधारण्यात सरकारची भूमिका महत्त्वाची असते.

या तीन तत्वामध्ये लोक परस्परांशी संवाद कसा साधतात हे आपण पहाणार आहोत. म्हणजेच तत्व पाच, सहा आणि सात ही तत्वे लोक एकदुसऱ्याशी संवाद कशी साधतात याच्याशी संबंधीत आहेत.

समग्र अर्थव्यवस्था कशी कार्य करते याचा अभ्यास आपण तत्व आठ, नऊ आणि दहा या तीन तत्वामध्ये करणार आहोत. तत्व आठ मध्ये राहणीमानाचा दर्जा उत्पादनावर अवलंबून असतो याचा अभ्यास करणार आहोत. तत्व नऊ मध्ये चलन संख्येतील वाढ आणि स्फिती तर तत्व दहा मध्ये स्फिती आणि बेरोजगारी यांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विनिमयापासून लाभ (PROFIT FROM EXCHANGE)

**तत्व ५ व्यापार प्रत्येकासाठी चांगला असतो.**

**Principle 4 - Trade can make everyone better off.**

जागतिक स्पर्धेत प्रत्येक देश दुसऱ्या देशाचा स्पर्धक असतो हे खरे असेल तरी व्यापारात दोन्ही देशांना लाभ मिळतो. कारण प्रत्येक देशाच्या नैसर्गिक परिस्थितीत फरक असतो. म्हणून विशिष्ट देशात विशिष्ट वस्तू कमी किंमतीत तयार होते. उदा. नागपूर मध्ये संत्री, बांग्लादेशात ताग, आसाम मध्ये चहा इ.

व्यापाराचा परिणाम कुटूंबावर देखील होतो. कारण कुटूंबे कमीत कमी किंमतीत जास्तीत जास्त समाधान मिळवण्याचा प्रयत्न करतात. व्यापारामुळे मिळवण्याचा प्रयत्न करतात. व्यापरामुळे विशेषीकरण शक्य होते आणि प्रत्येक देशाला हव्या त्या वस्तू उपलब्ध होतात.

**उदा.**

१) राजू आणि अमित हे दोघ मित्र आहेत. ते वस्तीगृहात शिक्षणासाठी रहातात. राजू उत्तम जेवण बनवतो तर अमीत खोली साफ करण्याचे काम कमी वेळात करतो. जर अमीतने जेवण बनवण्याचे ठरविले तर राजू पेक्षा त्याला जास्त वेळ लागतो आणि राजूने रुम साफ करायची ठरवली तर त्याला अमीतपेक्षा जास्त वेळ लागतो.

समजा दोघांनी विशेषीकरण करायचे ठरवले म्हणजे राजू स्वतःसाठी आणि अमितसाठी जेवण बनवणार आणि अमीत आपली व राजूची खोली साफ करणार तर राजू व अमीत दोघेही आपल काम कमी वेळात करतील दोघांनाही फायदा होईल आणि अधिक वेळ अभ्यासासाठी मिळेल.

जसे व्यक्तीचे तसेच देशाचे देखील असते, प्रत्येक देशाची काही वस्तू उत्पादनाच्या बाबतीत अनुकूलता असते. ज्या देशात विशिष्ट उत्पादनाला अनुकूल परिस्थिती असते तो देश त्या उत्पादन विशेषकरण करतो. आणि आपल्या देशात जी वस्तू जास्त खर्चात उत्पादन होते ती वस्तू बाह्य देशातून आयात करणे पसंत करतात.

२) विशेषीकरणामुळे कमी वेळात जास्त उत्पादन होते आणि दोन्ही देशाचा फायदा होतो.

भारतातील अनुकूल नैसर्गिक परिस्थिती तांदूळ उत्पादनास फायदेशीर असल्याने भारत तांदळाचे उत्पादन कमी वेळात कमी खर्चात मोठ्या प्रमाणात घेतो आणि आसाम मध्ये चहाच्या उत्पादनास अनुकूल परिस्थिती असल्याने आसाम चहाचे उत्पादन कमी खर्चात घेतो. आसाम आणि भारत या दोन देशांनी चहा आणि तांदूळ या उत्पादनास विशेषीकरण केल्यास त्याचा फायदा दोन्ही देशांना होतो. थोडक्यात व्यापारामुळे दोन्ही देशाचा फायदा होतो.

३) फ्रान्सच्या कामगारापेक्षा स्पेनचे कामगार कापड कमी वेळात बनवतात. तर फ्रान्सचे कामगार स्पेनच्या कामगारापेक्षा वाईन कमी वेळात बनवितात. अशा स्थितीत फ्रान्सचे वाईन उत्पादनात आणि स्पेनचे कापड उत्पादनात विशेषीकरण करावे. दोन्ही देशांना कमी खर्चात उत्पादन मिळेल. त्याशिवाय दोन्ही देशातील ग्राहकांना कमी किंमतीत वस्तू मिळाल्याने दोन्ही देशाचा फायदा होईल.

४) उदा. एक शिंपी ८ तासात देन ड्रेस शिवतो. एका ड्रेसची शिलाई ५०० रु असेल तर दोन ड्रेस पासून त्याला १००० रु. मिळतील. आणि शिंप्याला एका वेळच्या जेवणासाठी आवश्यक तांदूळ पिकविण्यासाठी १० तास लागतात. तांदूळ एकवेळच्या जेवणासाठी एक किलो लागतात. असे गृहित धरले आहे. तांदळाची किंमत ५० रु. किलो आहे. अशा स्थितीत ८ तास शिंपी काम करुन १००० रुपये मिळविणे जास्त चांगले. कारण १० तास काम करुन शिंपी फक्त एकच किलो तांदूळ मिळविणार. म्हणून शिंप्याने तो ज्या व्यवसायात जास्त पारंगत आहे त्या व्यवसायातच जास्त वेळ खर्च करणे. आणि शेतकऱ्याकडून तांदूळ खरेदी करणे योग्य ठरेल. या दोन्ही व्यक्तिंना त्यांच्या वस्तू  आणि सेवाच्या विनिमयातून जो लाभ होतो त्याला व्यापारातून होणारा फायदा असे म्हणतात. व्यक्तीप्रमाणे उदाहरण दोन आणि तीन मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे राष्ट्रानही व्यापारातून फायदा होतो. ते ज्या वस्तूच्या उत्पादनात पारंगत आहेत ती एखाद्या महागड्या वस्तूच्या बदल्यात विकत घेणे जास्त योग्य ठरते. व्यापारामध्ये होणाऱ्या नफ्यामुळेच बाजार अस्तित्वात येतात. आणि विनिमयातून लोकांचे जीवन सुखकर बनते.

**कृती :**

१) सर्वच बाबतीत स्वयंपूर्णता ही व्यक्तीच्या बाबतीत चांगली कल्पना आहे असे तुम्हास वाटते का? देशाच्या संदर्भात तुमचे मत काय आहे?

२) पोस्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद असलेली माणसे सतत दुसऱ्या बरोबर तिकिटांची अदलाबदल करतात. हा विनिमय कोणाला लाभदायक असेल.

## २.३ बाजारामार्फत आर्थिक व्यवहाराचे संघटन व लाभ (ORGANIZATION AND PROFIT OF ECONOMIC TRANSACTION BY MARKET)

**तत्त्व - ६ आर्थिक उपक्रम बाजाराच्या माध्यमातून आयोजित करणे आर्थिक कार्यक्षम असते.**

**Principle 6 - Markets are usually a good way to organize economic activity.**

अर्थशास्त्राच्या अभ्यासात बाजार या संकल्पनेस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. बाजार म्हणजे असे ठिकाण कि जेथे ग्राहक व विक्रेते एकमेकांच्या संपर्कात येऊन वस्तुंची खरेदी विक्री करतात. प्रा. बेनहॅम यांच्यामते जेव्हा एखाद्या वस्तूचे ग्राहक आणि विक्रेते यांना एकत्रित आणण्याचा एकूण व्यवस्थेला बाजार म्हणतात. बाजारपेठेचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे केले आहे.

१) वस्तुनूसार वर्गीकरण - बाजारात विकल्या जाणाऱ्या वस्तुनूसार बाजाराचे वर्गीकरण केले जाते. उदा. कापड बाजार, धान्य बाजार इत्यादी.
२) कालखंडानूसार वर्गीकरण - यामध्ये कालखंडानूसार अति अल्प कालखंड, अल्प कालखंड, दिर्घ कालखंड आणि अति दीर्घ कालखंड असे विभाजन केले जाते.
३) स्थलानुसार वर्गीकरण - बाजाराच्या ठिकाणानुसार बाजारपेठेचे वर्गीकरण केले जाते. उदा. स्थानिक बाजारपेठ, राष्ट्रीय बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ इत्यादी.
४) स्पर्धेनुसार वर्गीकरण - बाजारातील स्पर्धेच्या प्रमाणावरुन बाजारपेठेचे वर्गीकरण केले जाते. उदा. पूर्ण स्पर्धा, मक्तेदारी, मक्तेदारी युक्त स्पर्धा, अल्पाधिकार इत्यादी.

अलिकडे बाजार हे भौतिक किंवा आभासी देखील असतात. यामध्ये आभासी बाजारपेठेचे उदाहरण म्हणजे इंटरनेट वरील खरेदी होय.

बाजारपेठेमध्ये ग्राहक आणि विक्रेते दोघेही महत्त्वाचे असतात. बाजारात विक्रेते आणि ग्राहक यांच्या संयोगातून किंमती ठरतात. ग्राहक व विक्रेते यांचा ऐच्छिक विनिमय दोघाना तसेच अर्थव्यवस्थेला देखील फायदेशीर होतो.

आज सर्वच देशांनी बाजार व्यवस्थेचा स्विकार केला आहे. बाजार अर्थव्यवस्थेत सर्व निर्णय उत्पादनसंस्था आणि कुटुंबसंस्था घेतात. उत्पादनसंस्था कोणते उत्पादन घटक वापरुन कोणत्या वस्तूचे उत्पादन घ्यायचे हे ठरवतात तर कुटुंबसंस्था कोणत्या वस्तू आपल्या उत्पन्नातून खरेदी करावयाच्या हे ठरवितात. उत्पादनसंस्था आणि कुटुंबसंस्था या दोघांच्या निर्णयातून वस्तू व सेवांची किंमत ठरते. बाजारातील वस्तूच्या किंमती निश्चित किंवा बदलत्या असतात. बाजारपेठा ग्राहक व उद्योजक यांच्या पर्यंत भौतिक माहिती पुरवण्याचे काम करतात.

उदा. ग्राहकाच्या उत्पन्नात वाढ झाली तर ग्राहक उच्च प्रतीचे धान्य खरेदी करतील. बाजारात कोलम हा बारीक उच्च प्रतिचा तांदुळ उपलब्ध आहे. त्याची किंमत जास्त आहे आणि दूसरा जाडा कनिष्ठ प्रतीचा तांदूळ उपलब्ध आहे. त्याची किंमत कमी आहे. ग्राहकांच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे ग्राहक उच्च प्रतिचा कोलम तांदुळ खरेदी करतील. स्वाभाविक जाड्या तांदळाची मागणी कमी होईल. किरकोळ विक्रेत्याकडे जाड्या तांदळाची मागणी कमी झाल्याने तांदळाचा साठा पडून राहील. किरकोळ विक्रेते घाऊक विक्रेत्याकडून आणि घाऊक विक्रेते शेतकऱ्याकडून कोलम तांदळाची मागणी वाढवतील. त्यामुळे कोलम तांदळाची मागणी वाढेल. याउलट परिमल तांदळाची मागणी कमी झाल्याने स्वाभाविक जाड्या तांदळाची किंमत घटेल. जाड्या तांदळाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य किंमत न मिळाल्याने शेतकरी कोलम तांदळाचे उत्पादन करतील.

थोडक्यात बाजारपेठेमुळे ग्राहक कोलम तांदळाला जास्त मागणी करीत आहेत. ही माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहचविणे शक्य होते. जर बाजारपेठा नसतील तर शेतकऱ्यांना जाड्या तांदळाची मागणी घटली हे समजणार नाही. स्वाभाविक शेतकरी त्याच तांदळाचे उत्पादन करतील आणि शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागेल. त्यासाठीच बाजार व्यवस्था खूप महत्त्वाची ठरते. त्यामुळे ग्राहक व विक्रेते एकत्र येऊन विनिमय करतात. बाजारपेठे शिवाय मागणी व पुरवठा यात समतोल साधणे कठीन असते. अर्थव्यवस्था ही एक जटील संस्था आहे. कारण यामध्ये हजारो वस्तुंच्या देवाण-घेवाणीचा अभ्यास केला जातो. बाजारपेठेमध्ये वेगवेगळ्या वस्तूची खरेदीविक्री केले जाते. परंतू ग्राहकांची बदलती मागणी व आवश्यकता यांची कोणत्याही प्रकारची पूर्ण माहिती सरकारला नसते.

आदेश अर्थव्यवस्था म्हणजे ज्या अर्थव्यवस्थेत मागणी व पुरवठा यांचे आयोजन केंद्रिय सरकारच्या आदेशाने केले जाते. तेथे बाजाराच्या संदर्भ घेतला जात नाही. पण बाजाराच्या अभावामुळे व आदेश अर्थव्यवस्थेमुळे काही वस्तुची विक्री न झाल्याने त्यांचा साठा वाढतो. याठिकाणी कोणत्या वस्तूचे किती उत्पादन घ्यायचे याचा निर्णय सरकारी खाती घेतात. या ठिकाणी बाजारयंत्रणा कार्यक्षम नसते. त्यामुळे अतिरिक्त पुरवठा होतो. आणि ग्राहकाचे पुरेसे समाधान होत नाही. म्हणून अर्थतंज्ञानूसार आर्थिक उपक्रम हे केंद्रीय सरकारपेक्षा बाजाराच्या कार्यप्रणालीने आयोजित करणे हे अधिक कार्यक्षम राहील.

**उदा.**

१) बाजारात महाग किंमतीला तांदूळ व गहू उपलब्ध असतील. पण गरिबांना महाग तांदूळ, गहू खरेदी करणे परवडणार नाही. स्वाभाविक ते गरजेपेक्षा कमी तांदूळ व गहू खरेदी करतील. यामुळे त्याना पुरेसा आहार मिळणार नाही व कुपोषण होईल. त्यांची शारीरिक क्षमता कमी होऊन अर्थव्यवस्थेच्या उत्पादन प्रक्रियेवर नकारात्मक परिणाम होईल. हे योग्य नाही. त्यामुळे बाजारभाव कमी दराला तांदूळ, गव्हाचा पुरवठा रेशनिंग दुकानातून गरिब नागरिकांसाठी करणे गरजेचे आहे. सरकारी सेवा व वस्तूचा पुरवठा हा अंशतः सरकारकडून होणे गरजेचे आहे. सार्वजनिक वस्तूंच्या पूर्ततेची जबाबदारी सरकारला उचलावी लागते. या वस्तूच्या पुरविण्याकरता सरकारला अर्थसंकल्पात तरतूद करावी लागते. कारण गरिब लोकांना या वस्तू आवश्यक असतात. पण त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नात त्या खरेदी करणे शक्य नसते.

२) राष्ट्रीय संरक्षणाचा देशाच्या सर्व नागरिकांच्या रक्षणासाठी वापर केला जातो. त्यापासून कुणाला वंचित ठेवता येत नाही. कोणा एका नागरिकाला जास्त संरक्षण आणि दुसऱ्याला कमी संरक्षण असे होत नाही. या बाबतीत खाजगी बाजार अयशस्वी ठरतात. सरकारी सेवेसाठी कोणालाही किंमत मोजावी लागत नाही किंवा कोणाला वंचित ठेवता येत नाही. आणि म्हणूनच अशा सेवा पुरवठ्यास बाजारयंत्रणा अपयशी ठरते. सर्वसामान्यपणे विचार केला तर आर्थिक उपक्रम व कार्यपद्धती बाजाराच्या माध्यमातून अधिक कार्यक्षम पद्धतीने आयोजित होतात तर इतर कोणत्याही पर्यायी आयोजाने आर्थिक उपक्रमाची कार्यक्षमता कमी होते.

**उपक्रम :**

१) तुमच्या परिसरातील दोन सार्वजनिक वस्तूची उदाहरणे द्या.

२) भारतातील प्राथमिक शिक्षण पूर्णपणे खागजी बाजारपेठेवर सोपवावे असे तुम्हास वाटते का ?

३) समजा खाजगी बाजारपेठेऐवजी सरकारने नागरिकांना मोबाईल वाटप करण्याचा निर्णय घेतला तर काय होईल असे तुम्हाला वाटते ?

## २.४ बाजार यंत्रणेत सरकारची भूमिका (ROLE OF GOVERNMENT IN MARKET)

### तत्त्व - ७ खाजगी बाजाराचे उत्पादन सुधारण्यात सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

### Principle 7 - Government can sometimes improve market extremes

प्रगत देशामध्ये बाजारयंत्रणाही विकासाचे इंजिन म्हणून ओळखली जाते. म्हणूनच खाजगी बाजाराचे आयोजन केले जाते. परंतू खाजगी बाजार व्यवस्थेत समस्या निर्माण होतात. उदा. प्रदूषण, बेरोजगारी, गरीबी इत्यादी. अशा समस्याचे निराकरण करण्यासाठी सरकार बाजार यंत्रणेच्या कार्यात हस्तक्षेप करते. सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करण्याची दोन कारणे आहेत. ती म्हणजे समता निर्माण करणे आणि कार्यक्षमता वाढवणे होय.

पूर्ण स्पर्धेच्या अभावामुळे आर्थिक प्रगती साध्य होण्यासाठी बाजार व्यवस्था अयशस्वी ठरते. जेव्हा बाजारपेठेत पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते तेव्हा बाजारयंत्रणेतील सुधारणेत अडथळे येतात. अशावेळी सरकारला बाजार यंत्रणेत हस्तक्षेप करावा लागतो.

**अयशस्वी बाजार यंत्रणेची साधने :**

**१) अयशस्वी स्पर्धा** - पूर्ण स्पर्धे अभावी बाजारयंत्रणा अयशस्वी ठरते. कारण मक्तेदारी अल्पाधिकार किंवा मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तूच्या किंमती जास्त असतात. बाजारात कमी उत्पादन आणि किंमत जास्त असते. याउलट पूर्ण स्पर्धेतील उत्पादक एकजिनसी उत्पादन करतो आणि किंमत व सिमांत खर्च यांचा समतोल साधेपर्यंत उत्पादन वाढवू शकतो. पूर्ण स्पर्धेत P = AR = AC = MR = MCही समतोलाची अट असते तर अपूर्ण स्पर्धेत MR = MC समतोलाची अट असते. म्हणजेच अपूर्ण स्पर्धेत उत्पादन साधनाचा योग्य वापर होत नाही. त्यामुळे साधनसंपत्ती अपव्यय होतो. ग्राहकांचे शोषण होते आणि अकार्यक्षम उत्पादन होते. स्वाभाविक बाजारयंत्रणा अकार्यक्षम ठरते म्हणून सरकारचा हस्तक्षेप आवश्यक असतो.

**२) अपूर्ण माहिती** - पूर्ण स्पर्धेतील ग्राहकांना सरकार व कामगार आणि उत्पादन संस्था यांना बाजारपेठेचे पूर्ण ज्ञान असते. पण अपूर्ण स्पर्धेत अपुऱ्या बाजार यंत्रणेमुळे कार्यप्रणाली निरुपयोगी ठरते. अशा स्थितीत सरकारला बाजारपेठेत हस्तक्षेप करावा लागतो.

**३) बाह्यता** - बाजार व्यवस्थेत पूर्ण स्पर्धा आणि पूर्ण माहिती असून सुद्धा बाजार घटकामुळे बाजारयंत्रणा अपयशी ठरते. बाह्यता ही सकारात्मक व नकारात्मक असते. सकारात्मक म्हणजे मिळणारे बाह्य लाभ होय. उदा. वृक्षारोपण, वैद्यकिय सुविधा, प्रदुषणविरोधी उपाययोजना इत्यादी होय. नकारात्मक म्हणजे बाह्य खर्च होय. उदा. प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम इत्यादी. अशा स्थितीत सरकारला हस्तक्षेप करावा लागतो.

**४) सार्वजनिक वस्तू -** सार्वजनिक वस्तूंच्या निर्मितीमूळे सुद्धा बाजारव्यवस्था अयशस्वी ठरते. सार्वजनिक वस्तू म्हणजे अशा वस्तू की ज्यांचा उपभोग एकाच वेळी सर्व समाजाकडून सारख्याच प्रमाणात घेतला जातो. सार्वजनिक वस्तू निर्मितीचा सिमान्त खर्च हा अधिकच्या व्यक्तीसाठी शून्य असतो. कारण आपण त्या व्यक्तिना सामाजिक उपभोगापासून वंचित ठेऊ शकत नाही.

सार्वजनिक वस्तूंचा फायदा सर्वांनाच होत असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती त्या वस्तूची किंमत देण्यास तयार नसतो. आणि किंमत न देणाऱ्याला वस्तूच्या उपभोगापासून दूर ठेवता येत नाही. म्हणूनच सार्वजनिक वस्तू उत्पादनात बाजारयंत्रणा अपयशी ठरते आणि सरकारला हस्तक्षेप करावा लागतो.

प्रा. सॅम्युअलसन यांच्यामते जर अर्थव्यवस्था कार्यक्षमपणे चालवायची असेल तर कोणत्याही देशातील सरकारला महत्त्वाच्या जबाबदाऱ्या स्विकाराव्या लागतात.

१) साधनसामुग्रीच्या वापरात कार्यक्षमता निर्माण करणे.
२) उत्पन्न व संपत्तीच्या वाटपातील विषमता कमी करणे.
३) स्थैर्यासह आर्थिक विकास निर्माण करणे.

पूर्ण स्पर्धा काल्पनिक असल्यामुळे बाजार यंत्रणेला अपयश येते. म्हणून अर्थव्यवस्थेत सरकारच्या हस्तक्षेपाची गरज असते.

अयशस्वी बाजारव्यवस्था दूर करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची प्रगती वाढवण्यासाठी सरकारची भूमिका महत्त्वाची असते.

१) बाजारप्रणालीमुळे साधनांचे वितरण योग्य होते. ग्राहकांना हव्या त्या वस्तू पुरविल्या जातात. बाजारात ग्राहक व विक्रेते दोघांनाही बाजाराचे पूर्ण ज्ञान असणे आवश्यक असते. अपुऱ्या माहितीमुळे बाजारयंत्रणा अपयशी ठरते. म्हणून सरकारला हस्तक्षेप करावा लागतो.

२) सार्वजनिक वस्तूचा वापर सर्व समाज करतो. परंतू किंमत देण्यास सर्वजण तयार नसतात. त्यामुळे बाजारयंत्रणा अयशस्वी ठरते. अशा परिस्थितीत गुणवत्तेच्या वस्तूची किंवा सवलतीच्या दरातील वस्तूचा पुरवठा करण्यासाठी सरकारची गरज असते.

३) उत्पन्न व संपत्तीच्या वाटपातील विषमता दूर करण्यासाठी सरकारच्या हस्तक्षेपाची गरज असते. सरकार व खाजगी मालमत्तेवर नियंत्रण ठेवते. किमान वेतन कायदा मक्तेदारी नियंत्रण कायदा यांचा अवलंब करतात.

४) आर्थिक विकासाला गती प्राप्त करुन देण्यास बाजारयंत्रणा अपयशी ठरते. तेव्हा सरकारच्या हस्तक्षेपाची गरज असते.

५) रोजगार वाढ, आर्थिक वृद्धी, गरीबी निर्मूलन अशी उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी सरकारी धोरणे आखण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज असते.

काही अर्थतंज्ञाच्या मते बाजार यंत्रणा अपयशी ठरते तसे सरकार सुद्धा अपयशी ठरते. जरी सरकार सार्वजनिक वस्तूंचा सर्व नागरिकांसाठी पुरवठा करत असेल तर तरीदेखील योग्य प्रमाणात आवश्यक त्या सार्वजनिक वस्तूंचा पुरवठा करण्यास अपयशी ठरते. कारण त्यास निरनिराळे घटक कारणीभूत ठरतात जसे वाया गेलेली गुंतवणूक अपव्यय, भ्रष्टाचार इत्यादी.

**उदाहरण** - सरकार गोरगरिबांना स्वस्त दरात धान्य उपलब्द करुन देते. सरकार गरिब लोकांना अन्नधान्याकरता अनुदान देते. परंतू गरिब कोण हे पहिले शोधून काढणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारी कर्मचारी वर्गावर अवलंबून रहाणे गरजेचे आहे. जर सरकारी कर्मचाऱ्यांनी गरिब कोण हे योग्य प्रकारे शोधले नाही आणि कर्मचाऱ्यांनी गरिबांचे अनुदान त्यांच्या स्वतःच्या फायद्यासाठी दुसरीकडे वळवले तर अनुदानाचा उपयोग होणार नाही. यावर उपाय म्हणून भारतात गरिबाची अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँकेच्या खात्यावर जमा केली जाते.

उदा.

१) भारतातील सार्वजनिक रुग्णालय गरिबांना पुरेशा प्रमाणात वैद्यकिय सेवा पुरवितात का? त्याच्याऐवजी खाजगी रुग्णालये असावीत काय?

**उत्तर :** खाजगी रुग्णालये वैद्यकिय सेवांचा पुरवठा करतात. परंतू हा पुरवठा श्रीमंताना उपयोगी असतो. कारण या वैद्यकिय सेवांची किंमत जास्त असते. गरिबांना या सेवा परवडणाऱ्या नसतात. हे जेव्हा सरकारच्या लक्षात येते तेव्हा केंद्र सरकार प्राथमिक आरोग्य सेवांचा स्वस्त दरात सर्वांसाठी पुरवठा करते. साधारणपणे सार्वजनिक वस्तूचा पुरवठा सरकार करते. कारण खाजगी बाजारपेठेत सामाजिक हेतूने पुरविलेल्या वस्तू खूपच कमी असतात. तसेच सरकारने पुरविलेल्या सार्वजनिक वस्तू देखील सार्वजनिक मागणी पूर्ण करु शकत नाहीत. भारताची लोकसंख्या जास्त असल्याने भारतातील सार्वजनिक रुग्णालय गरिबांना पुरेशा वैद्यकिय सेवा पुरविण्यास असमर्थ ठरतात. त्याचप्रमाणे खरे गरीब कोण आहेत कि ज्या वैद्यकिय सेवांचे स्वस्त दरात गरज आहे. त्यांना शोधून काढण्यासाठी अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग यांच्यावर अवलंबून रहावे लागते. ते अधिकारी प्रामाणिक असतीलच असे नाही. त्यामुळे भारतातील सार्वजनिक रुग्णालय गरिबांना पुरेशा प्रमाणात वैद्यकिय सेवा पुरविण्यात असमर्थ ठरतील आणि खाजगी रुग्णालय असली तरी त्यातील जास्त किंमतीच्या वैद्यकिय सेवा गरिबाना परवडणार नाहीत. आणि जर का या वैद्यकिय सेवा गरिबाना परवडल्या नाहीत तर ते सेवाचा लाभ घेणार नाहीत. त्यामुळे त्या व्यक्तिची शारीरिक क्षमता कमी होईल. याचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या उत्पादन प्रक्रियेवर होईल. हा उत्पादन प्रक्रियेवरील नकारात्मक परिणाम होऊ नये म्हणून सरकारला प्राथमिक आरोग्य सेवा बाजार भावापेक्षा कमी दरात सार्वजनिक रुग्णालयात उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**उपक्रम स्पष्ट करा :**

१) एअर इंडियाचे खाजगीकरण व्हावे का?

२) जर राष्ट्रीय संरक्षण दलाचे खाजगीकरण झाले तर काय होईल?

३) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ऐवजी खाजगी बसेस चालवण्यात याव्यात का?

४) भारतातील सार्वजनिक आरोग्य केंद्रे गरिबांना कार्यक्षमपणे वैद्यकिय सेवा पुरवितात का? त्याच्याऐवजी खाजगी आरोग्य केंद्रे असावित का?

## २.५ रहाणीमानाचा दर्जा आणि उत्पादन (STANDARD OF LIVING AND PRODUCTION)

**तत्त्व - ८ देशातील लोकांचे रहाणीमान वस्तू आणि सेवांच्या निर्मिती क्षमतेवर अवलंबून असते.**

**Principle 8 - A Country’s standard of living depends on its ability to produced goods and services.**

जगातील वेगवेगळ्या देशातील लोकांच्या रहाणीमानात फरक असतो. एखाद्या दिलेल्या वेळेस देशातील रहाणीमान हे त्यावेळेस देशातील प्रत्येक नागरिकांमागे किती वस्तू आणि सेवांचा पुरवठा उपलब्ध आहे यावर ठरते. रहाणीमान हे सर्वसाधारणपणे देशातील लोकसंख्येसाठी उपलब्ध असलेले अन्न, वस्तू, निवारा, करमणूकीची साधने, औषध, पायाभूत सुविधा या घटकांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे देशाच्या रहाणीमानाचा दर्जा हा दोन गोष्टींवर अवलंबून असतो.

१) देशात उत्पादन झालेल्या वस्तू व सेवा.
२) देशात उपलब्ध असलेली लोकसंख्या.

बदलत्या कालमानानूसार एखाद्या देशातील लोकांच्या रहाणीमानात मोठ्या प्रमाणात फरक आढळतो. याचे प्रमुख कारण म्हणजे उत्पादकता होय. उत्पादकता म्हणजे प्रती क्षमतास निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांचा दर होय. ज्या देशातील श्रमिकांची उत्पादकता जास्त असते त्या देशातील रहाणीमान उच्च दर्जाचे असते तर ज्या देशातील श्रमिकांची उत्पादकता कमी असते त्या देशातील रहाणीमान हलक्या दर्जाचे असते. त्याचप्रमाणे उत्पादनवाढीचा दर उच्च असताना सुद्धा रहाणीमानाचा दर्जा खालावलेला आढळतो याचे कारण म्हणजे -

१) त्या देशातील लोकसंख्या वाढीचा वेग उत्पादन वाढीचा वेगापेक्षा जास्त असते. या देशांना लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा उत्पादन वाढीचा दर उच्च ठेवण्यात अपयश आलेले असते.
२) रहाणीमानाचा दर्जा खालावण्याचे आणखी एक कारण म्हणजे युद्ध, नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थिरता इत्यादी.
३) परदेशातील वेगाने बदलणारे रहाणीमान होय.

रहाणीमानाचा दर्जा उच्च ठेवण्यासाठी काही देश उत्पादनवाढीचा वेगावर लक्ष केंद्रित करतात. परंतू ठराविक लोकांच्या रहाणीमानाचा दर्जा उच्च असतो. बाकी लोक सर्वसामान्य जीवन जगत असतात. परंतू सरासरी रहाणीमानाचा दर्जा उच्च आढळतो.

रहाणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी देशातील नियोजनकारकाना उत्पादकता वाढवावी लागते. यासाठी कामगारांना चांगले प्रशिक्षण द्यावे लागते. नवीन तंत्रज्ञानाचा वापर शक्य होण्यासाठी अधिक भांडवल निर्मिती करावी लागते. कामगारांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवावे लागते. म्हणजे नियोजनकारकाना भौतिक आणि मानवी भांडवलात गुंतवणूक करावी लागते.

ज्या देशातील कामगार प्रतिश्रमतास जास्त प्रमाणात वस्तू व सेवा निर्माण करतात त्या देशातील लोकांचे रहाणीमान उच्च असते. थोडक्यात देशातील रहाणीमानाचा दर्जा हा त्या देशाच्या राष्ट्रीय उत्पादनावर अवलंबून असतो.

उदाहरण १

- अमेरिकेमध्ये उत्पादन वाढीचा दर उच्च आहे.
- अमेरिकन नागरिकांना वेतन उच्च मिळते.
- वेतनदर उच्च असल्यामुळे अमेरिकन नागरिकांचा रहाणीमानाचा दर्जा उच्च आहे.
- अमेरिकन लोक गाडी, T.V. खरेदी करु शकतात आणि उच्च वेतनामुळे पोष्टिक अन्न, फळे, दुध, अंडी, मांस अधिक खरेदी करतात. स्वाभाविक अमेरीकन नागरिकांचा रहाणीमानाचा दर्जा उच्च असतो.

**प्रश्न :** तुम्ही आणि तुमच्या आईवडिलांच्या किंवा आजी आजोबाच्या रहाणीमानाचा दर्जामध्ये फरक आहे का ? फरक असल्यास हा फरक का निर्माण झाला ?

- रहाणीमानाचा दर्जात होणारा बदल बऱ्याच वर्षानंतर झाला आहे.
- देशाच्या उत्पादन क्षमतेत वाढ झाली आहे.
- पहिल्या पिढीपेक्षा या पिढीत शिक्षणाचा दर्जा उच्च असल्याने वेतन दर उच्च आहे.
- वेतनदर उच्च असल्याने उत्पन्न पातळीत वाढ झाली आणि या पिढीतील व्यक्ती अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, मनोरंजन, आरोग्य हे घटक उच्च दर्जाचे उपभोगू लागले. त्यामुळे त्यांचा रहाणीमानाचा दर्जा उच्च आहे. थोडक्यात या पिढीजवळ उच्च दर्जाचे शिक्षण असल्याने उत्पादकतेत वाढ झाली. त्यामुळे पहिल्या पिढीपेक्षा रहाणीमानाचा दर्जा उच्च आढळतो.

**उपक्रम :**

१) तुमच्या पालकांशी व घरातील वृद्ध लोकांशी चर्चा करा आणि त्यांच्या पिढीपासून ते तुमच्या पिढीपर्यंत रहाणीमानात काय बदल झाले यावर दस्ताऐवज तयार करा.

२) तुम्हाला काय वाटते, जर तुमच्या जीवनातील रहाणीामानात झालेल्या सुधारणेचा समाजातील सर्व घटकांना फायदा होईल ? तुमच्या उत्तराला पुरावा द्या.

## २.६ चलन संस्थेतील वाढ आणि स्फिती (INCREASE IN CURRENCY SYSTEM AND INFLATION)

**तत्त्व - ९ ज्यावेळी सरकार मोठ्या प्रमाणात चलननिर्मिती करते त्यावेळी किंमतवाढ घडून येते.**

**Principle 9 - Prices Rise when Government Prints too much money.**

देशात गरिबी मोठ्या प्रमाणात असेल तर सर्वसाधारणपणे असा विचार केला जातो कि लोकांकडे पैसे नाहीत. खरेदी शक्ती नाही म्हणून लोक गरीब आहेत. अशा परिस्थितीत बँकांनी मोठ्या प्रमाणात नोटा छापून गरीबांना वाटल्या तर गरिबी दूर होईल का? गरिबी दूर होणार नाही. कारण जर अधिक नोटा छापून गरिबांच्या हातात पैसा आला. त्यामुळे गरिब व्यक्ति जीवनावश्यक वस्तूना मोठ्या प्रमाणात मागणी करतील. परंतू पैशाचा पुरवठा ज्या प्रमाणात वाढला त्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा वाढणार नाही. त्यामुळे जास्त पैसा कमी जीवनावश्यक वस्तूचा पाठलाग करेल. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होईल. वाढत्या किंमतीला जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे सर्वसामान्य नागरिकांना परवडणार नाही. आणि स्वाभाविकपणे जीवनावश्यक वस्तू आणि सेवांपासून गरिब व्यक्ति वंचित राहतील.

प्रत्यक्षात जेव्हा अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवठ्यात वाढ होते तेव्हा वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात. पण जर उत्पादन साधने पूर्ण रोजगार अवस्थेत नसतील तर वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादन साधने उपयोगात येतात त्यामुळे वस्तू व सेवाच्या उत्पादनात वाढ होते. त्याचप्रमाणे उत्पादन साधनाच्या वापरामुळे रोजगारात देखील मोठ्या प्रमाणात वाढ होते. आणि गरिबी दूर होण्यास मदत होते.

अमेरीकन अर्थशास्त्रज्ञ आयर्विंग फिशर यांनी आपल्या १९११ साली प्रसिद्ध झालेल्या The Purchasig Power Of Money या ग्रंथात चलन संख्यामान सिद्धांत मांडला.

पैशाच्या संख्येत झालेल्या बदलानुसार त्याच प्रमाणात किंमत पातळीत बदल घडून येतो. फिशरच्या मते, "इतर परिस्थिती कायम असताना परिचलनातील पैशाच्या संख्येत वाढ झाली असता किंमत पातळीत त्याच प्रमाणात वाढ होते आणि पैशाच्या मूल्यात त्याच प्रमाणात घट होते. पैशाच्या संख्येत घट झाली असता त्याच प्रमाणात किंमत पातळीत घट होते व पैशाच्या मूल्यात वाढ होते." याचाच अर्थ असा कि, पैशाची संख्या दुप्पट झाली असता किंमत पातळी दुप्पट होते व पैशाचे मूल्य निमपट होते. याउलट पैशाच्या संख्येत निम्म्याने घट झाली असता किंमत पातळीही निम्म्याने कमी होते व पैशाचे मूल्य दुप्पट होते.

**उदा.**

१) अर्थव्यवस्थेच्या आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात पैसा असेल तर उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ होईल. उपभोक्ते विविध वस्तुसाठी मागणी वाढवतील. कारण उपभोक्त्याची खरेदी शक्ती वाढेल. अशा स्थितीत पुरवठा जर स्थिर असल्याने उत्पादक मागणी पुरवण्यास असमर्थ ठरतील. म्हणून उत्पादक किंमत वाढवतील व त्याचा परिणाम म्हणजे भाववाढ होईल.

**क्रिया :** भाववाढ म्हणजे काय?

काही विशिष्ट कालखंडाकरता वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ होते त्याला भाववाढ म्हणतात.

- भाववाढ होते तेव्हा वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात पण पैशाचे मूल्य घटते.
- उपभोक्ते वस्तू व सेवांची खरेदी कमी करतात.

- चलनातील पैशाच्या संख्येत ज्या प्रमाणात वाढ होते त्या प्रमाणात किंमतपातळी वाढते व अर्थव्यवस्थेत भाववाढीची परिस्थिती निर्माण होते.

**उदाहरण - २**

अर्थव्यवस्थेत जर खूप शिंपी बेरोजगार असतील. शिंप्याकडे कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा असेल. अशा स्थितीत सरकारने बँकेला सांगून पैशाची छपाई केली आणि हे जादा पैसे गरिबाच्या हातात दिले तर काय होईल ?

**उत्तर -**

- गरिबांच्या हातात पैसा आल्याने गरिब व्यक्ती ती रक्कम कपडे खरेदीसाठी वापरतील.
- शिंप्याला वाढीव मागणी मिळेल.
- शिंप्याला काम मिळाल्याने रोजगार वाढेल.
- रोजगारात वाढ झाल्याने गरिबाना उत्पन्न मिळेल आणि गरीब व्यक्ती आपला पैसा कपड्यावर खर्च करतील. तेव्हा शिंप्याकडे न वापरलेले जे कपडे असतील ते संपतील. पण त्यानंतर मात्र मागणी वाढली तर किंमती वाढतील.
- थोडक्यात अशा प्रकारे पैशाचा वाढता पुरवठा बाजारातील वस्तूची किंमत वाढवतो आणि सर्वात महत्त्वाचे हातात पैसा आला तरी गरीब व्यक्ति सर्वच पैसा कपड्यावर खर्च करणार नाही.

## २.७ स्फिती आणि बेरोजगारी (INFLATION AND UNEMPLOYMENT)

**तत्त्व - १० स्फिती आणि बेरोजगारी यातील अल्पकालीन परिणाम वाटपाला समाजाला तोंड द्यावे लागते.**


### Principle 10 - Society faces a short-run trade off between inflaction and unemployment.

महागाई आणि बेकारी यातील अन्योन्य संबंध आपणास वाढत्या बेरोजगारीचा दर हा महागाई वाढवतो असे स्पष्ट करते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे प्रा. ए. डब्ल्यू, फिलिप्स यांनी १९५८ मध्ये (इ.स. १८६१-१९५७ या काळातील) इंग्लडमधील वेतन दरातील बदलाचा सखोल अभ्यास केला. या अभ्यासात त्यांना इंग्लंडमध्ये वार्षिक भाववाढ व वार्षिक बेरोजगारी यात निकटचा संबंध असल्याचे आढळते. प्रा. ए. डब्ल्यू फिलिप्स यांनी भाववाढ व बेरोजगार यातील व्यस्त संबंध स्पष्ट केला आहे. म्हणजेच जेव्हा भाववाढ उच्च पातळीवर असते तेव्हा बेरोजगारीचे प्रमाण अल्प असते. याउलट जेव्हा भाववाढ उच्च पातळीत असते तेव्हा बेरोगगारीचे प्रमाण अत्यल्प असते. तेव्हा बेरोजगारी प्रचंड असते. या दोन्ही समस्यांवर उपाय शोधताना सरकारला पुढील निर्णय घ्यावे लागतात.

- सरकारला बेरोजगारीवर नियंत्रण आणायचे आहे तर त्यांना भाववाढ सोसावी लागते.
- भाववाढ नियंत्रणात आणायची तर बेरोजगारी सहन करावी लागते.

- भाववाढ व बेरोजगारी यात परस्परविरोधी संबंध असल्याने भाववाढीवर संपूर्ण नियंत्रण ठेवता येत नाही किंवा बेरोजगारीचे समूळ उच्चाटण करता येत नाही.
- सरकारला भाववाढ सहन करुन काही प्रमाणात बेरोजगारीवर नियंत्रण मिळविणे शक्य आहे.

भाववाढ आणि बेरोजगारी यातील परस्पर व्यस्त संबंध व्यक्त करण्यासाठी फिलिप्स यांनी एका वक्राचा वापर केला त्या वक्राला फिलिप्स वक्र म्हणतात.




**आकृती २.१ बेरोजगारीचा दर - फिलिप्स वक्रातील समायोजन**

आकृतीत OX अक्षावर बेरोजगारीचा दर OY अक्षावर भाववाढ दर्शविली आहे. भाववाढ शून्य पातळीवर आहे. R हा मूळचा समतोल बिंदू आहे. समजा सरकारने विस्तारीत मौद्रिक धोरण आकारले तर समग्र मागणीत वाढ होईल. त्यामुळे उत्पादनात वाढ होईल. म्हणून अर्थव्यवस्था P बिंदूत जाईल. P बिंदूतील भाववाढ ही R बिंदूतील भाववाढी पेक्षा जास्त आहे. स्वाभाविक वस्तूच्या किंमतीत वाढ होईल. परंतू समग्र मागणीत वाढ झाल्याने उत्पादनात वाढ होऊन रोजगारात वाढ होईल. बेरोजगारीचा दर नैसर्गिक बेरोजगारीचा दर (M) पेक्षा कमी होईल. अशा प्रकारे P बिंदूत बेरोजगारी R बिंदूपेक्षा कमी मात्र भाववाढ अधिक राहील. मात्र येथे स्थिरता होतेच असे नाही.

**सारांश :**

- कमी बेरोजगारी जास्त भाववाढ.
- बेरोजगारी व भाववाढ व्यस्त संबंध
- भाववाढ नियंत्रणासाठी मौद्रिक धोरणाचा अवलंब, बेरोजगारी, वेतनवाढ आणि भाववाढ यांच्यातील सममूल्यन किंवा परिणाम वाटप.

ज्यावेळी बेकारीचा दर कमी असतो. त्यावेळी वेतनवाढीचा दर जास्त असतो. याउलट बेरोजगारीचा दर जास्त असताना वेतनवाढीचा दर कमी असतो. श्रमासाठी असणारी मागणी परोक्ष स्वरुपाची असते. अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा दर मागणीचे प्रतिबिंब मानता येते. फिलिप्स वक्र हा बेरोजगारीचा दर व भाववाढ यातील संबंध स्पष्ट करतो.

**उदाहरण - १**

- २००८-२००९ मध्ये अर्थव्यवस्थेमध्ये अमेरीकेच्या वित्तीय अरिष्ट आले.
- वित्तीय व्यवस्था कोसळली आणि शेअर्स मार्केट तोट्यात गेले.
- बेरोजगारीत वाढ झाली USA सरकारने करात घट केली आणि सार्वजनिक खर्चात वाढ केली.
- Apex बँकेने USA मधील पैशाच्या पुरवठ्यात वाढ केली.
- उद्दिष्ट्ये बेरोजगारी कमी करणे हे होते.

**क्रिया :**

अमेरिकन सरकारने अधिक आलेला पैसा व्यवसायात गुंतवला. पैशाचा वापर नवीन फॅक्टरी सुरु करण्यासाठी केला. त्यामुळे उत्पादनक्षमते मध्ये वाढ झाली. याचा फायदा कोणाला झाला ? समाजाला उत्पादनात वाढ झाली म्हणून फुकट जेवण मिळाल का ?

- अमेरिकने अधिक पैसा बचत करुन फॅक्टरीमध्ये गुंतवला त्यामुळे उत्पादनक्षमता वाढली.
- स्वाभाविक अधिक उत्पादन करण्यासाठी श्रमिकांच्या रोजगारात वाढ झाली.
- श्रमिकांच्या वेतन दरात वाढ झाली.
- श्रमिकांना अधिक वेतन मिळाल्याने श्रमिकांनी आपला उपभोग खर्च वाढविला आणि पाहिजे त्या वस्तू खरेदी केल्या.

अशा प्रकारे अल्पकाळात बेरोजगारी, वेतनवाढ, भाववाढ यातील दुहेरी संबंध दिसून येतो. सरकार खर्च रक्कमेत बदल करुन कराच्या दरात बदल करुन आणि नवीन नोटांची निर्मिती करुन चलनस्फिती आणि बेरोजगारी यांचा एकत्रित परिणाम साधण्याचा प्रयत्न करते. मौद्रिक व राजकोषीय धोरणाच्या यशस्वी परिणामकारकतेवर अर्थव्यवस्थेचे यश अवलंबून असते.

## २.८ समारोप (CONCLUSION)

अत्याधुनिक गुंतागुंतीचा आणि प्रभावी आर्थिक विश्लेषणासाठी अर्थशास्त्राच्या तत्वाचा वापर केला जातो.

सदर प्रकरणामध्ये लोक परस्परांशी सुसंवाद कसा साधतात याविषयी आपण पुढील तीन तत्वाचा अभ्यास उदाहरणाच्या सहाय्याने केला आहे ती तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

तत्व - ५ व्यापार प्रत्येकासाठी चांगला असतो.

तत्व - ६ आर्थिक उपक्रम बाजाराच्या माध्यमातून आयोजित करणे अधिक कार्यक्षम असते.

तत्व - ७ खाजगी बाजाराचे उत्पादन सुधारण्यात सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

समग्र अर्थव्यवस्था कशी कार्य करते या संदर्भात महत्त्वाच्या असणाऱ्या तीन तत्वाचा अभ्यास देखील आपण या प्रकरणात केला आहे ती तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

तत्व - ८ देशातील लोकांचे रहाणीमान वस्तू आणि सेवांच्या निर्मिती क्षमतेवर अवलंबून असते.

तत्व - ९ ज्यावेळी सरकार मोठ्या प्रमाणात चलननिर्मिती करते त्यावेळी किंमतवाढ घडून येते.

तत्व - १० स्फिती आणि बेरोजगारी यातील अल्पकालीन परिणाम वाटपाला समाजाला तोंड द्यावे लागते.

## २.९ सरावासाठी प्रश्न (PRACTICE QUESTIONS)

१) व्यापार सर्वांसाठी चांगला असतो उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.

२) लोक परस्परांशी सुसंवाद कसा साधतात हे सांगणारी अर्थशास्त्राची दोन तत्वे स्पष्ट करा.

३) समग्र अर्थव्यवस्था कशी कार्य करते हे सांगणारी अर्थशास्त्राची दोन तत्वे स्पष्ट करा.

४) आर्थिक व्यवहाराचे संघटन करण्यात बाजार यंत्रणेची भूमिका स्पष्ट करा.

५) लोकांचे राहणीमान वस्तू व सेवांच्या उत्पादनांशी कसे संबंधित असते ते स्पष्ट करा.

६) चलन संख्येतील वाढ आणि स्फिती यातील संबंध स्पष्ट करा.

७) चलन स्फिती आणि बेरोजगार यातील अल्पकालीन परिणाम वाटप स्पष्ट करा.

८) टिप लिहा.

   १) खाजगी बाजार आणि सरकारची भूमिका

   २) चलनवाढ आणि किंमतवाढ संबंध

   ३) स्फिती आणि बेरोजगार

   ४) बाजारयंत्रणेचे अपयश

❖❖❖❖

मॉड्यूल २

# घटक - ३

# अर्थशास्त्र आणि त्याच्या पद्धती
# (ECONOMICS AND ITS METHODS)

**घटक रचना :**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ वैज्ञानिक पद्धत
३.२ गृहितकाची भूमिका आणि महत्त्व
३.३ आर्थिक प्रतिमाने
३.४ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह
३.५ उत्पादन शक्यता वक्र
३.६ सूक्ष्म अर्थशास्त्र
३.७ समग्र अर्थशास्त्र
३.८ वस्तूनिष्ठ अर्थशास्त्र आणि आदर्शवादी अर्थशास्त्र
३.९ सारांश
३.१० सरावासाठी प्रश्न

## ३.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- अर्थशास्त्रातील पद्धतीचा अभ्यास करणे.
- गृहीतकाचे महत्त्व समजावून घेणे.
- उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह व उत्पादन शक्यता वक्र अभ्यासणे.
- सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र फरक अभ्यासणे.
- वस्तुनिष्ठ अर्थशास्त्र आणि आदर्शवादी अर्थशास्त्र यातील फरक समजावून घेणे.

## ३.१ वैज्ञानिक पद्धती (The Scientific Method)

प्राचीन काळापासून संशोधन आणि मानवी चेनता यात संबंध असल्याचे दिसून येते. संशोधन अथवा शास्त्रीय अभ्यास ही एक दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीनेच केले जाते. संशोधनाच्या दिर्घकालीन प्रक्रियेचा विचार करताना

शास्त्रीय पद्धतीच्या क्रमबद्ध पायऱ्यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. वैज्ञानिक पद्धतीच्या पायऱ्यांमध्ये शास्त्रज्ञांमध्ये मतभिन्नता असली तरी वैज्ञानिक पद्धतीच्या काही सर्वसामान्य पायऱ्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

१) **समस्यासूत्रण** - संशोधकाला कोणत्या विषयाचे संशोधन करावयाचे आहे हे निश्चित करावे लागते. आपल्या अभ्यासाचे क्षेत्र आणि संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या सामान्य विषयाचे क्षेत्राचे विशिष्ट संशोधन समस्येत रुपांतर करावे लागते. समस्यासूत्रण करताना संशोधनकर्त्याला आपल्या विषयाची व्याप्ती व कालावधी किती राहील हे निश्चित करावे लागते. त्यासाठी आवश्यक ती आकडेवारी जमा करावी लागते.

२) **माहिती जमा करणे** - समस्येशी संबंधित घटकांची माहिती प्राथमिक आणि दुय्यम तथ्य संकलन पद्धतीच्या आधारे मिळवली जाते.

३) **गृहितकृत्याची मांडणी करणे** - गृहितकृत्याची निर्मिती करणे हा शास्त्रीय संशोधनातील दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे. गृहितकृत्यामुळे संशोधकाचे श्रम, वेळ, पैसा या सर्वांचीच बचत होते. गृहितकृत्य हे सैद्धांतिकदृष्ट्या स्पष्ट सोपे, विशिष्ट संशोधन समस्येच्या संदर्भात अनुकूल व निरीक्षणक्षम असले पाहिजे.

४) **संशोधन आराखडा** - संशोधन आराखडा हे संशोधन कार्याचे नियोजन आहे. शास्त्रीय संशोधनाची रुपरेषा निश्चित करणे म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखड्यामध्ये तथ्य संकलन केले जाते आणि तर्कशुद्ध विश्लेषण केले जाते.

५) **नमुना निवड** - नमुना निवड ही संशोधन प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण पायरी आहे. नमुना योग्य व प्रतिनिधीक स्वरुपाचा असेल तर निष्कर्ष योग्य येतील.

६) **तथ्यांचे संकलन** - संशोधक जेव्हा आपल्या संशोधनासाठी आवश्यक ती माहिती ज्या पद्धतीने गोळा करतो त्याला तथ्य संकलन पद्धती म्हणतात.

७) **तथ्यांचे वर्गीकरण** - तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्याचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. तथ्य संकलन योग्य प्रकारे झाले तर संशोधकाला निश्चित उद्दिष्टापर्यंत पोहचता येते.

८) **निष्कर्ष मांडणे** - मांडलेले गृहितकृत्य बरोबर आहे कि नाही हे संकलित केलेल्या माहितीच्या आधारे तपासून पहावे लागते. गृहितकृत्य संशोधन कर्त्याच्या निष्कर्षाच्या कसोटीस उतरले तर ते गृहितकृत्य स्वीकृत असते. असा गृहीतकृत्यास सिद्धांताचे स्वरुप प्राप्त होते.

९) **सिद्धांताची मांडणी** - निष्कर्षाचे निर्वचन संशोधन प्रक्रियेतील ही शेवटची पायरी होय. बौद्धिक प्रक्रियेद्वारे तथ्यांचे किंवा घटनांचे स्वरुप प्रगट करुन त्यातील संबंधाना यथायोग्य प्रकारे स्पष्ट करणे म्हणजे निष्कर्षाचे निर्वचन होय.

वरील विश्लेषणावरुन शास्त्रीय संशोधन पद्धती ही विज्ञाननिष्ठ म्हणजेच वैज्ञानिक आहे. तसेच संशोधन ही एक प्रक्रिया असून त्यात अनेक पायऱ्याचा समावेश आहे. वैज्ञानिक संशोधन पद्धतीही एक निष्पक्ष व विश्वसनीय संशोधन पद्धती आहे.

## ३.२ गृहितकाची भूमिका आणि महत्त्व (THE ROLE OF THE ASSUMPTIONS)

अर्थशास्त्रात समाजाच्या आर्थिक वर्तनासंबंधीचे अनेक विचार व सिद्धांत प्रत्ययास येतात. अर्थशास्त्रातील सिद्धांत हे गृहितकांवर आधारित असतात. अर्थशास्त्रातील सिद्धांत अवास्तव गृहितकावर आधारित असतील तर ते सिद्धांत प्रत्यक्ष वापरात येणे अवघड असते. अर्थशाास्त्रीय विश्लेषणात वास्तव व अवास्तव अशी गृहितके आढळतात. अवास्तव गृहितकांमुळे अर्थशास्त्रातील सिद्धांतावर टिका होते. सिद्धांताचे महत्त्व कमी होते.

गृहितके वापरुन अर्थशास्त्रज्ञ सिद्धांताची रचना करतात ते समाजातील गुंतागुंतीच्या वास्तवाचे वैचारिक विश्लेषण करतात. अर्थशास्त्रात अनेकदा दोन किंवा अधिक चलांतील संबंध व्यक्त केला जातो. अशावेळी इतर परिस्थिती स्थिर मानल्यास इतर अनेक घटकांचा मूळ चलावरील प्रभाव दूर करणे शक्य होते. निरनिराळ्या चलांमधून आवश्यक त्या चलांना घेऊन अनावश्यक ते चल स्थिर मानून सिद्धांत स्पष्ट केले जातात.

CeTeris Peribus या संज्ञेचा अर्थ इतर परिस्थिती स्थिर असणे असा आहे. Ceteris Peribus हा लॅटिन भाषेतील शब्द आहे. आर्थिक विश्लेषणाची प्रक्रिया सोपी होण्यासाठी व एका स्वतंत्र किंवा काही घटकांचा अभ्यास करताना इतर परिस्थीत बदल होता कामा नये म्हणून Ceteri's ही संकल्पना कार्यान्वित झाली.

प्रा. केन्स "इतर परिस्थिती कायम हे एक असे विवेचन आहे की ज्या विवेचनात काही विशिष्ट प्रकारच्या बदलास मान्यता दिली जाते. परंतू सर्वसामान्य आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती स्थिर आहे. असे मानून विवेचन केले जाते."

अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र असल्याने त्यातील सर्वच सिद्धांत सर्वच काळात खरे ठरणारे नसतात तर ते गृहितकांवर अवलंबून असतात. म्हणून अर्थशास्त्रातील विविध संकल्पना व सिद्धांत स्पष्ट करताना इतर परिस्थिती स्थिर आहे असे गृहित धरले जाते.

मागणीचा सिद्धांत मांडताना म्हणजे किंमत व मागणी यातील व्यक्त संबंध स्पष्ट करताना लोकांच्या आवडी-निवडी उपभोक्त्याचे उत्पन्न, लोकसंख्या इ. मागणीवर परिणाम करणाऱ्या गोष्टी स्थिर आहेत असे मानले जाते. यालाच अर्थशास्त्रीय भाषेत इतर परिस्थिती कायम असताना असे म्हणतात.

**गृहितकांचे गुण -**

१) अर्थशास्त्रीय विश्लेषणात सोपेपणा येतो.
२) भविष्यकाळात अंदाज व्यक्त करण्यासाठी उपयुक्त.

३) प्रत्यक्ष व्यवहारातील समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त.
४) उद्योगसंस्था उपभोक्ता इ. वैयक्तिक घटकांच्या वर्तणूकीचा अभ्यास करता येतो.

**गृहितकांच्या मर्यादा** -

१) गृहितकामुळे आर्थिक विवेचन स्थितीशील बनते. गतिमान जगात अर्थव्यवस्थेत अनेक बदल होतात त्यामुळे या विश्लेषणाला मर्यादा पडतात.
२) आर्थिक विश्लेषण अवास्तव होते.
३) अनेक वेळा अस्थिर असलेल्या घटकांस या तत्वात स्थिर मानले जाते.
४) इतर परिस्थिती कायम असते या गृहितकांवर आधारलेल्या सिद्धांतामुळे एखाद्या आर्थिक घटनेचे संपूर्ण स्पष्टीकरण मिळत नाही. संपूर्ण स्पष्टीकरण मिळण्यासाठी सर्व घटकांचा एकाचवेळी अभ्यास करणे आवश्यक ठरते.

इतर परिस्थिती कायम असणे या गृहितकावर मर्यादा पडत असल्यातरी गुंतागुंतीच्या घटनांचे स्पष्टीकरण करण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग होतो म्हणून अर्थशास्त्रातील या गृहितकाचे महत्त्व नाकारुन चालणार नाही.

## ३.३ आर्थिक प्रतिमाने / प्रारुपे (ECONOMIC MODELS)

अर्थशास्त्राच्या विकासात आर्थिक प्रतिमानांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अर्थशास्त्रातील प्रतिमाने ही इतर कोणत्याही शास्त्रापेक्षा सोपी आहेत. आर्थिक प्रश्न व त्यांचे इतर घटकांशी असलेले संबंध गुंतागुंतीचे असतात म्हणून त्यांचे विश्लेषण करण्यासाठी प्रतिमानाची गरज असते.

आर्थिक प्रतिमाने ही व्यक्तिच्या वर्तणुकीवर आधारीत असल्यामुळे व व्यक्तिचा स्वभाव परिस्थितीनुसार बदलणारा असल्यामुळे आर्थिक प्रतिमाने गणिती प्रतिमाना एवढी खरी ठरत नाहीत. तरीसुद्धा आर्थिक प्रतिमाने ही इतर सामाजिक शास्त्रापेक्षा अधिक काटेकोर व वास्तव असतात.

आर्थिक प्रतिमानाचा वापर आर्थिक विश्लेषणासाठी केला जातो. अर्थशास्त्रामध्ये आर्थिक प्रश्न कसा सोडविला जाईल या संदर्भात विश्लेषण केले जाते. याचाच अर्थ आर्थिक प्रतिमाने आर्थिक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तयार केलेली असतात.

**व्याख्या :**

१) आर्थिक प्रतिमान म्हणजे निरनिराळ्या आर्थिक चलघटकातील परस्पर संबंधाचा संच होय.
२) प्रा. किंडर बर्जर - प्रतिमानात दोन आर्थिक चल घटकातील संबंध विचारात घेऊन तो संबंध आकृती, समीकरणे यांच्या सहाय्याने दाखविला जातो.

अर्थशास्त्रातील प्रतिमाने आकृत्या, समीकरणे व गणिती साधने यांच्या सहाय्याने तयार केली जातात. या प्रतिमानामध्ये सर्वच तपशील बारकाईने दाखविले जातात असे नाही. उदा.

अर्थव्यवस्थेचे प्रतिमान मांडले जात असताना त्यामध्ये अर्थव्यवस्थेची सर्वच लक्षणे समाविष्ट केली जातात असे नाही. ही सर्व प्रतिमाने गृहितांच्या आधारे तयार केली जातात.

पॉल सॅम्युअलसन् यांच्यामते वास्तव गृहिते आणि प्राकथन क्षमता यांवर समाधानकारक प्रतिमानाची योग्यता अवलंबून असते. अर्थतज्ञांमध्ये सर्वसामान्य दृष्टीकोन असा आहे की आर्थिक प्रतिमानाची योग्यता त्या प्रतिमानाच्या उद्देशावर अवलंबून असते. म्हणजेच आर्थिक प्रतिमान स्पष्टीकरण करणारे आहे की निदानात्मक आहे यावरुन आर्थिक प्रतिमानाची योग्यता ठरते.


**मर्यादा :**

१) एखाद्या चलघटकावर एकाचवेळी अनेक घटक परिणाम करत असताना सर्वच घटकाचा विचार केला जात नाही. तर ठराविक घटकाचा विचार करुन इतर घटक स्थिर आहेत असे गृहित मानले जाते त्यामुळे आर्थिक प्रतिमानाचे महत्त्व कमी होते.

२) आर्थिक चलघटकामध्ये स्थलकाल परत्वे बदल घडून येतात. दोन वेगवेगळ्या कालखंडात एखाद्या आर्थिक चलघटक स्थिर असू शकत नाही. त्याचप्रमाणे दोन वेगवेगळ्या ठिकाणी आर्थिक चलघटकात फरक दिसून येतो.

## ३.४ उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह (CIRCULAR FLOW OF INCOME)

उत्पन्नाच्या चक्रिय प्रवाह हा एक सिद्धांत आहे. याठिकाणी अर्थव्यवस्थेच्या दोनच घटकांचे प्रतिमान विचारात घेतले जाते. वास्तविक अर्थव्यवस्था ही मोठी गुंतागुंतीची व जटील आहे. जर आपण अर्थव्यवस्थेतील सर्वाचे संबंध एकत्र घेतले तर तो सिद्धांत होणार नाही म्हणून उद्योगसंस्था व कुटुंबे या दोन घटकामध्ये राष्ट्रीय उत्पन्न चक्राकार पद्धतीने कसे फिरते ते स्पष्ट करुन प्रत्यक्षात अर्थव्यवस्था कशी काम करते ते समजावून घेता येते.




**आकृती ३.१ उत्पन्नाचा चक्रिय प्रवाह**

वस्तूचे उत्पादन करण्यासाठी उद्योगसंस्था कुटूंबाकडून भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे उत्पादनाचे चार घटक विकत घेतात या घटकांना उत्पादन खर्च म्हणून खंड, वेतन, व्याज, नफा या स्वरुपात उत्पन्न देतात. त्यामुळे उत्पन्नाचा प्रवास सुरु होतो. उद्योगसंस्था उत्पादन घटकाच्या सहाय्याने वस्तूचे उत्पादन करतात. ह्या वस्तू व सेवा उद्योगसंस्था बाजारात नेऊन विक्री करतात. म्हणजेच उपभोग खर्च हा उद्योगसंस्थांना प्राप्ती मिळवून देतो.


कुटूंबाकडून उपभोग खर्चाच्या स्वरुपात मिळालेली प्राप्ती उद्योगसंस्था उत्पादन घटक खरेदीसाठी वापरतात तर उद्योगसंस्थाकडून उत्पादन खर्चाच्या स्वरुपात मिळालेले उत्पन्न कुटुंबे वस्तू व सेवा खरेदीसाठी वापरतात. अशाप्रकारे उद्योगसंस्था अखंडपणे उत्पादनाचे कार्य सुरु ठेवते.

अशाप्रकारे उद्योगसंस्थांनी केलेला खर्च हे कुटुंबसंस्थेचे उत्पन्न असते तर उद्योगसंस्थांनी तयार केलेले उत्पादन जेव्हा उपभोक्त्यानी किंवा कुटुंबसंस्थांनी वापरले असते त्यासाठी त्यांना काही मोबदला उद्योगसंस्थांना द्यावा लागतो. म्हणजेच कुटुंबसंस्थेचा खर्च हे उद्योगसंस्थेचे उत्पन्न असते. परिणामी उद्योगसंस्थेचे उत्पन्न हे कुटुंबसंस्थेच्या खर्चावर अवलंबून असते. अशाप्रकारे उत्पन्नाचा प्रवाह हा अखंडपणे उत्पादनसंस्था ते कुटुंबे आणि कुटुंबे ते उत्पादनदसंस्था असा सुरु असतो यालाच उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणतात.

## ३.५ उत्पादन शक्यता वक्र (PRODUCTION POSSIBILITY CURVE)

वस्तूच्या उत्पादनासाठी वापरले जाणारे घटक म्हणजे आदाने होय. एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी आदानांचा वापर केला जातो. सर्वसामान्यपणे आदाने कमी प्रमाणात उपलब्ध असतात. बहुतेक आर्थिक प्रतिमानामध्ये गणिती साधनांचा वापर केला जातो. या ठिकाणी आपण उत्पादन शक्यता वक्र हे असे प्रतिमान अभ्यासणार आहोत की जे मुलभूत आर्थिक स्पष्टीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

**उदाहरण :** देशातील उत्पादनाचे प्रमाण वाढविण्यासाठी नागरिकांना शैक्षणिक व आरोग्य विषयक सेवांचा पुरवठा करणे गरजेचे असते. त्यामुळे देशाच्या जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावर खर्चाचा बोजा वाढतो. तरीदेखील देशाने आरोग्य सेवा वाढविण्याचा निर्णय घेतला तर त्या देशाला शैक्षणिक सेवावरील खर्च कमी करावा लागेल. थोडक्यात उत्पादन शक्यता वक्र व शैक्षणिक सेवावरील खर्च आणि आरोग्य सेवावरील खर्च यात विरुद्ध संबंध दर्शवितो.




**आकृती ३.२**

वरील आकृतीच्या OX अक्षावर आरोग्य सेवावरील खर्च तर OY अक्षावर शैक्षणिक सेवावरील खर्च दर्शविला आहे.

जर सर्व आदाने शैक्षणिक सेवावर खर्च केलीतर OA शैक्षणिक सेवाचे उत्पादन शक्य होते आणि सर्व आदाने आरोग्य सेवावर खर्च केली तर OF आरोग्य सेवाचे उत्पादन शक्य होते.


बिंदू G वरील शैक्षणिक सेवा व आरोग्य सुविधांचे एकत्रित उत्पादन उपलब्ध साधनसामग्री व तंत्रज्ञानामुळे अशक्य आहे तर D बिंदूतील उत्पादन म्हणजे उपलब्ध कार्यक्षमतेपेक्षा कमी उत्पादन होय त्यास अकार्यक्षम उत्पादन म्हणतात.

जर $OY_4$ शैक्षणिक सुविधाचे उत्पादन झाले तर $OX_1$ आरोग्य सेवाचे उत्पादन होते तर शैक्षणिक सेवांचे उत्पादन $OY_3$ झाले तर आरोग्य सेवांचे उत्पादन वाढते आणि $OX_2$ होते आणि जर शैक्षणिक सेवाचे उत्पादन $OY_1$ झाले तर आरोग्य सेवांचे उत्पादन $OX_4$ होते.

अशाप्रकारे उत्पादन शक्यतावक्र मर्यादित साधन संपत्तीचा कार्यक्षम वापर करुन भिन्न उत्पादनामध्ये कशाप्रकारे अन्योन्य संबंध होतो ते स्पष्ट करतो.

थोडक्यात उत्पादन शक्यता वक्र अर्थव्यवस्था शैक्षणिक सुविधा मिळविण्यासाठी आरोग्य सुविधा किती प्रमाणात कमी कराव्या लागतात याचे स्पष्टीकरण देतो.

१) जर अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानामध्ये विकास झाल्याने समाजात वाढीव प्रत्येक आरोग्य सेवांच्या जोडीला शैक्षणिक सेवाचे उत्पादन वाढविण्याचा निर्णय घेतला जात असेल तर उत्पादन शक्यता वक्र पुढीलप्रमाणे असेल.





**आकृती ३.३**

जर कुशल श्रमीक, नवीन उत्पादन तंत्र, नवीन शोध यात वाढ झाली आणि उत्पादनासाठी याचा वापर अधिक केला तर उत्पादनात वाढ होते त्यामुळे मूळचा उत्पादन शक्यता वक्र उजवीकडे सरकतो.

AB या उत्पादन शक्यता वक्रापेक्षा $A_1B_1$ या वक्रावर शैक्षणिक सेवा आणि आरोग्य सेवा यांचे जास्त उत्पादन होते.


**उत्पादन शक्यता वक्र आणि संधी खर्च :**

१) जर अर्थव्यवस्था साधनसामग्रीचा वापर शैक्षणिक सुविधासाठी जास्त करीत असेल आणि आरोग्य सुविधावर कमी करत असेल तर उत्पादन शक्यता वक्र तीव्र उताराचा असतो.




**आकृती ३.३**

२) जर अर्थव्यवस्था साधनसामग्रीचा वापर शैक्षणिक सुविधासाठी कमी करीत असेल आणि आरोग्य सुविधासाठी जास्त करीत असेल तर उत्पादन शक्यता वक्र पसरट असतो. पुढील आकृतीत दर्शविला आहे.




**आकृती ३.४**

वरील आकृती शैक्षणिक सेवावरील उत्पादन कमी होत असून आरोग्य सेवावरील उत्पादनात वाढ होत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) टिप लिहा उत्पादन शक्यता वक्र.
२) जर अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञानामध्ये विकास झाल्याने समाजात वाढीव आरोग्यवर्धक सेवांच्या समवेत समाज अधिकाधिक शैक्षणिक सेवा उत्पादन करण्याचा निर्णय घेते हे तुम्ही उत्पादन शक्यता वक्राच्या साहाय्याने कसे स्पष्ट कराल.

## ३.६ सूक्ष्म अर्थशास्त्र (MICRO ECONOMICS)

अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धतीचा अभ्यास करताना तो दोन दृष्टीकोनातून केला जातो. त्यातील पहिला दृष्टीकोन सूक्ष्मलक्षी होय. दुसऱ्या दृष्टीकोनास समग्रलक्षी किंवा स्थूल दृष्टीकोन असे नाव दिले जाते. अर्थशास्त्रीय अभ्यासाच्या या पद्धती हळूहळू उत्क्रांत होत गेल्या आहेत. सूक्ष्म आर्थिक विश्लेषण पद्धतीचा वापर हा कालक्रमाने अभिजातवादी अर्थशास्त्रज्ञांच्या काळचा म्हणून अधिक पूर्वीचा मानला जातो. अर्थात १७ ते १९ व्या शतकाच्या काळात इंग्लड, फ्रान्स, जर्मनी, इटली या युरोपियन देशात या अभ्यासपद्धतीचा अधिक प्रमाणात वापर होत होता. परंतू अधूनमधून माल्थस, मार्क्स यांसारख्या अर्थशास्त्रज्ञांनी त्याच्याच जोडीला स्थूल अर्थशास्त्रीय विश्लेषणाचाही वापर केलेला होता. विसाव्या शतकात देखील केन्स्च्या पूर्वी स्विडीश अर्थशास्त्रज्ञ विकसेल, कॅसेल तसेच ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ रॉबर्टसन् हांद्रे यांनीही सूक्ष्म विश्लेषण तंत्राबरोबरच स्थूल अर्थशास्त्राचाही वापर केलेला दिसतो. फ्रान्सच्या निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञ क्वेस्ने याने देखील समग्र अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा मुख्यतः वापर केला होता. अलीकडच्या काळात सर्वच प्रमुख अर्थशास्त्रज्ञ गरज व सोईप्रमाणे या दोन्ही अभ्यास तंत्राचा वापर करतात. अर्थशास्त्रीय अध्ययनामध्ये ह्या दोन्ही संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या असून अर्थशास्त्राच्या उगमापासून अध्ययन करताना या पद्धतीद्वारे अध्ययन करण्यात आले. मूलतः सूक्ष्म (Micro) विश्लेषणाच्या अर्थ लहान घटक भागांचा अभ्यास करणे व स्थूल विश्लेषणाचा (Micro) अर्थ एकूण किंवा समग्र परिस्थिीचा अभ्यास करणे.

### सूक्ष्म अर्थशास्त्र व्याख्या व स्वरुप (Meaning & Nature of Micro Economics) :

अर्थव्यवस्थेतील लहानातील लहान घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणाऱ्या विश्लेषण पद्धतीचा सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्र असे म्हणतात. Micro या ग्रीक भाषेतील शब्दाचा अर्थ अतिशय सुक्ष्म अगर लहानात लहान असा भाग होय. सुक्ष्म अर्थशास्त्रज्ञ, एखाद्या देशातील विशिष्ट

व्यक्ति, विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट उद्योग विशिष्ट वस्तू इत्यादींचा अभ्यास सूक्ष्म पद्धतीने केला जातो. याचाच अर्थ असा की अर्थव्यवस्थेत जे अनेक घटक असतात त्यापैकी एखाद्या विशिष्ट घटकांची चर्चा केली जाते. अर्थव्यवस्थेतील सुक्ष्म घटकाचा अभ्यास करुन त्याच्या वर्तणूकीविषयी विवेचन करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र होय. प्रा. जि. लर्नर यांच्यामते अर्थव्यवस्थेचे जणू काही सूक्ष्म दर्शकातून निरीक्षण करुन अर्थव्यवस्थेच्या शरीरातील प्रत्येक पेशीचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. उदा. उपभोक्त्याची वैयक्तिक वर्तणूक, वैयक्तिक मागणी, वैयक्तिक पुरवठा, एखाद्या उद्योगसंस्थेचा उत्पादन खर्च, वस्तुची किंमत, कामगारांना दिली जाणारी मजूरी, जमीन मालकाचा खंड, भांडवलदारांचे व्याज संयोजकाचा नफा इत्यादीची स्वतंत्रपणे चर्चा केली जाते.

ॲडम स्मिथला सुक्ष्म अर्थशास्त्राचा आद्यप्रवर्तक म्हणतात. कारण १९ व्या शतकात ॲडम स्मिथ पासून सूक्ष्म अर्थशास्त्राचा अभ्यासाची सुरुवात झाली. त्यानंतर रिकार्डो, जे.बी.से. प्रो. मिल, मॉरीस डॉब, बोल्डिंग, डॉ. मार्शल, पिंगू, हिक्स्-प्रो. सॅम्यूएल्सन, श्रीमती जोन रॉबीन्सन इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी याचा विकास केला आहे.

**व्याख्या (Definition) :**

प्रा. बोल्डिंग यांच्या मते, “सुक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे एका विशिष्ट पेढीचा, विशिष्ट कुटुंबाचा, व्यक्तिगत किंमत मजुरी, उत्पन्न, वैयक्तिक उद्योग आणि विशिष्ट वस्तू यांचा अभ्यास होय.”

मॉरिस यांच्या मते, “अर्थव्यवस्थेचे सुक्ष्मदर्शी अध्ययन म्हणजे सुक्ष्म अर्थशास्त्र होय.”

प्रा. लर्नर यांच्यामते, “अर्थव्यवस्थेचा जैविक प्रणालीत एक व्यक्ति किंवा कुटुंब म्हणून उद्योगसंस्था उत्पादकाची भूमिका बजावतात. अर्थव्यवस्थेतील या उलाढालीचे सुक्ष्म दर्शकाखाली निरीक्षण करण्याचा प्रयत्न सुक्ष्म अर्थशास्त्र करते.”

वरील व्याख्याच्या अभ्यासातून खालील गोष्टी लक्षात येतात.

१) सूक्ष्म अर्थशास्त्रात एखाद्या गटाचा अभ्यास केला जातो. तो एकक स्वतंत्र आहे असे मानून अभ्यास केला जातो.
२) कोणत्याही घटकाचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जातो.
३) कोणत्याही एका घटकाचा अभ्यास करताना त्या गटाची व्याख्या सकुंचित केली जाते.

**सुक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये :**

१) सूक्ष्म अर्थशास्त्रात एका घटकाचा अभ्यास केला जातो.
२) सूक्ष्म अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेचे सुक्ष्म पद्धतीने अध्ययन करते.
३) सुक्ष्म अर्थशास्त्रात विशिष्ट घटकाचा अभ्यास करताना महत्तमतेचे तत्व विचारात घेतले जाते.
४) सुक्ष्म अर्थशास्त्र एका गटाचा अभ्यास करताना त्या गटाची व्याख्या संकुचित करीत असते.
५) अभ्यासासाठी घेतलेल्या वैयक्तिक एककावर कार्य करणारे इतर घटकच घटकांच्या कार्याचा त्या एककावर होणारा परिणाम यांचा अभ्यास सुक्ष्म अर्थशास्त्र करते.

थोडक्यात सुक्ष्म अर्थशास्त्रात आर्थिक घटकांचा वैयक्तिक पातळीवर अभ्यास केला जातो म्हणजेच सुक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेचे सुक्ष्म पद्धतीने अध्ययन करणारे शास्त्र आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) सुक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे काय ?

२) सुक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये कोणती ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**सुक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व (Significance of Micro Economics) :**

सुक्ष्म अर्थशास्त्रीय पद्धतीचे विवेचन हे सैद्धांतिक व्यवहारिकदृष्ट्या उपयुक्त व महत्त्वाचे आहे. या पद्धतीचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले जाते.

**१) व्यक्तिगत आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी :**

कोणत्याही अर्थव्यवस्थेतील व्यक्तिसमोर अनेक आर्थिक प्रश्न असतात. सुक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तिगत प्रश्न समजू शकतात. प्रश्न समजल्यावर ते सोडविण्यासाठी उपाययोजना करता येतात. व्यक्ति कुटुंब, उद्योगसंस्था यांना आपले आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी या पद्धतीच्या अभ्यासाने मार्गदर्शन होते.

**२) आर्थिक धोरण ठरविण्यासाठी :**

सुक्ष्म अर्थशास्त्र देशाला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी उपयुक्त ठरते. सुक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने उत्पादनातील महत्तम कार्यक्षमता कोणत्या घटकांवर अवलंबून असते हे समजते. त्यामुळे अकार्यक्षमता दूर करण्यासाठी योग्य उपाय सरकारला योजता येतात.

**३) देशाच्या आर्थिक विकासाला उपयुक्त :**

देशातील व्यक्तिगत घटकांचा विकास झाला नाही तर देशाचा विकास होणार नाही. सुक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तिगत घटकांचा विकास करता येतो व पर्यायाने देशाचा विकास होतो. उदा. देशातील शेतकरी, कामगार वर्ग, उद्योगपती, भांडवलदार वर्ग यांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास सुक्ष्म अर्थशास्त्रात करता येतो.

**४) अर्थव्यवस्थेचे कार्य समजते :**

खुल्या अर्थव्यवस्थेत असंख्य उत्पादक व उपभोक्ते असतात. तसेच असंख्य वस्तू व सेवांचे उत्पादन केले जाते. उत्पादन साधनाचे व घटकांचे वाटप कसे करावे. उत्पादित वस्तू व सेवांचे वाटप उपभोक्त्यांमध्ये कसे करावे इत्यादीचे ज्ञान किंमत यंत्रणेमार्फत होते. वस्तूंच्या किंमतीचा अभ्यास केला जातो.

**५) आर्थिक कल्याण :**

सुक्ष्म अर्थशास्त्रात प्रत्येक व्यक्तिचे उत्पन्न, उपभोग, बचत, उद्योगसंस्थेचे उत्पादन इत्यादीचा अभ्यास केला जातो. यावरुन देशाची अर्थव्यवस्था विकसित आहे कि मागासलेले आहे हे समजते. देशातील प्रत्येक व्यक्तिचे उत्पन्न बचत व उपभोग अधिक असेल तर अर्थव्यवस्था विकसित आहे असा निष्कर्ष निघतो. थोडक्यात देशातील लोकांचे आर्थिक कल्याण किती प्रमाणात साध्य झाले हे समजते.

**६) उद्योगांना उपयुक्त :**

लार्ड केन्सच्या मते, सुक्ष्म अर्थशास्त्र हे प्रत्येकाच्या विचार साधनांचा आवश्यक भाग आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार उत्पादन साधनांची किंमत, सार्वजनिक आयव्यय इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करण्यास सुक्ष्म अर्थशास्त्र मदत करते.

## सुक्ष्म अर्थशास्त्राच्या मर्यादा (Limitation of Micro Economics) :

सुक्ष्म अर्थशास्त्र पद्धती आर्थिक विश्लेषणात महत्त्वाची असली तरी या पद्धतीच्या काही मर्यादा आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करता येत नाही :**

सुक्ष्म अर्थशास्त्रात एका विशिष्ट घटकाचा अभ्यास केला जातो. उदा. एक ग्राहक एका वस्तुची किंमत, वैयक्तिक उद्योगसंस्था इत्यादी. त्यामुळे विशिष्ट घटकांबाबत अध्ययन करता येते. परंतू व्यापक दृष्टीने विचार केल्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करता येत नाही. थोडक्यात सुक्ष्म अर्थशास्त्राच्या सहाय्याने व्यक्तिगत निष्कर्ष काढले जातात ते संपूर्ण समाजाला किंवा अर्थव्यवस्थेला उपयुक्त ठरत नाहीत.

**२) अवास्तव गृहिते :**

सुक्ष्म अर्थशास्त्राच्या सहाय्याने आर्थिक विश्लेषण करताना अनेक गोष्टी गृहित धरल्या जातात. उदा. पूर्ण स्पर्धा, पूर्ण रोजगार, उत्पादक घटकांची गतिक्षमता इत्यादी. वास्तविक पाहता ही गृहितकेच काल्पनिक स्वरुपाची आहेत. त्यामुळे त्यांचा आधारावर काढलेले निष्कर्ष चूकिचे असतात. सूक्ष्म अर्थशास्त्र हे चूकिच्या गृहितकांवर आधारलेले आहे.

**३) महत्त्वाचे प्रश्न अभ्यासणे अशक्य :**

संपूर्ण देशाच्या दृष्टीकोनातून काही प्रश्नांचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते. उदा. एकुण राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी, देशातील पतपैसा एकूण रोजगार, सार्वजनिक वित्तव्यवहार, आर्थिक विकास इत्यादी. महत्त्वाच्या घटकाचा अभ्यास सुक्ष्म अर्थशास्त्रात केला जात नाही. कारण हे अर्थशास्त्र व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करते. त्यामुळे या अर्थशास्त्राची व्यावहारिक उपयुक्तता मर्यादित होते.

**४) अविश्वसनीय निष्कर्ष :**

सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासात अनेक सांख्यिकी आकडेवारीचा आधार घेतला जातो. पण ही आकडेवारी विश्वसनीय नसते. त्यामुळे अशा अविश्वसनीय आकडेवारीच्या आधारे काढलेले निष्कर्ष अविश्वनीय ठरतात.

### ५) अनिश्चितता वाढण्यास कारणीभूत :

सूक्ष्म अर्थशास्त्र अध्ययनाची हि पद्धत अनिश्चितता वाढविण्यास कारणीभूत ठरते. कारण यामध्ये व्यक्तिगत घटकांचा अभ्यास केला जातो. आणि व्यक्तिगत निष्कर्ष एकत्रित करुन देशाचे निष्कर्ष आहेत असे मानणे चुकीचे ठरते. सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचा आधार घेऊन देशपातळीवरील निष्कर्ष काढणे म्हणजे अनिश्चिता निर्माण करणे होय.

## ३.७ समग्र अर्थशास्त्र (MACRO ECONOMICS)

सूक्ष्म अर्थशास्त्राप्रमाणेच समग्र अर्थशास्त्र ही एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. समग्र अर्थशास्त्रास इंग्रजीत Macro-Economics असे म्हटले जाते. Macro हा शब्द Makroes या ग्रीक शब्दापासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ मोठे असा होता.

**व्याख्या (Definition)** :

प्रा. बोल्डिंग यांच्यामते, "समग्र अर्थशास्त्र हे वैयक्तिक परिमाणांशी संबंधित नसून ते समग्र परिमाणाशी सबंधित असते. त्यात समग्र आर्थिक घटकांच्या व्याख्या देऊन त्यातील सबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो."

प्रा. ॲक्ले यांच्यामते, "समग्र अर्थशास्त्र हे मोठ्या प्रमाणावरील, 'आर्थिक व्यवहारा'चा विचार करीत असते. ते आर्थिक जीवनाच्या सर्वव्यापी आकारमानाशी सबंधित असते."

वरील व्याख्याच्या अभ्यासातून खालील गोष्टी लक्षात येतात.

१) समग्र अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समग्रपणे विचार करते.
२) समग्र अर्थशास्त्र वैयक्तिक घटकांचा अभ्यास करत नाही.
३) समग्र अर्थशास्त्र सामान्य संतुलनाच्या पायावर आधारित असते.
४) समग्र अर्थशास्त्र ही अधिक व्यापक संकल्पना आहे.

### समग्र अर्थशास्त्राचे महत्त्व (Significance of Macro Economics) :

### १) सरकारला उपयुक्त :

सरकारला आर्थिक धोरणे तयार करुन राबवायची असतात. अशी धोरणे तयार करत असताना संपूर्ण अर्थव्यवस्थेचा एकत्रितपणे अभ्यास करावा लागतो. समग्र अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेचा एकत्रितपणे अभ्यास केला जात असल्याने ते सरकारला उपयुक्त ठरते.

### २) अवाजवी गृहितकावर आधारलेले नाही :

सूक्ष्म अर्थशास्त्र अवाजवी गृहितकावर आधारलेले असल्यामुळे त्याची उपयुक्तता कमी होते. परंतु समग्र अर्थशास्त्र अवाजवी गृहीतकावर आधारलेले नसल्याने त्याची उपयुक्तता वाढते.

### ३) पूर्ण रोजगार निर्माण करण्यासाठी :

पूर्ण रोजगार निर्माण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन समग्र अर्थशास्त्रामुळे मिळते.

### ४) राष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी :

प्रत्येक अर्थव्यवस्थेचे समोर दारिद्र्य विषमता, बेकारी या सारखे प्रश्न असतात. हे प्रश्न सोडविण्यासाठी समग्र अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

### ५) सूक्ष्मलक्षी विवेचनास उपयुक्त :

समग्रलक्षी विवेचनाचा उपयोग सुक्ष्मलक्षी अध्ययनासाठी होत असतो. उदा. सूक्ष्म अर्थशास्त्रातील मागणीचा नियम, घटत्या सिमान्त उपयोगितेचा नियम मांडत असताना समग्राचा अनुभव लक्षात घेतला जातो.

### ६) आर्थिक सिद्धांताच्या मांडणीसाठी :

विकासाचे सिद्धांत, विभाजनाचे सिद्धांत रोजगार सिद्धांत यांच्या मांडणीसाठी समग्र अर्थशास्त्र उपयुक्त होते.

### ७) वेगाने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी :

वेगाने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी समग्र अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

### समग्र अर्थशास्त्राच्या मर्यादा (Limitations of Macro Economics) :

१) समग्र अर्थशास्त्राच्या आधारे काढलेले निष्कर्ष दोषपूर्ण ठरण्याची शक्यता असते.

२) एकूण मात्रांचे मोजमाप करणे शक्य नसते. अनेक घटकात विविधता असल्यामुळे एकत्रीकरण करता येत नाही. राष्ट्रीय उत्पन्नातील दुहेरी मोजमापाची समस्या हे एक या संदर्भातील महत्त्वाचे उदाहरण आहे.

३) समग्र अर्थशास्त्राच्या सामुग्रीचे मापन करताना अनेक संख्याशास्त्रीय अडचणी निर्माण होतात.

### सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र फरक (Defference Between Micro and Macro Economics) :

| सूक्ष्म अर्थशास्त्र | | समग्र अर्थशास्त्र | |
|---|---|---|---|
| १) | सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांचा अभ्यास केला जातो. | १) | समग्र अर्थशास्त्रात सर्व घटकाचा एकत्रित अभ्यास केला जातो. |
| २) | सूक्ष्म अर्थशास्त्र हे व्यक्तिनिष्ठ असते. | २) | समग्र अर्थशास्त्र हे समाजशील असते. |
| ३) | सूक्ष्म अर्थशास्त्र अवाजवी गृहीतकावर अवलंबून असल्याने उपयुक्तता कमी होते. | ३) | समग्र अर्थशास्त्र अवाजवी गृहितकावर अवलंबून नसल्याने त्याची उपयुक्तता वाढते. |
| ४) | सुक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासात ॲडम स्मिथचे योगदान महत्त्वाचे आहे. | ४) | समग्र अर्थशास्त्राचा जनक माल्थसला समजले जाते. |
| ५) | सुक्ष्म अर्थशास्त्रात सिमान्त विश्लेषणाचा साधन म्हणून वापर केला जातो. | ५) | समग्र अर्थशास्त्रात सिमान्त विश्लेषणाचा साधन म्हणून वापर केला जात नाही. |
| ६) | सुक्ष्म अर्थशास्त्र स्थितीशील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते. | ६) | समग्र अर्थशास्त्र गतिशील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते. |

**अर्थशास्त्रज्ञ कोणते कार्य करतात?**

अर्थशास्त्रात अर्थशास्त्रज्ञ जे सिद्धांत वापरतात ते दोन विभागात विभागले जातात. सूक्ष्म अर्थशास्त्र आणि समग्र अर्थशास्त्र होय. सूक्ष्म अर्थशास्त्राचा अभ्यास हा सूक्ष्म पातळीवर असतो आणि समग्र अर्थशास्त्राचा अभ्यास हा व्यापक असतो हे आपण आधी पाहिलेच आहे. सूक्ष्म अर्थशास्त्रात उद्योगसंस्था व कुटुंबे यांचे वैयक्तिक पातळीवरील निर्णय आणि त्यांच्यामधील आदान प्रदान यांचा अभ्यास केला जातो. समग्र अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्न, गुंतवणूक मागणी, बेरोजगारीचा दर या संकल्पनाचा अभ्यास केला जातो.

अर्थशास्त्रज्ञ दोन भिन्न पण नेहमीच एक दुसऱ्याशी संबंधित अशी कार्ये करतात.

१) प्रथम महत्त्वाचे कार्य म्हणजे अर्थशास्त्रज्ञ हे पृथक्करण विश्लेषणाचे कार्य करतात.

उदा. १) अर्थशास्त्रज्ञ एखादा सिद्धांत घेऊन परिस्थितीचे विश्लेषण करतात. अर्थशास्त्रज्ञ आपल्या सिद्धांताचा वापर करुन विश्लेषण करताना की कशाप्रकारे अमेरिकेच्या फेडरल बँकेने व्याजदर बदलल्याने भारतात गुंतवणूकीच्या प्रमाणावर परिणाम होईल.

जेव्हा अर्थशास्त्रज्ञ त्यांच्या सिद्धांताचा वापर करुन जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था स्पष्ट करतात तेव्हा ते एका शास्त्रज्ञाचे कार्य करत असतात. अर्थशास्त्रज्ञ आपले सिद्धांत एखादा ठाम शिफारस किंवा पसंती दर्शविण्यासाठी वापरतात.

उदा. २) रॉकेलवर सवलती द्यावी किंवा नाही हा सरकारी धोरणात देशातील गरीबीचा परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने घेतलेला निर्णय आहे. अशा निरनिराळ्या धोरणांमध्ये किंवा धोरणे बनविताना येणाऱ्या अडथळ्याच्या वेळी अर्थशास्त्रज्ञ हे सल्लागाराचे कार्य करतात.

अर्थशास्त्राचा विचार वास्तविक शास्त्रज्ञ आणि आदर्शवादी अर्थशास्त्र अशा दोन दृष्टीकोनातून करता येतो. अर्थशास्त्र हे आदर्शवादी आहे कि वास्तविक आहे याबाबत अर्थतज्ञांमध्ये मतभेद आहेत. अनेकवेळा अर्थशास्त्रज्ञांच्या मतामध्ये तफावत येते कारण ते वेगवेगळे सिद्धांत वापरत असतात. तसेच भिन्न साधनांचा ते विश्लेषणासाठी वापर करत असतात.

वास्तविक अर्थशास्त्र हे वस्तूस्थितीशी सुसंगत अशा घटनांचा विचार करते. वास्तविक अर्थशास्त्र हे ज्याचे परिक्षण करता येते अशा तथ्यांचे अध्ययन करते. त्यांचा उद्देश हा विविध घटनांतील साधर्म्य किंवा क्रमबद्धता व्यक्त करणे असा असतो. वास्तविक अर्थशास्त्र एखादी घटना जशीच्या तशी आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न करते. आदर्शवादी अर्थशास्त्र हे एखादा घटक असावा कि कसा नसावा याबाबत मार्गदर्शन करते.

अर्थशास्त्रीय सिद्धांत हे वास्तविक जगताचे व वास्तविकतेचा सारांश आहे. वास्तविकतेतून जेव्हा एखादा घटक वेगळा होतो तेव्हा काही घटकांना महत्त्व प्राप्त होते तर काही घटक मागे ठेवले जातात. वास्तविक जगताच्या स्वभावामुळे अर्थशास्त्रज्ञ विश्लेषणाच्या वेळी वेगवेगळ्या घटकांना महत्त्व देतात तसेच काही घटक दूर करतात त्यामुळे निरनिराळे सिद्धांत तयार होतात.

उदा. एका अर्थशास्त्राच्या मते श्रीमंतावर कर लादून आलेल्या उत्पन्नातून सरकार गरिबाच्या हितासाठी कामे करते. करामुळे श्रीमंताना झालेला तोटा हा सरकारला मिळालेल्या उत्पन्नाचा

गरिबांसाठी वापर करुन होणाऱ्या फायद्यापेक्षा कमी आहे. म्हणजेच येथे बाह्य आदर्शनिष्ठ मुल्यांची जमवाजमव केली गेली. जसे श्रीमंतावर जादा कर आणि गरिबांना आर्थिक सहाय्यता पण या मताशी दुसरे अर्थशास्त्रज्ञ सहमत असतील असे नाही. कारण येथे समानता व मुल्यांच्या नावाखाली भेदभाव व दुहेरी भूमिका घेतल्याचे जाणवते. अशा भिन्न आदर्शनिष्ठ विचारामुळे अर्थशास्त्रज्ञामध्ये सहमत होत नाही.

## ३.८ वस्तूनिष्ठ अर्थशास्त्र आणि आदर्शवादी अर्थशास्त्र (POSITIVE ECONOMICS AND NORMATIVE ECONOMICS)

अर्थशास्त्राचा विचार वास्तविक अर्थशास्त्र आणि आदर्शवादी अर्थशास्त्र अशा दोन दृष्टीकोनातून केला जातो. अर्थशास्त्र हे वास्तविक अर्थशास्त्र आहे कि, आदर्शवादी अर्थशास्त्र आहे. याबाबत अर्थशास्त्रज्ञामध्ये मतभेद केला जातो. अर्थशास्त्र हे केवळ वास्तवादी शास्त्र होय. असे जुन्या इंग्रज सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञानी मानले. जर्मनीतील ऐतिहासिक संप्रदायातील अर्थशास्त्रज्ञाच्या मते अर्थशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे.

वास्तविक अर्थशास्त्र वस्तूस्थिती काय आहे याचा अभ्यास करते. याउलट आदर्शवादी अर्थशास्त्र वस्तूस्थिती कशी असावी याविषयी माहिती देते. वास्तविक अर्थशास्त्र ध्येयाबाबत किंवा उद्दिष्टांबाबत तटस्थ असते. याउलट आदर्शवादी अर्थशास्त्र वस्तूस्थिती कशी असावी यासंबंधी माहिती देते.

प्रा. रॉबिन्सने 'An Essay on the Nature and Significance of Economic Science' हा ग्रंथ लिहिल्यानंतर अर्थशास्त्र हे वास्तविक अर्थशास्त्र आहे की आदर्शवादी अर्थशास्त्र आहे हा वाद पुन्हा सुरु झाला. रॉबीन्सनच्या मते अर्थशास्त्र हे वास्तववादी शास्त्र आहे आणि आपले हे मत मांडताना त्यांच्या समर्थनार्थ त्यांनी पुढील कारणे दिलेली आहेत.

१) वस्तूस्थिती काय आहे हे अर्थशास्त्राने सांगावे ती कशी असावी हे सांगू नये.
२) अर्थशास्त्र हे भावनावर आधारीत नाही तर ते इतर शास्त्राप्रमाणे तर्कशुद्ध विचारावर आधारित आहे म्हणून त्यास वास्तविक अर्थशास्त्र म्हणावे.
३) वास्तविक आणि आदर्शवादी असे दोन्ही दृष्टीकोन अर्थशास्त्राने स्विकारल्यास त्यामुळे लोक चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता असते म्हणून अर्थशास्त्र हे फक्त वास्तविक अर्थशास्त्र आहे.

थोडक्यात अर्थशास्त्र हे वास्तविक शास्त्र आहे ते वस्तुस्थितीचे वर्णन करते. चांगले काय? वाईट काय हे ते सांगत नाही. सभोवतालच्या अनेक घटकांचे, घटनांचे सुक्ष्म निरीक्षण करुन त्यांची मांडणी करण्याचे काम अर्थशास्त्र करते. म्हणजेच अर्थशास्त्र हे वस्तूनिष्ठ शास्त्र आहे.

**अर्थशास्त्र आदर्शवादी शास्त्र आहे का?**

रॉबीन्सन सारख्या अर्थतज्ञांनी अर्थशास्त्र हे वास्तववादी शास्त्र आहे असे मानले तर त्यांच्या टीकाकारांनी अर्थशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे असे मत व्यक्त केले. प्रा. हॅट्रिच्या मते, अर्थशास्त्र हे नीतीशास्त्रापासून वेगळे करता येत नाही. अर्थशास्त्र हे पुर्णपणे वास्तववादी असू शकत नाही कारण अर्थतज्ञ सुद्धा एक व्यक्ती असते. त्यामुळे स्वाभाविकच वस्तूस्थितीचा

अभ्यास करीत असताना त्याच्या भावनांचा, पुर्वग्रहाचा किंवा मतांचा त्या अभ्यास विषयावर प्रभाव पडू शकतो. म्हणूनच अर्थशास्त्राचा अभ्यास आदर्शवादी दृष्टीकोनातून सुद्धा करणे आवश्यक ठरते.

**अर्थशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे कारण -**

१) अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मानव आहे त्यामुळे वस्तुस्थितीचा अभ्यास करताना भावनाचा थोडा तरी परिणाम होणारच.

२) अर्थशास्त्राने काय आहे ? हे स्पष्ट केल्यानंतर जे आहे ते चांगले आहे कि वाईट आहे हे सांगितले गेले नाही तर अर्थशास्त्र हे निरर्थक शास्त्र ठरेल. कारण बऱ्या वाईटाचा विचार न झाल्यास हितकर असे आर्थिक धोरण ठरविताच येणार नाही.

३) अर्थशास्त्राचा अभ्यास विषय मानव आहे. मानव हा भावनाप्रधान प्राणी आहे त्यामुळे अध्ययन करताना मानव आपल्या सिद्धांताच्या परिणामाबद्दल पूर्णपणे तटस्थ राहू शकणार नाही.

या सर्व विवेचनावरुन असा निष्कर्ष निघतो कि, अर्थशास्त्र हे फक्त वास्तविक अर्थशास्त्र नाहीतर ते आदर्शवादी देखील आहे.

**वास्तविक अर्थशास्त्र व आदर्शवादी अर्थशास्त्र फरक :**

| | वास्तविक अर्थशास्त्र | | आदर्शवादी अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| १) | वास्तविक अर्थशास्त्र हे वस्तूस्थिती काय आहे याचे वर्णन करते. | १) | आदर्शवादी अर्थशास्त्र वस्तूस्थिती कशी असावी याबाबत मार्गदर्शन करते. |
| २) | वास्तविक अर्थशास्त्रात उपलब्ध माहितीच्या आधारे सत्यता पडताळून पहाता येते. | २) | आदर्शवादी अर्थशास्त्रात सत्यता पडताळून पहाणे शक्य नसते. |
| ३) | वास्तविक अर्थशास्त्र प्रत्यक्ष वस्तूस्थितीशी संबंधित असते. | ३) | आदर्शवादी अर्थशास्त्र नितीवादाशी संबंधित असते. |
| ४) | वास्तविक अर्थशास्त्राची सुरुवात ॲडमस्मिथ पासून झाली. | ४) | आदर्शवादी अर्थशास्त्राची सुरुवात डॉ. मार्शल प्रा. हिक्स यांच्यापासून झाली आहे. |
| ५) | उदा. इतर परिस्थिती स्थिर असताना किंमत व मागणी संबंध व्यस्त असतो. | ५) | उदा. जीवनावश्यक वस्तूच्या किमती नियंत्रणात असाव्यात. |

**आपली प्रगती तपासा**

१) आदर्शवादी अर्थशास्त्र व वास्तविक अर्थशास्त्र फरक सांगा.

२) खालीलपैकी वास्तविक आणि आदर्शवादी शास्त्राची वाक्य कोणती ते ओळखा.

अ) स्त्री शिक्षण समाजासाठी उत्तम आहे.

ब) प्रत्येकास प्राथमिक आरोग्य सेवा मिळाल्यास मग ते त्यासाठी पैसे भरोत किंवा नाही.

क) दारु आरोग्यास अपायकारक आहे.

ड) पाण्याचा साठा मर्यादित असला तरी पाण्यासाठी लोकांकडे पैसे मागणे हा हक्क नाही.

इ) सरकारने गरीबाना मदत करावी.

ई) अंदाजपत्रकातील तूट कमी करण्यासाठी जास्त दराने कर आकारणी करावी व सार्वजनिक खर्चात घट करावी.

## ३.९ सारांश (CONCLUSION)

**वैज्ञानिक पद्धती :** संशोधन अथवा शास्त्रीय अभ्यास ही एक दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीनेच केले जाते. वैज्ञानिक पद्धतीच्या समस्यासूत्रण माहिती जमा करणे, गृहितकृत्यादी मांडणी करणे, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्यांचे संकलन, तथ्यांचे वर्गीकरण आणि निष्कर्ष मांडणे या पायऱ्या आहेत.

**गृहीतकांची भूमिका व महत्व :** गृहीतके वापरुन अर्थशास्त्रज्ञ सिद्धांताची रचना करतात. गृहीतकामुळे आर्थिक विश्लेषणात सोपेपणा येतो. भविष्यकालीन अंदाज व्यक्त करण्यासाठी गृहितके उपयुक्त असतात.

**आर्थिक प्रतिमाने :** आर्थिक प्रतिमानाचा वापर आर्थिक विश्लेषणासाठी केला जातो. आर्थिक प्रतिमाने आर्थिक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तयार केली जातात.

**उत्पन्नांचा चक्राकार प्रवाह :** उद्योगसंस्था व कुटुंबे या दोन घटकांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न चक्राकार गतीने कसे फिरते याचे स्पष्टीकरण उत्पन्नांचा चक्राकार प्रवाह देतो.

**उत्पादन शक्यता वक्र :** उत्पादन शक्यता वक्र हा असा वक्र असतो की जो दिलेले उतपादन घटक आणि तंज्ञज्ञानाच्या सहाय्याने उत्पादनसंस्था महत्तम उत्पादन करु शकतील असे दोन उत्पादनाचे सर्व संभाव्य संयोग दर्शविते.

**सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र :** अर्थशास्त्राचा अभ्यास वेगवेगळ्या पातळीवर केला जातो. प्रामुख्याने अर्थशास्त्राच्या सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्र अर्थशास्त्र या प्रमुख दोन शाखा आहेत. सूक्ष्म अर्थशास्त्रात सूक्ष्म दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो आणि समग्र अर्थशास्त्रात समग्र पातळीवर अभ्यास केला जातो.

**वास्तववादी अर्थशास्त्र आणि आदर्शवादी अर्थशास्त्र :** वास्तववादी अर्थशास्त्र वस्तूस्थिती काय आहे याचा अभ्यास करते तर आदर्शवादी अर्थशास्त्र वस्तूस्थिती कशी असावी हे सांगते. अर्थशास्त्र हे फक्त वास्तविक नाही तर ते आदर्शवादी देरखील आहे.

## ३.१० सरावासाठी प्रश्न (PRACTICE QUESTIONS)

१) वैज्ञानिक पद्धती म्हणजे काय?

२) अर्थशास्त्राच्या अभ्यासातील गृहितांची भूमिका स्पष्ट करा.

३) आर्थिक प्रतिमाने म्हणजे काय?

४) उत्पादन शक्यता वक्र स्पष्ट करा.

५) राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह प्रतिमानाची चर्चा करा.

६) सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र व समग्रलक्षी अर्थशास्त्र फरक स्पष्ट करा.

७) वास्तववादी अर्थशास्त्र व आदर्शवादी अर्थशास्त्र फरक स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक -४

# अर्थशास्त्रीय विश्लेषणाची साधने
# (TOOLS OF ECONOMIC ANALYSIS)

**घटक रचना :**


४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ आलेख
४.३ एकचलीय आलेख
४.४ द्विचलीय आलेख
४.५ उतार
४.६ फलन
४.७ सारांश
४.८ सरावासाठी प्रश्न


## ४.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- आलेख कसा काढतात ते समजावून घेणे.
- उतार वक्र या संकल्पनांचा अभ्यास करणे.
- फलनात्मक संबंध अभ्यासणे.


## ४.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

अर्थशास्त्रासारख्या सामाजिक शास्त्राच्या अभ्यासात अनेक सांख्यिकीय आणि गणितीय संकल्पना आणि साधनांचा वापर वाढत आहे. आधुनिक अर्थशास्त्र शिकण्यासाठी संख्याशास्त्रज्ञ आलेख, गणितीय सूत्र, समीकरणे इत्यादी साधनाा वापर वाढत आहे. प्रस्तूत प्रकरणात आपण आलेख उतार, वक्र, फलन या साधनांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ आलेख (GRAPH)

अर्थशास्त्रीय अभ्यासात दोन चलातील संबंध दर्शविण्यासाठी वापरले जाणारे साधन म्हणजे आलेख होय. अमुर्त अर्थशास्त्रीय संकल्पनाना मूर्त रुप देणारे साधन म्हणजे आलेख होय.

ज्यावेळेस फलन संबंध आकृतीच्या आधारे किंवा आलेखाच्या आधारे म्हणजेच वक्राच्या आधारे दर्शविला जातो त्या पद्धतीला आलेखात्मक पद्धत म्हणतात. दोन चलातील कार्यात्मक संबंध दाखवण्यासाठी आलेखाचा अवलंब केला जातो. तसेच आलेख सामान्यांना समजण्यास सोपे असतात. आलेखामुळे संकल्पना अधिक स्पष्ट होते. आलेख काढण्यासाठी आलेखपत्राचा अवलंब केला जातो.




**आकृती ४.१**

वरील आलेखात X सरळरेषा काढली जाते तिला काटकोनात छेदणारी Y रेषा काढली जाते. या दोन अक्षाच्या छेदनबिंदूस आरंभबिंदू असे म्हणतात. X च्या धन किंमती आरंभबिंदूच्या उजवीकडे तर ऋणकिंमती आरंभबिंदूच्या डावीकडे असतात. त्याचप्रमाणे Y च्या धन किंमती आरंभबिंदूच्या वरच्या बाजूस व ऋण किंमती आरंभबिंदूच्या खालच्या बाजूस घेतल्या जातात त्यामुळे आकृतीचे चार भाग पडतात.

## ४.३ एकचलीय आलेख (GRAPH OF SINGLE VARIABLE) :


पुढील आकृत्यामध्ये सर्वसामान्यपणे काढले जाणारे तीन आलेख दर्शविले आहेत.

१) पहिल्या आलेख वर्तुळाकृतीच्या सहाय्याने दर्शविला आहे. यामध्ये भारताचा शेती उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा दर्शविला आहे.

२) दुसरा आलेख स्तंभाच्या सहाय्याने दर्शविला आहे. यामध्ये विविध देशाचे एका विशिष्ट कालखंडातील व्यक्तीचे उत्पन्न दर्शविले आहे.


३) तिसरा आलेख रेषेच्या सहाय्याने दर्शविला आहे. एक आलेख फक्त एकाच चलघटकाविषयी माहिती देतो म्हणून त्याला एकचलीय आलेख असे म्हणतात.

I) **वर्तुळाकृती**





**आकृती ४.२**

II) **स्तंभालेख**




**आकृती ४.३**

III) **रेषा आलेख**





**आकृती ४.४**

## ४.४ द्विचलीय आलेख (GRAPH OF TWO VARIABLES)

अर्थतंज्ञ दोन चलघटकातील संबंधाच्या अभ्यास करतात म्हणून एकाच आलेखात दोन चल घटक दर्शविले जातात.


पुढील कोष्टकात वेगवेगळ्या उत्पन्नपातळीला आणि वेगवेगळ्या किंमतीला वस्तूसाठी असणारी मागणी किती आहे हे दाखविले आहे.

| **किंमत (रुपये)** | **वेगवेगळ्या उत्पन्न पातळीला M वस्तूसाठी मागणी** | | |
|---|---|---|---|
| | १०,००० रुपये | १५,००० रुपये | २०,००० रुपये |
| १० | २ नग | ३ नग | ५ नग |
| ९ | ४ नग | ५ नग | ७ नग |
| ८ | ७ नग | ९ नग | १२ नग |
| ७ | १० नग | १३ नग | १५ नग |
| ६ | १४ नग | १६ नग | १९ नग |
| ५ | १८ नग | २० नग | २४ नग |
| | मागणी वक्र $D_2D_2$ | मागणी वक्र DD | मागणी वक्र $D_1D_1$ |




**आकृती ४.५**

वरील आकृती DD हा मागणीवक्र दर्शवला आहे. हा मागणी वक्र १५,००० रुपये उत्पन्न असताना M वस्तूसाठी वेगवेगळ्या किंमतीला किती मागणी असेल हे दर्शविते. वरील मागणी वक्रावरुन स्पष्ट होते. किंमत कमी असताना मागणी जास्त असते म्हणजेच किंमत व मागणी ऋणात्मक संबंध असतो. त्याचप्रमाणे उपभोक्त्याच्या उत्पन्नात वाढ झालीतर मूळच्याच किंमतीचा उपभोक्ता जास्त नगची खरेदी करतो. त्यामुळे मागणीवक्र उजवीकडे सरकतो व उपभोक्त्याच्या उत्पन्नात घट झाली तर उपभोक्ता त्याच किंमतीला कमी नग खरेदी करतो. त्यामुळे मागणीवक्र डावीकडे सकरतो हे पुढील आकृतीत दर्शविले आहे.




**आकृती ४.६**

१५,००० रुपये उत्पन्न असतानाचा मागणीवक्र DD आहे. तर २०,००० रुपये असतानाचा मागणीवक्र $D_1D_1$ आहे. किंमत स्थिर असताना उत्पन्न वाढल्याने मागणीवक्र उजवीकडे सरकला. उत्पन्न १०,००० रुपये असतानाचा मागणीवक्र $D_2D_2$ आहे. उत्पन्नात घट झाली असता मागणी घटते म्हणून मागणीवक्र $D_2D_2$ असा डावीकडे सरकतो.

## ४.५ उतार (SLOPE)

दोन चलघटकाच्या किंमती आलेखावर स्थापन केल्यानंतर वेगवेगळे बिंदू मिळतात हे बिंदू एकत्र जोडले असता वक्र मिळतो. हा वक्र दोन प्रकारचा असतो.


१) रेखीय वक्र

२) अरेखीय वक्र

१) रेखीय वक्र - रेखीय वक्राचा उतार एका घटकातील बदलाने दुसऱ्या घटकाची जागा घेतल्याचे दर्शवित असतो. उदा. X च्या किंमतीतील बदलाने X वस्तूच्या मागणीत बदल घडून येतो. हे आकृतीत किंवा आलेखात दर्शविताना दोन्ही अक्षावर घडणारे बदल आपल्याला दाखवावे लागतात.

१) रेखीय वक्रचा उतार मोजण्यासाठी Y चलातील बदलाचे X चलातील बदलाशी गुणोत्तर काढले जाते.

सूत्र $$\text{उतार} = \frac{\text{Y चलातील बदल}}{\text{X चलातील बदल}}$$




**आकृती ४.७**

बाजूच्या आकृतीत AB हा मागणी वक्र आहे. या वक्राचा उतार मोजण्यासाठी Y चलातील बदलाचे X चलातील बदलाशी गुणोत्तर काढले जाते.

$$\text{रेषेचा उतार} = \frac{\text{Y चलातील बदल}}{\text{X चलातील बदल}}$$

$$= \frac{NM}{NP}$$

जर वक्र रेखीय असेल तर उतार मोजण्यासाठी पुढील सुत्रांचा अवलंब केला जातो.


$$\text{उतार} = \frac{\text{आरंभ बिंदूपासून Y अक्षावरील अंतर}}{\text{आरंभ बिंदूपासून X अक्षावरील अंतर}}$$

रेखीय उतार दोन प्रकारचे असतात.

१) धनात्मक उतार

२) ऋणात्मक उतार


१) धनात्मक उतार - X आणि Y अक्षावर दर्शविलेल्या दोन चलातील सबंध समान असतील तर उतार धनात्मक असतो. उदा. पुरवठा व किंमत या दोन चलातील सबंध धनात्मक असतो म्हणून हा वक्र डावीकडून उजवीकडे वर सरकत जातो.




**आकृती ४.८**

आकृतीत पुरवठा वक्र दर्शविला असून किंमतीतील वाढी बरोबर पुरवठ्यात वाढ होते म्हणून पुरवठा वक्र डावीकडून उजीवकडे वर सरकत जातो.

२) ऋणात्मक उतार - X आणि Y अक्षावर दर्शविलेल्या दोन चलातील सबंध विरुद्ध असतील तर उतार ऋणात्मक असतो. उदा. किंमत व मागणी संबंध विरुद्ध असतो म्हणून हा वक्र डावीकडून उजवीकडे खाली घसरत जातो.





**आकृती ४.९**

आकृतीत मागणी वक्र दर्शविला असून किंमतीतील वाढी बरोबर मागणीत घट होते म्हणून मागणी वक्र डावीकडून उजीवकडे खाली सरकत जातो.

**अरेखीय वक्र (Non Linear Curve) :**

जर अरेखीय वक्र दिलेला असेल तर त्या वक्राचा उतार भिन्न बिंदूत भिन्न असतो. अशा परिस्थितीत एका विशिष्ट बिंदूत त्या वक्राचा उतार मोजण्यासाठी त्या बिंदूतून स्पर्श करुन जाणारी एक स्पर्श रेषा X आणि Y अक्षापर्यंत काढली जाते व त्या स्पर्श रेषेचा उतार म्हणजेच त्या बिंदूमध्ये त्या वक्राचा उतार होय.




**आकृती ४.१०**

आकृतीत C बिंदूत MN या अरेखीय वक्राचा उतार पुढील सुत्राच्या आधारे काढला जातो.

$$\text{MN या अरेखीय वक्राचा C बिंदूतील उतार} = \frac{\text{आरंभ बिंदूपासून Y अक्षावरील अंतर}}{\text{आरंभ बिंदूपासून X अक्षावरील अंतर}}$$

$$= \frac{OB}{OA}$$

## ४.६ फलन (FUNCTION)


अर्थशास्त्रात अनेक चले अभ्यासली जातात ही सर्व चले सतत बदलत असतात. तरीसुद्धा ती एकमेकांशी सबंधित असतात. अशा अनेक चलातील परस्पर संबंध स्पष्ट करणाऱ्या विधानास फलन असे म्हणतात. काही चले स्वतंत्र तर काही दुसऱ्या चलांवर विसंबून असतात. विसंबून असणाऱ्या चलातील बदल हे मूळ स्वतंत्र चलातील बदलानुसार घडून येतात.

उदा. X आणि Y हे दोन संच आहेत. X हे फलनाचे कार्यक्षेत्र आणि Y हे Domain (आवाका) श्रेणी आहे असे असेल तर Y = 2 + 3X हे फलन समीकरण आहे.

X चे मूल्य 1, 2, 3, 4, 5, 6, 7 असताना Y चे मूल्य किती असेल व Y च्या मुल्याक कितीने वाढू किंवा घट होते हे आपल्याला पुढील कोष्टकात दर्शविता येईल.

| X | Y = 2 + 3X | वाढ / घट $(\Delta Y)$ |
|---|---|---|
| 1 | $Y = 2 + (3 \times 1) = 5$ | -- |
| 2 | $Y = 2 + (3 \times 2) = 8$ | 3 |
| 3 | $Y = 2 + (3 \times 3) = 11$ | 3 |
| 4 | $Y = 2 + (3 \times 4) = 14$ | 3 |
| 5 | $Y = 2 + (3 \times 5) = 17$ | 3 |
| 6 | $Y = 2 + (3 \times 6) = 20$ | 3 |
| 7 | $Y = 2 + (3 \times 7) = 23$ | 3 |

वरील समीकरणावरुन असे आढळले की **X** ची किंमत १ ने वाढते तेव्हा **Y** ची किंमत ३ ने वाढते. ज्या दराने **Y** मध्ये वाढ होते. त्याला फलनाचा चढ (Slope) असे म्हणतात.




**आकृती ४.११**

चलातील बदलाचा दराला फलनाचा चढ म्हणतात. जेव्हा चलाच्या मूल्यात बदल घडून येतो तेव्हा X व Y या चलातील बदलांचे गुणोत्तर विचारात घेतात. आणि त्याचा चढ निश्चित करतात. चढ हा विशिष्ट अंतर दर्शवितो. दोन बिंदूतील बदलाचे प्रमाण म्हणजे चढ होय.

$\text{Slope} = \frac{\Delta Y}{\Delta X}$ (येथे Y ची किंमत स्थिर दराने बदलत आहे)

$\text{Slope} = \frac{3}{1}$ $\Delta Y = Y$ चलातील बदल

$Slope = 3$ $\Delta X = X$ चलातील बदल

जेव्हा एखाद्या चलातील बदलामुळे दुसऱ्या एखाद्या चलात स्थिर दराने बदल घडून येतो तेव्हा त्यास रेखिय फलन असे म्हणतात. जेव्हा हा बदल चढत्या दराने होतो तेव्हा त्यास धन फलन म्हणतात. तर जेव्हा बदल घटत्या दराने होतो तेव्हा त्यास ऋण फलन म्हणतात.


जेव्हा एखादी रेषा X किंवा Y अक्षाला छेदून जाते. त्या छेदन बिंदूस अंतरछेद / अंतःखंड (Intercept) असे म्हणतात.

पुढील आकृतीत X अक्षावर X चलमूल्य आणि Y अक्षावर Y चलमूल्य दर्शविले आहे. X चे मूल्य ० असतात Y चे मूल्य २ आहे म्हणून २ हा अंतरछेद आहे. X च्या मूल्यात १ ने वाढ होत असताना Y च्या मुल्यात ३ ने वाढ होत आहे. अशाप्रकारे X च्या मुल्यात १ ने वाढ होत असताना Y च्या मुल्यात जी वाढ होते तिलाच उतार असे म्हणतात.

उदा. $X = 7$ असताना $Y$ ची किंमत आलेखाच्या सहाय्याने काढा. उदा. $Y = 6 - 2x$ जेव्हा $X = 1, 2, 3, 4, 5, 6, 7$ असताना $Y$ चे मूल्य आणि $Y$ च्या मुल्यातील वाढ किंवा घट पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

| X | Y = 6 - 2X | वाढ / घट $(\Delta Y)$ |
|---|---|---|
| 1 | $Y = 6 - (2\times1) = 4$ | 2 |
| 2 | $Y = 6 - (2\times2) = 2$ | 2 |
| 3 | $Y = 6 - (2\times3) = 0$ | 2 |
| 4 | $Y = 6 - (2\times4) = -2$ | 2 |
| 5 | $Y = 6 - (2\times5) = -4$ | 2 |
| 6 | $Y = 6 - (2\times6) = -6$ | 2 |
| 7 | $Y = 6 - (2\times7) = -8$ | 2 |
| 8 | $Y = 6 - (2\times8) = -10$ | 2 |
| 9 | $Y = 6 - (2\times9) = -12$ | 2 |
| 10 | $Y = 6 - (2\times10) = -14$ | 2 |

या फलनाचा आलेख पुढीलप्रमाणे आपल्याला काढता येईल.




**आकृती ४.१२**

**उपक्रम :**


दिलेल्या फलनाचा अंतःखंड व चढ शोधा

$Y = 2 + 3x^2$ $X = 0, 1, 2, 3, 4, 5$ साठी घेऊन आलेख काढा. तसेच Y मधील वाढ $(\Delta Y)$ शोधा.

$Y = 2 + x^2$ असा फलनसंबंध आहे $X = 0, 1, 2, 3, 4, 5$ असताना Y चे मूल्य शोधा.

पुढील कोष्टकाच्या आधारे आपल्याला Y चे मूल्य शोधता येईल.

| X | $Y = 2 + 3x^2$ |
|---|---|
| 0 | $Y = 2 + 3 \times 0^2 = 2 + 0 = 2$ |
| 1 | $Y = 2 + 3 \times 1^2 = 2 + 3 = 5$ |
| 2 | $Y = 2 + 3 \times 2^2 = 2 + 12 = 14$ |
| 3 | $Y = 2 + 3 \times 3^2 = 2 + 27 = 29$ |
| 4 | $Y = 2 + 3 \times 4^2 = 2 + 48 = 50$ |
| 5 | $Y = 2 + 3 \times 5^2 = 2 + 75 = 77$ |
| 6 | $Y = 2 + 3 \times 6^2 = 2 + 108 = 110$ |




**आकृती ४.१३**

वरील आलेखावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की X मध्ये १ ने वाढ होत असताना Y चलातील मूल्यात होणारा बदल स्थिर नाही. म्हणजे या आलेखात फलनाचा उतार स्थिर नाही.

वरील आलेखात X मध्ये एक एकक बदलाने होणाऱ्या Y मधील बदल स्थिर नाही. ० ते १ पर्यंत X मध्ये झालेली वाढ Y मध्ये २ ते ५ म्हणजे ३ दाखवते तर १ ते २ मध्ये झालेली वाढ Y मध्ये ५ ते १४ म्हणजे ९ दर्शविते. येथे फलनाचा चढ हा स्थिर नाही. तर तो X नुसार बदलतो.

अर्थशास्त्राच्या अभ्यासात दोन चलातील सबंध दर्शविण्यासाठी नेहमी वापरले जाणारे साधन म्हणजे आलेख होय. आलेखाच्या वापराने अर्थशास्त्रीय चलातील सबंध समजणे अधिक सुलभ होते. अमुर्त अर्थशास्त्रीय संकल्पनाना मूर्त रुप देणारे साधन म्हणजे आलेख होय.

## ४.७ सारांश (CONCLUSION)

आर्थिक सिद्धांत स्पष्ट करताना आधुनिक आर्थिक विश्लेषणात गणितीय व भूमीतीय साधनांचा वापर केला जातो. त्यामुळे गणितीय व भूमितीय साधनाद्वारे अर्थशास्त्रीय प्रमेयांना सैद्धांतिक स्वरुप येते. आकृत्याद्वारे आर्थिक सिद्धांत आपणास अधिक अचूकपणे मांडता येतात.

## ४.८ सरावासाठी प्रश्न (PRACTICE QUESTIONS)

१) एकचलीय व द्विचलीय आलेखाचे वर्णन करा.
२) उतार यावर टिप लिहा.
३) आलेखाचे अर्थशास्त्रातील महत्त्व स्पष्ट करा.

❖❖❖❖

**मॉड्यूल ३**

# घटक -५

# बाजारपेठा, मागणी, पुरवठा व बाजार समतोल

# (MARKETS, DEMAND, SUPPLY AND MARKET EQUILIBRIUM)

**अभ्यासक्रम :** बाजारपेठ म्हणजे काय - स्पर्धा म्हणजे काय - मागणी वक्र : बाजार मागणी विरुद्ध वैयक्तिक मागणी - मागणी वक्रावरील हालचाली - मागणी वक्रातील अंतरण, पुरवठा वक्र : बाजार पुरवठा आणि वैयक्तिक पुरवठा - पुरवठा वक्रातील अंतरण - बाजार समतोल - बाजार समतोलातील बदलाचे विश्लेषण करण्याचे तीन टप्पे - वस्तूची कमाल व किमान किंमत - कर आणि त्यांचे परिणाम - मागणीची किंमत सापेक्ष लवचिकता - एकूण प्राप्ती आणि मागणीतील लवचिकता - किंमतीच्या लवचिकतेचा प्राप्तीवर होणारा परिणाम.

**घटक रचना :**


५.० उद्दिष्ट्ये

५.१ बाजारपेठ म्हणजे काय ?

५.२ स्पर्धा म्हणजे काय ?

५.३ मागणी वक्र

- ५.३.१ मागणीचा सिद्धांत
- ५.३.२ वैयक्तिक मागणी विरुद्ध बाजार मागणी
- ५.३.३ मागणी वक्रावर होणाऱ्या हालचाली / मागणीतील विचलन
- ५.३.४ मागणी वक्रातील अंतरण

५.४ पुरवठा वक्र

- ५.४.१ बाजार पुरवठा आणि वैयक्तिक पुरवठा
- ५.४.२ पुरवठा वक्रातील अंतरण

५.५ बाजार समतोल संकल्पना

५.६ समतोलाच्या बदलाच्या विश्लेषणाचे तीन टप्पे

५.७ कमाल मर्यादा किंमत व किमान मर्यादा किंमत

५.८ प्रश्न

## ५.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

१. बाजारपेठ ही संकल्पना अभ्यासणे.
२. मागणीचा सिद्धांत व मागणी वक्र समजून घेणे.
३. वैयक्तिक मागणी व बाजार मागणी या संकल्पना अभ्यासणे.
४. मागणी वक्रावरील हालचाली व अंतरण यांचा आढावा घेणे.
५. पुरवठा वक्र व पुरवठा वक्रातील अंतरण समजून घेणे.
६. बाजार पुरवठा व वैयक्तिक पुरवठा अभ्यासणे.
७. बाजार समतोल संकल्पना समजून घेणे.
८. बाजार समतोलाच्या विश्लेषणाच्या आढावा घेणे.
९. कमाल मर्यादा किमान मर्यादा किंमती अभ्यासणे.
१०. कर व त्यांचे परिणाम जाणून घेणे.

## ५.१ बाजारपेठ म्हणजे काय? (WHAT IS MARKET)

बाजारपेठे ही एक विशिष्ट जागा किंवा ठिकाण आहे जेथे ग्राहक व विक्रेता हे एकत्रित येऊन वस्तू किंवा सेवा यांच्या खरेदी वा विक्रीचा व्यवहार करु शकतात.

बाजारपेठ ही संकल्पना प्रदेश, राज्य, देश व आंतरदेश अशा विविध स्तरांवर कार्यरत असते.

## ५.२ स्पर्धा म्हणजे काय? (WHAT IS COMPETITION)

स्पर्धा म्हणजे एकाच प्रकारच्या वस्तू आणि सेवा देणाऱ्या प्रतिस्पर्धांमध्ये जास्तीत जास्त मोबदला, नफा व बाजारातील वाटा मिळवण्याची धडपड होय.

बाजारातील स्पर्धा उद्योगांना अधिकाधिक वस्तू विक्री करण्यासाठी विपणनाच्या मुलभूत चार घटकांचा म्हणजेच वस्तू, स्थल, जाहिरात व किंमत याचा अधिकाधिक वापर करण्यास उत्सुक करते. पुर्ण स्पर्धा ही आदर्श बाजारपेठ मानली जाते. पुर्ण बाजारपेठेतील काही वैशिष्ट्ये :

१) खरेदीदार, विक्रीकार व ग्राहक यांना एकमेकांबद्दल संपूर्ण माहिती.
२) विक्रीसाठीच्या सर्व वस्तू सारख्याच असतात.
३) एकच किंमत
४) नि:पक्ष ग्राहक
५) आगमन व निर्गमनाचे स्वातंत्र्य
६) मोठ्या प्रमाणातील विक्रेता, म्हणून जास्त स्पर्धा

अशा प्रकारे जितके विक्रीदार जास्त तितकी जास्त स्पर्धा. म्हणूनच 'एकाधिकार स्पर्धा' या बाजार संरचनेत एकच विक्रेता असल्याने तेथे स्पर्धक व स्पर्धा दोन्हीही अस्तित्वात नसतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) बाजारपेठ ही संकल्पना स्पष्ट करा.

२) स्पर्धा म्हणजे काय ?

## ५.३ मागणी वक्र (DEMAND CURVE)

### ५.३.१ मागणीचा सिद्धांत :


डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी मागणीचा सिद्धांत खालीलप्रमाणे मांडला आहे.

"बाजारातील इतर सर्व गोष्टी स्थिर असताना विक्रेय वस्तूच्या किंमतीत घसरण झाल्यास त्याच्या मागणीच्या प्रमाणात वाढ होते, आणि वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यास त्याच्या मागणीच्या प्रमाणात घट होते. येथे इतर गोष्टी म्हणजे ग्राहकाचे उत्पन्न, पर्यायी वस्तूंची किंमत, परिपूरक वस्तूंची किंमत, आवड व प्राधान्य, जाहिरात इत्यादी. मागणीचा सिद्धांत हा मागणी केलेल्या वस्तूंची संख्या व मागणीचे प्रमाण यांमधील परस्पराविरोधी संबंध दर्शवितो, हे आपण मागणी वक्राद्वारे स्पष्ट करु शकतो."

**मागणी अनुसूची**

| किंमत | मागणी |
|---|---|
| १० | १० |
| ९ | १२ |
| ८ | १४ |
| ७ | १६ |

वरील तक्ता हेच दर्शवतो की, जेव्हा वस्तूची किंमत कमी होऊ लागते, वस्तुच्या मागणीची संख्या वाढू लागते. हाच तक्ता वापरुन पुढील आलेख तयार करता येईल.




**मागणी वक्र - आकृती ५.१**

वरील आकृतीत 'क्ष' अक्षावर मागणीची संख्या तर 'य' अक्षावर वस्तूची किंमत घेतली आहे. या दोघांमध्ये व्यस्त संबंध असल्या कारणास्तव मागणीचा वक्र खालच्या दिशेने सरकतो. मागणी वक्राचा चढ उतार ऋण असण्यासाठी प्रमूख दोन परिणाम जबाबदार आहेत.

१) वास्तविक उत्पन्न परिणाम

२) पर्यायी परिणाम

**१) 'वास्तविक उत्पन्न परिणाम'** - ग्राहकाच्या उत्पन्नात काहीही बदल झाला नाही पण जर वस्तूंच्या किंमती वाढल्या तर त्याचे वास्तविक उत्पन्न घटते. आणि म्हणूनच त्याची मागणीची संख्या घटते.

**२) 'पर्यायी परिणाम'** - जेव्हा एखाद्या वस्तूची किंमत वाढते, ग्राहक गरज भागविण्यासाठी त्याच्या पर्यायी वस्तूला प्राधान्य देते आणि म्हणून ज्या वस्तूची किंमत वाढली त्याची मागणी घटते.

वरील दोन्हीही परिणामांमुळे मागणीचा सिद्धांत स्पष्ट होतो. या दोन्हींही परिणामांना एकत्रितपणे 'किंमत परिणाम' असेही संबोधले जाते.


### ५.३.२ वैयक्तिक मागणी विरुद्ध बाजार मागणी (Individual demand versus Market demand) :

बाजार मागणी म्हणजेच विशिष्ट वस्तू किंवा सेवांसाठी असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या वैयक्तिक मागणीची बेरीज होय. हेच खालील तक्त्याच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल. समजा A आणि B हे दोनच ग्राहक बाजारात आहेत तर त्या दोन ग्राहकांची मिळून बाजार मागणी कशी तयार होते हे आपणाला पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**व्यक्तीगत आणि बाजार मागणी सूची**

| किंमत | A ची मागणी | B ची मागणी | बाजार मागणी (A ची मागणी + B ची मागणी) |
|---|---|---|---|
| ५ | ६ | १० | १६ |
| १० | ५ | ८ | १३ |
| १५ | ४ | ६ | १० |
| २० | ३ | ४ | ७ |
| २५ | ३ | २ | ५ |

व्यक्तीगत मागणींची बेरिज केल्यानंतर बाजार मागणी मिळते म्हणूनच व्यक्तीगत मागणी निर्धाराचे जे घटक असतात तेच घटक बाजार मागणी निर्धारित करतात.




**आकृती ५.२**


वरील आकृतीत A आणि B च्या मागणी वक्राची आडवी बेरीज केल्यानंतर $D_M$ हा बाजार मागणी वक्र मिळतो. हा बाजार मागणी वक्र किंमतीत बदल होत असताना एकूण मागणी कशी बदलते हे दर्शवितो.

### ५.३.३ मागणी वक्रावर होणाऱ्या हालचाली / मागणीतील विचलन (Movement along the demand curve) :

इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तुच्या किंमतीत बदल झाल्यामुळे मागणीत चढउतार होतात तेव्हा त्याला मागणीतील विचलन असे म्हणतात. मागणीतील विचलन दोन प्रकारचे असते.

१) **मागणीतील विस्तार किंवा प्रसरण :** इतर परिस्थिती स्थिर असता वस्तूंच्या किंमतीत घट झाल्याने मागणीत वाढ होते, तेव्हा त्यास मागणीतील विस्तार किंवा प्रसरण असे म्हणतात.

२) **मागणीतील संकोच किंवा आकूंचन :** इतर परिस्थिती स्थिर असताना वस्तुंच्या किंमतीत वाढ झाल्याने मागणी कमी होते तेव्हा त्यास मागणीतील संकोच किंवा आकूंचन असे म्हणतात. मागणीतील विस्तार व संकोच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**आकृती ५.१३**

वरील आकृतीत A बिंदूवर वस्तूंची किंमत १५ रुपये असून मागणीची संख्या ६ आहे. जेव्हा वस्तूची किंमत १५ रुपयांवरुन १० रुपयांवर घसरते तेव्हा मागणी संख्या ६ वरुन ८ वर जाते. येथे मागणी वक्र A बिंदूवरुन B बिंदूवर खालच्या बाजूला सरकतो. यालाच मागणी वक्रातील विस्तार असे म्हणतात. याऊलट जेव्हा किंमत १५ रुपयांवरुन २० रुपयांपर्यंत वाढते, तेव्हा मागणी ६ वरुन ४ वर घटते. परिणामी मागणी वक्र A बिंदूवरुन C बिंदूकडे वरच्या दिशेने सरकतो, यालाच मागणीतील संकोच म्हणतात. मागणी विस्तार व संकोच दोन्हीही एकाच मागणी वक्रावर दर्शविले जातात.


### ५.३.४ मागणी वक्रातील अंतरण (Shift in demand curve) :

किंमत स्थिर असताना इतर परिस्थितीत बदल झाल्यामुळे मागणीत चढउतार होतात तेव्हा त्या बदलास मागणीतील स्थलांतर किंवा अंतरण असे म्हणतात. मागणीतील अंतरण पुढीलप्रमाणे दोन प्रकारचे असते :

१) **मागणीतील वृद्धी किंवा वाढ :** किंमत स्थिर असताना इतर घटकात बदल झाल्यामुळे जेव्हा मागणी वाढते त्यास मागणीतील वृद्धी किंवा वाढ असे म्हणतात.

२) **मागणीतील घट किंवा ऱ्हास :** किंमत स्थिर असताना इतर घटकात बदल झाल्यामुळे जेव्हा मागणी कमी होते, तेव्हा त्यास मागणीतील ऱ्हास किंवा घट असे म्हणतात.

**उदाहरण :** समजा बाजारात वस्तुंच्या किंमती स्थिर आहेत पण जेव्हा लोकांचे उत्पन्न वाढते तेव्हा, त्यासच किंमतीत ते जास्त संख्येने मागणी करतात यास मागणीची वृद्धी असे म्हणतात, याउलट जेव्हा उत्पन्न कमी होते तेव्हा मागणीच्या संख्येत घट होते. त्यास मागणीतील घट म्हणतात हे बदल आकृतीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे दाखवता येतील.




**आकृती ५.४**

वरील आकृतीमध्ये किंमत २० रुपयांवर स्थिर आहे व ३० ही मागणीची संख्या आहे (मागणी वक्र $d_0$ $d_0$) जेव्हा लोकांचे उत्पन्न वाढते तेव्हा त्यांची मागणीची संख्या वाढते व मागणी वक्र $d_0$ $d_0$ वरुन $d_1$ $d_1$ उजव्या बाजूला वर स्थलांतरीत होतो. या बदलास मागणीची वृद्धी म्हणतात. याउलट उत्पन्न घटल्याने मागणी वक्र डाव्या बाजूला $d_2$ $d_2$ असा सरकतो या बदलास मागणीतील घट असे म्हणतात.

## ५.४ पुरवठा वक्र (SUPPLY CURVE)

**पुरवठा :** पॉल सॅम्युअलसन यांच्या मते, 'बाजारात अस्तित्वात असलेल्या किंमतीला विक्रेता विक्रीसाठी इच्छुक असलेल्या वस्तुंची नगसंख्या यातील संबंध म्हणजे पुरवठा होय.'


**पुरवठ्याचा नियम :** पुरवठ्याचा नियम हा डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी १८९० मध्ये आपल्या 'अर्थशास्त्राची मुलतत्वे' या ग्रंथात मांडला. त्यांच्या मते "इतर परिस्थिती स्थिर असताना अधिक किंमतीला जास्त नगसंख्या विक्रीसाठी आणल्या जातात व कमी किंमतीत कमी नगसंख्या विक्रिसाठी आणल्या जातात."

**पुरवठा वक्र :**

**पुरवठा पत्रक**

| वस्तुची किंमत (रुपये) | पुरवठा (नग) |
|---|---|
| ० | ० |
| ५ | १ |
| १० | २ |
| १५ | ३ |
| २० | ४ |
| २५ | ५ |
| ३० | ६ |

वरील पत्रकाच्या सहाय्याने आपण पुरवठा वक्र पुढीलप्रमाणे काढू शकतो.




**-आकृती ५.५**

वरील आकृतीमध्ये क्ष-अक्षावर पुरवठा नगसंख्या तर य-अक्षावर वस्तुची किंमत दर्शविली आहे. जेव्हा वस्तूची किंमत ५ रुपये आहे तेव्हा १ नग वस्तू पुरविली जाते. जसजशी किंमत वाढते पुरवठा संख्याही वाढत जाते व जेव्हा किंमत ३० रुपये होते. पुरवठा संख्या ६ नगापर्यंत वाढते. अशा प्रकारे वस्तुची किंमत आणि पुरवठा दर्शविणारे बिंदू स्थापन करुन एकत्र जोडल्यास हा पुरवठा वक्र मिळतो. किंमत आणि पुरवठा संख्या यामध्ये सरळ संबंध असल्या कारणास्तव पुरवठा वक्र वरच्या दिशेने सरकतो.


### ५.४.१ बाजार पुरवठा आणि वैयक्तिक पुरवठा :

१) **वैयक्तिक पुरवठा :** वरील पुरवठा वक्र संकल्पना, पुरवठा वक्र व आकृती ५.४ मधील पुरवठा वक्र, वैयक्तिक पुरवठा म्हणून ग्राह्य धरावा.

२) **बाजार पुरवठा :** विशिष्ट कालावधीत विविध किंमत पातळीला बाजारातील सर्व विक्रेत्यांनी विक्रिसाठी आणलेल्या नगसंख्या दर्शविणारे पत्रक म्हणजेच बाजार पुरवठा पत्रक होय. वैयक्तिक पुरवठ्याची बेरीज केली असता बाजार पुरवठा पत्रक मिळतो

**बाजार पुरवठा पत्रक :**

| पेन्सिलची किंमत (रुपये) | A चा पेन्सिल पुरवठा (नग) | B चा पेन्सिल पुरवठा (नग) | पेन्सिलचा बाजार पुरवठा (नग) |
|---|---|---|---|
| ५ | १ | ३ | ४ |
| १० | २ | ५ | ७ |
| १५ | ३ | ७ | १० |
| २० | ४ | ९ | १३ |
| २५ | ५ | ११ | १६ |
| ३० | ६ | १३ | १९ |




**आकृती ५.६**

वरील आकृतीत $S_A$ हा A चा पुरवठा वक्र आहे. तसेच $S_B$ हा B चा पुरवठा वक्र आहे. A आणि B चा पुरवठा वक्राची आडवी बेरीज केल्यानंतर SS हा बाजार पुरवठा वक्र मिळतो.


### ५.४.२ पुरवठा वक्रातील अंतरण :

किंमत स्थिर असताना इतर परिस्थितीत बदल झाल्यामुळे पुरवठ्यात चढउतार होतात, त्या बदलांना पुरवठ्यातील अंतरण किंवा स्थलांतर असे म्हणतात. पुरवठ्यातील अंतरण पुढीलप्रमाणे दोन प्रकारचे असते.

**१) पुरवठ्यातील वाढ / वृद्धी :** "किंमत स्थिर असताना इतर घटकात अनुकूल बदल झाल्यामुळे, जसे उत्पन्न घटकाच्या किंमतीत घट, कराच्या प्रमाणात घट, तांत्रिक सुधारणा, इ. मुळे पुरवठा वाढतो त्यास पुरवठ्यातील वाढ किंवा वृद्धी असे म्हणतात."

**२) पुरवठ्यातील घट :** "किंमत स्थिर असताना इतर घटकात प्रतिकूल बदल झाल्यामुळे, जसे उत्पादन घटकाच्या किंमतीत वाढ, जुने उत्पादन नग इत्यादीमुळे पुरवठा कमी होतो त्यास पुरवठ्यातील घट किंवा ऱ्हास असे म्हणतात."

पुरवठ्यातील वाढ आणि घट पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करतात.





**आकृती ५.७**

वरील आकृतीत OX अक्षावर वस्तुची पुरवठा संख्या आणि OY अक्षावर वस्तुची किंमत आहे. मुळ किंमत २० रुपये असताना ६ नग वस्तूचा पुरवठा झाला. किंमत स्थिर असताना इतर घटकांत अनुकूल बदल झाल्याने पुरवठा संख्या ४ वरुन ६ वर पोहोचते व पुरवठा वक्र $S_1$, वरुन $S_2$ वर सरकतो. हा बदल म्हणजेच पुरवठ्यातील वृद्धी होय. याउलट इतर घटकांच्या प्रतिकूल बदलांमुळे त्याच किंमतीत वस्तुची पुरवठ्या संख्या ६ वरुन ४ वर घटते. पुरवठा वक्र $S_1$ वरुन डावीकडे $S_3$ वर सरकतो, या बदलास पुरवठ्यातील घट असे संबोधतात.

## ५.५ बाजार समतोल संकल्पना (CONCEPT OF MARKET EQUILIBRIUM)

आतापर्यंत आपण मागणी आणि पुरवठा यांचे स्वातंत्र्यरित्या विश्लेषण केले. आता त्यांचा एकत्रित विचार करुन बाजारपेठेत वस्तु व सेवांची समतोलीन किंमत आणि नगसंख्या कशी निश्चित होते हे पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

समतोल म्हणजेच अशी परिस्थिती की, ज्यात पुरवठा आणि मागणी समान असते. पुरवठा आणि मागणी समान असताना जी किंमत निश्चित होते तिलाच समतोल किंमत म्हणतात. खालील आकृतीत बाजार पुरवठा वक्र व बाजार मागणी वक्र ज्या बिंदूत छेदतात त्या बिंदूला बाजार समतोल असे म्हणतात. या छेदन बिंदूत जी किंमत असते तिला समतोलीत किंमत आणि छेदन बिंदूतील नगसंख्येला समतोलीन नगसंख्या असे म्हणतात.




**आकृती ५.८**

आकृतीत DD - मागणी वक्र आणि SS -पुरवठा वक्र E या बिंदूत परस्परांना छेदतात. या बिंदूवरुन पेन्सिलची समतोल किंमत २० रुपये आणि समतोल नगसंख्या ८ इतकी आहे. समतोलीन किंमतीला पुरवठा नगसंख्या व मागणी नगसंख्या समान आहेत.

समतोल किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारल्यास, उदा. रुपये, २५ अशावेळी पुरवठा नगसंख्या वाढते. (बिंदू - B) पण मागणी नगसंख्या कमी होते. (बिंदू - A) परिणामी अतिरिक्त पुरवठ्याची परिस्थिती निर्माण होते. याउलट जेव्हा किंमत १५ रुपये आकारली जाते तेव्हा मागणी नगसंख्या वाढते (बिंदू - D) पुरवठा नगसंख्या कमी होते (बिंदू - C) परिणामी अतिरिक्त मागणीची परिस्थिती निर्माण होते. म्हणूनच मागणी आणि पुरवठा वक्रावर बिंदू व्यतिरिक्त कोणत्याही बिंदूवर बाजार असमतोल होतो आणि अतिरिक्त मागणी किंवा पुरवठ्याची परिस्थिती निर्माण होते.

## ५.६ समतोलाच्या बदलाच्या विश्लेषणाचे तीन टप्पे (THREE STEPS TO ANALYSE CHANGES IN MARKET EQUILIBRIUM)


समतोलीत किंमत आणि नगसंख्या, पुरवठा आणि मागणी वक्राच्या परिस्थितीवर अवलंबून असते. यापैकी कोणत्याही एकात किंवा दोहोत एखाद्या घटनेमुळे बदल झाल्यास बाजार समतोलात बदल घडून येतो. परिणामी समतोलीत, किंमत आणि नगसंख्या सुद्धा बदलते. अशा बदलांच्या विश्लेषणाला तुलनात्मक स्थितीशील असे म्हणतात. या बाजार समतोलात कशाप्रकारे बदल घडून येतो याचे विश्लेषण पुढील तीन टप्प्यात करता येते.

१) मागणीतील बदल
२) पुरवठ्यातील बदल
३) मागणी व पुरवठा दोहोंतील बदल

### १) मागणीत बदल झाल्यामुळे बाजार समतोलातील बदल (Chage in Market equilibrium due to shift in demand) :

दिलेल्या किंमतीला इतर कोणत्याही घटकात बदल झाल्यामुळे मागणी वाढणार असेल तर मागणी वक्र वरच्या दिशेने उजव्याबाजूला सरकतो. परिणामी समतोलीत किंमत आणि

नगसंख्येत वाढ घडून येते. उदा. सणासुदीला फुलांची मागणी खुप असते, पुरवठा नेहमीप्रमाणेच असल्याकारणाने बाजारातील फुलांच्या किंमतीत वाढ होताना दिसते.





**आकृती ५.९**

वरील आकृतीच्या सहाय्याने मागणी वक्राच्या स्थलांतराबरोबरच पुरवठा वक्रावरील विचलन सुद्धा स्पष्ट करता येते. ज्यावेळी फुलांची मागणी वाढते त्यावेळी मागणी वक्र dd वरच्या बाजूला $d_1$ $d_1$ असा सरकतो पण पुरवठा तोच असल्याने फुलांची किंमत ३०० रुपयांवरुन ४०० रुपयांवर जाते. परंतु किंमत वाढत असताना पुरवठ्यात देखील वाढ होते त्यास पुरवठ्याचे विचलन म्हणजेच पुरवठ्याचा विस्तार असे म्हणतात.

### २) पुरवठ्याचे स्थलांतर झाल्यामुळे बाजार समतोलातील बदल (A change in market equilibrium due to a shift in supply) :

कोणत्याही घटनेमुळे दिलेल्या किंमतीला पुरवठा नागसंख्येत घट झाली तर पुरवठा वक्र डाव्या बाजूला सरकतो. परिणामी समतोलीन किंमत वाढते व नगसंख्येत घट होते. उदा. समजा अतिपावसामुळे किंवा दुष्काळ परिस्थितीमुळे गव्हाचे पिक घटते पण त्याचा परिणाम त्यांच्या किंमतीवर होतो व किंमती वाढतात.





**आकृती ५.१०**

वरील आकृती मध्ये SS हा मुळ पुरवठा वक्र आहे पण काही कारणास्तव जेव्हा गव्हाचे उत्पन्न घटते तेव्हा गव्हाचा पुरवठा वक्र डाव्या बाजूला SS वरुन $S_1$ $S_1$ वर सरकतो. समतोल

E वरुन $E_1$ वर सरकतो. परिणामी किंमत २०० रुपयांवरुन ३०० रुपयांवर पोहोचते परिणामी गव्हाच्या मागणीतही घट होते.

### ३) मागणी आणि पुरवठ्यातील बदल (Change in demand and supply) :

कोणत्याही घटनेमुळे पुरवठा व मागणी या दोघांमध्येही अनुकूल बदल घडून आल्यास किंमत पुर्ववत होते पण तसे न झाल्यास व परस्पर विरोधी बदल झाल्यास समतोलीन किंमत बदलते.




**आकृती ५.११**

वरील आकृतीत dd आणि SS हे अनुक्रमे मुळ मागणी वक्र व पुरवठा वक्र आहेत. जेव्हा मागणी व पुरवठा दोन्हीही वाढतात तेव्हा dd आणि SS उजव्या बाजूला अनुक्रमे $d_1$ $d_1$ $S_1$ $S_1$ असे सरकतात व किंमत पूर्वीप्रमाणे ३० रुपयांवर स्थिरावते. हाच बदल विरुद्ध दिशेतील बदलानेही दाखवता येतो.


## ५.७ कमाल मर्यादा किंमत व किमान मर्यादा किंमत (PRICE CELLING AND FLOOR PRICING):

मुक्त स्पर्धा बाजारात मागणी आणि पुरवठा एकत्रितपणे वस्तू किंवा सेवेची समतोलीत किंमत ठरवतात. ही पद्धत आदर्श आहेच पण अशा मुक्त बाजारात ठरवलेल्या समतोलीन किंमतीमुळे ग्राहक किंवा विक्रेता यांवर प्रतिकूल परिणाम होत असेल किंवा ही किंमत त्यांच्यासाठी अयोग्य असेल तर सरकार हस्तक्षेप करुन किंमतीवर नियंत्रण मिळवून योग्य ती किंमत ठरवतो. जर ग्राहकांची संघटना दबाव आणण्यात यशस्वी झाली तर ग्राहकांसाठी फायदेशीर कमाल किंमत ठरवून दिली जाते. या किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारता येणार नाही म्हणून तिला कमाल किंमत मर्यादा (Price Celling) असे म्हणतात. याउलट विक्रेत्यांची संघटना यशस्वी झाली तर सरकार कायदेशीर किमान किंमत मर्यादा ठरवून देतो, यापेक्षा कमी किंमत आकारता येत नाही म्हणून याला किमान मर्यादा (Price Floor) असे म्हणतात. याचे परिणाम पुढीलप्रमाणे विचारात घेता येतात.

## १) कमाल मर्यादा किंमतीचे बाजार निष्पत्तीवर कसे परिणाम होतात? (How Price Ceiling affects market outcomes) :

ज्यावेळी सरकार ग्राहकांच्या बाजूने विचार करुन कमाल मर्यादा किंमती ठरवून देईल त्यावेळी दोन शक्यता निर्माण होतात. १) समजा सरकारने ४० रुपये प्रतिनग कमाल मर्यादा किंमत ठरवून दिल्यामुळे समतोलीन किंमत मर्यादा कमाल मर्यादा किंमतीपेक्षा कमी राहील. त्यामुळे कमाल मर्यादा किंमत बंधनकारक राहणार नाही. कारण कमाल मर्यादा किंमतीचा काहीच परिणाम दिसून येणार नाही. २) समजा सरकारने २० रुपये प्रतिनग किंमत ठरवून दिली. समतोलीन किंमत ३० रुपये, प्रतिनग असल्यामुळे आता कमाल मर्यादा किंमत बंधनकारक असेल. या किंमतीला वस्तुची मागणी जास्त आणि पुरवठा कमी राहिल. परिणामी वस्तुंच्या तुटवडा निर्माण होईल व काही लोकांना खरेदी करायची असताना सुद्धा उपलब्ध होणार नाहीत.


कमाल मर्यादा किंमतीमुळे वस्तुची टंचाई निर्माण होईल त्यामुळे नियंत्रित बद्धतीचा वापर करावा लागलेल्या वस्तुच्या तुटवड्यामुळे बाजारात असणाऱ्या वस्तु मिळवण्यासाठी चुकीचा मार्गही अवलंबला जाऊ शकतो. म्हणूनच ज्यावेळी सरकार स्पर्धात्मक बाजारात बंधनकारक किंमत मर्यादा लादते त्यावेळी वस्तुचा तुटवडा निर्माण होतो आणि विक्रेते टंचाई असणारी वस्तू मोठ्या संख्येने असणाऱ्या संभाव्य ग्राहकांना नियंत्रित पद्धतीने विकतात. कमाल मर्यादित किंमतीमुळे नियंत्रण यंत्रणा विकसित होत असेल तर क्वचितच इष्ट असते. अकार्यक्षमता निर्माण होते कारण त्यामुळे ग्राहकांच्या वेळेचा अपव्यय होतो. मुक्त स्पर्धात्मक बाजारातील नियंत्रण यंत्रणा ही कार्यक्षम आणि व्यक्ती निरपेक्ष असते. ज्यावेळी बाजारात समतोल असतो त्यावेळी कोणताही ग्राहक की जो बाजार किंमत देण्यास तयार असतो त्याला ती वस्तु मिळते कारण मुक्त बाजारात वस्तुचे वाटप बाजार किंमतीला होत असते.




**आकृती ५.१२**

**बंधनकारक नसलेली कमाल मर्यादा किंमत**

वरील आकृतीत वस्तुची समतोलीत किंमत ३० रुपये प्रति नग इतकी आहे. सरकारने कमाल मर्यादा किंमत ४० रुपये प्रतिनग निश्चित केली. कमाल मर्यादा किंमत ही समतोलीत किंमतीपेक्षा जास्त असल्यामुळे या किंमतीचा प्रभाव दिसून येणार नाही त्यामुळे ३० रुपये प्रतिनग या बाजार किंमतीलाच मागणी व पुरवठ्यात समतोल प्रस्थापित होईल. या समतोलवस्थेत पुरवठा नगसंख्या आणि मागणी संख्या दोन्हीही समान म्हणजेच १०० नग इतकी आहे.





**आकृती ५.१३**
**बंधनकारक कमाल मर्यादा**

वरील आकृतीत समतोलीत किंमत २० रुपये प्रतिनग इतकी आहे. सरकारने कमाल मर्यादा किंमत १० रुपये प्रतिनग निश्चित केली आहे. ही कमाल मर्यादा किंमत समतोलीत किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे बाजार किंमत १० रुपये प्रतिनग या समतोलीत किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे बाजार किंमत २० रुपये प्रतिनग अशी राहील आणि फक्त ६० नगांच्या पुरवठा होत व ४० नगांचा तुटवडा आहे.

वरील उदाहरणारुन एक सामान्य निष्कर्ष मिळतो, ज्यावेळी सरकार स्पर्धात्मक बाजारपेठेत कमाल मर्यादा किंमत बंधनकारकरित्या ठरवून देतो त्यावेळी वस्तुचा तुटवडा निर्माण होतो. आणि विक्रते मोठ्या संख्येने खरेदी क्षमता असणाऱ्या ग्राहकांना तुटवडा असणारी वस्तु नियंत्रित पद्धतीने विकतात. कमाल मर्यादा किंमत पद्धतीने ही वितरण यंत्रणा इच्छेविरुद्ध असते. दिर्घकाळातील ती अकार्यक्षण असते कारण यामध्ये ग्राहकांचा खुप वेळ वाया जातो. तसेच विक्रेता विक्रेत्यांमार्फत भेदाभेद केला जातो कि जे ग्राहकांच्या दृष्टिकोनातुन अयोग्य असते.


### २) किमान मर्यादा किंमतीचे बाजार निष्पत्तीवर कसे परिणाम होतात? (How Price Floor affect market outcomes) :

ज्यावेळी सरकार ग्राहकांच्या बाजूने विचार करुन किमान मर्यादा किंमत ठरवून देते त्यावेळी दोन शक्यता निर्माण होतील. समजा सरकारने २० रुपये प्रतिनग किमान मर्यादा किंमत ठरवून दिली. समतोलीन किंमत २० रुपये प्रतिनग असल्यामुळे किमान मर्यादा किंमतीचा बाजार किंमतीवर काहीच परिणाम होणार नाही. हे पुढील आकृतीने स्पष्ट होते.




**आकृती ५.१४**
**बंधनकारक नसलेली किमान मर्यादा किंमत**

वरील आकृतीमध्ये वस्तुची समतोलीन किंमत ३० रुपये प्रतिनग इतकी आहे व समतोलीन पुरवठा व मागणी १०० नग आहे. सरकारने किमान मर्यादा किंमत २० रुपये प्रतिनग इतकी निश्चित केली. ही किमान मर्यादा किंमत समतोलीत किंमतीपेक्षा कमी आहे. त्यामुळे या किंमतीचा समतोलीत बाजार किंमतीवर काहीच परिणाम होणार नाही. बाजार किंमत व मागणी पुरवठ्यात समायोजन घडवून आणेल व त्यामुळे समतोलीत मागणी व पुरवठा नगसंख्या १०० इतकीच राहील.




**आकृती ५.१५**
**बंधनकारक किमान मर्यादा किंमत**

वरील आकृतीत वस्तुची समतोलीत बाजार किंमत ३० रु. प्रतिनग इतकी आहे. सरकारने किमान मर्यादा किंमत ४० रुपये प्रतिनग इतकी निश्चित केली जी समतोलीत बाजार किमंतीपेक्षा जास्त आहे. म्हणून आता बाजार, किंमत ४० रुपये प्रतिनग इतकी राहील. या किंमतीला १२० नगसंख्येच्या पुरवठा आहे. परंतु मागणी फक्त ८० नगसंख्येची असल्याने ४० नगसंख्येचा वाढावा बाजारात होईल. अशाप्रकारे जर किमान मर्यादा किंमत बंधनकारक असेल तर पुरवठ्यात वाढावा निर्माण होतो किमान मर्यादा किंमतीच्या परिस्थितीत काही विक्रेते त्यांच्याकडील सर्व उत्पादनातील विक्री करु शकत नाही.

## ५.८ प्रश्न (QUESTIONS)

१) बाजारपेठ म्हणजे काय ?

२) स्पर्धा म्हणजे काय ?

३) टीप लिहा : मागणी वक्र

४) वैयक्तिक मागणी व बाजार मागणीतील फरक स्पष्ट करा.

५) टीप लिहा :
   १)मागणीतील विचलन
   २)मागणीतील अंतरण

६) बाजार पुरवठा व वैयक्तिक पुरवठा यांतील फरक स्पष्ट करा.

७) टीप लिहा :
   १)पुरवठा वक्र
   २)पुरवठा वक्रातील अंतरण

८) बाजार समतोलाची संकल्पना स्पष्ट करा.

९) समतोलाच्या बदलाच्या विश्लेषणाचे तीन टप्पे स्पष्ट करा.

१०) टीप लिहा :
   १)कमाल मर्यादा किंमत
   २)किमान मर्यादा किंमत

११) कमाल मर्यादा किंमतीचा बाजार निष्पत्तीवर कसा परिणाम होतो.

१२) किमान मर्यादा किंमतीच्या बाजार निष्पत्तीवरील परिणाम स्पष्ट करा.

❖❖❖❖

# घटक -६

# मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता
# (ELASTICITY OF DEMAND)

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता
६.२ एकूण प्राप्ती आणि मागणीतील लवचिकता
६.३ प्राप्तीची संकल्पना आणि मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता
६.४ किंमत लवचिकतेच्या प्राप्तीवरील परिणाम
६.५ एकूण प्राप्ती आणि मागणीची किंमत लवचिकता
६.६ कर आणि त्यांचे परिणाम
६.७ सरावासाठी प्रश्न
६.८ संदर्भसूची

## ६.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

- मागणीची किंमत सापेक्ष लवचिकता अभ्यासणे.
- प्राप्ती आणि लवचिकता यातील परस्परसंबंध जाणून घेणे.
- किंमत लवचिकतेचा मागणीवरील परिणाम अभ्यासणे.
- कर व त्यांचे परिणाम समजून घेणे.

## ६.१ मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता (PRICE RELATIVE ELASTICITY OF DEMAND)

मागणीच्या लवचिकतेचा सिद्धांत डॉ. मार्शल यांनी दिला. मागणीच्या सिद्धांतावरुन किंमतीत बदल होत असताना मागणीत बदल होतो हे समजते. परंतु या बदलाचे प्रमाण स्पष्ट होत नाही आणि म्हणूनच मागणीची लवचिकता या बदलाचे प्रमाण निश्चित करतो.

"वस्तुच्या मागणीतील बदलाचे मागणीच्या निर्धारक घटकाच्या बदलाशी असलेले प्रमाण म्हणजे मागणीची लवचिकता होय."

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील प्रमाणशीर बदल}}{\text{मागणीच्या निर्धारक घटकातील प्रमाणशीर बदल}}$$

मागणीच्या लवचिकतेचे प्रकार :

१) मागणीची किंमत लवचिकता
२) मागणीची उत्पन्न लवचिकता
३) मागणीची छेदक किंवा तिरकस लवचिकता
४) मागणीची जाहिरात लवचिकता.

**मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता (Price elasticity of demand) :**

डॉ. मार्शल यांच्या मते, ''वस्तुच्या किंमतीत झालेल्या बदलाचा परिणाम म्हणून वस्तुच्या मागणीत जे प्रमाणशीर बदल होतात त्यांचे गुणोत्तर म्हणजेच मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता होय.''

$$\text{मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता} = \frac{\text{मागणीतील प्रमाणशीर बदल}}{\text{किंमतीतील प्रमाणशीर बदल}}$$

$$EP = \frac{\Delta Q}{Q} \div \frac{\Delta P}{P}$$

$$= \frac{\Delta Q}{Q} \times \frac{P}{\Delta P}$$

$$= \frac{\Delta Q}{\Delta P} \times \frac{P}{Q}$$

येथे $EP$ = मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता

$\Delta Q$ = मागणीतील बदल

$Q$ = मुळ मागणी

$\Delta P$ = किंमतीतील बदल

$P$ = मुळ किंमत

उदा. खालील माहितीच्या आधारे मागणीची किंमत-सापेक्ष लवचिकता काढा.

| **किंमत (रुपये)** | **मागणी (नगसंख्या)** |
|---|---|
| 10 ($P_1$) | 50 ($Q_1$) |
| 15 ($P_2$) | 40 ($Q_2$) |

मागणीतील बदल $\Delta Q = Q_2 - Q_1 = 40 - 50 = -10$

किंमतीतील बदल $\Delta P = P_2 - P_1 = 15 - 10 = 5$

मुळ मागणी $Q = 50$

मुळ किंमत $P = 10$

$$EP = \frac{\Delta Q}{\Delta P} , \frac{P}{Q}$$

$$= \frac{-10}{5} \times \frac{10}{50}$$

$$= \frac{-2}{5}$$

$$= -0.4$$

**मागणीच्या किंमतसापेक्ष लवचिकता मोजण्याच्या पद्धती (Methods of measuring price elasticity of demand) :**

**१) शेकडा पद्धत :**

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीतील शेकडा बदल}}{\text{किंमतीतील शेकडा बदल}}$$

$$EP = \frac{\Delta Q}{\Delta P} \div \frac{\Delta P}{P}$$

$$= \frac{\Delta Q}{\Delta P} \times \frac{P}{Q}$$


उदा. समजा किंमतीत १० टक्के बदल घडून आला व त्याचा परिणाम म्हणून मागणीत सुद्धा १० टक्क्यांचा बदल झाला तर वरील सुत्राप्रमाणे लवचिकता पुढीलप्रमाणे :

$$EP = \frac{10}{10} = 1$$

हा गुणांक एक आहे म्हणून मागणी एकक लवचिक आहे. (जेव्हा गुणांक एकपेक्षा कमी असते तेव्हा मागणी एकक कमी लवचिक असते. उदा. ०.५, ०.६, ०.९, इ.)

**२) भूमिती पद्धत :**

$$\text{मागणीची लवचिकता} = \frac{\text{मागणीवक्रावरील बिंदूपासूनचा खालचा भाग (Lower segment)}}{\text{मागणीवक्रावरील बिंदूपासूनचा वरचा भाग (Upper segment)}}$$




**आकृती ६.१**

१) A बिंदूत मागणीची किंमत लवचिकता $= \frac{AB}{O} \therefore E_p = \alpha$ (मागणी अगणित लवचिक आहे)

२) R बिंदूत मागणीची किंमत लवचिकता $= \frac{RB}{RA} \therefore E_p > 1$ (मागणी अधिक लवचिक आहे)

३) S बिंदूत मागणीची किंमत लवचिकता $= \frac{SB}{SA} \therefore E_p = 1$ (मागणी एकक लवचिक आहे)

४) T बिंदूत मागणीची किंमत लवचिकता $= \frac{TB}{TA} \therefore E_p < 1$ (मागणी कमी लवचिक आहे)

५) B बिंदूत मागणीची किंमत लवचिकता $= \frac{O}{BA} \therefore E_p = 0$ (मागणी लवचिक नाही आहे)

## ६.२ एकूण प्राप्ती आणि मागणीतील लवचिकता (TOTAL REVENUE AND ELASTICITY OF DEMAND)

मागणीची लवचिकता मापन करण्याची सर्वात सोपी पद्धत म्हणून डॉ. मार्शल यांनी एकूण खर्च पद्धत सुचविली आहे.

- जर किंमत कमी होत असताना एकूण खर्च वाढत असेल तर मागणीची किंमत लवचिकता एक पेक्षा जास्त असते.
- जर किंमत कमी होत असताना एकूण खर्चात काहीच बदल होत नसेल तर मागणी किंमत लवचिकता एक असते.
- जर किंमत कमी होत असताना एकूण खर्च घटत असेल तर मागणीची किंमत लवचिकता एकापेक्षा कमी असतो. हेच पुढील तक्त्याच्या सहाय्याने मागणीच्या लवचिकतेचे मापन करता येईल.

**एकूण खर्च आणि किंमत लवचकिता**

| वस्तुची किंमत (रुपयात) | वस्तुची मागणी (नगसंख्या) | एकूण खर्च (रुपयात) | किंमत लवचिकता |
|---|---|---|---|
| ५० | ४० | २००० | जास्त लवचिकता $(e>1)$ |
| ४० | ६० | २४०० | |
| ५० | ४० | २००० | एकक लवचिकता $(e=1)$ |
| ४० | ५० | २००० | |
| ५० | ४० | २००० | कमी लवचिकता $(e<1)$ |
| ४० | ४५ | १८९० | |

**जास्त लवचिक मागणी** $(E_p > 1)$ :

वस्तुची किंमत कमी होत असताना त्या वस्तुवरील एकूण खर्चात वाढ होत असेल आणि किंमत वाढत असताना एकूण खर्चात घट होत असेल तर वस्तुच्या मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त असते. वरील तक्त्यात वस्तुची किंमत ५० रुपयांवरुन ४० रुपयांवर जाते व मागणी ४० वरुन ६० अशी वाढली आहे व एकूण खर्चात २००० रुपयांवरुन २४०० रुपये अशी वाढ झाली आहे.


**एकक लवचिक मागणी $\left(E_p = 1\right)$ :**

वस्तुची किंमत कमी होत असताना किंवा वाढत असताना एकूण खर्चात कोणताही बदल होत नसेल म्हणजे एकूण खर्च स्थिर असेल तेव्हा वस्तुच्या मागणीची लवचिकता एक असते.तक्त्यात वस्तुची किंमत ५० रुपयांवरुन ४० रुपयांपर्यंत कमी झाल्यानंतर सुद्धा एकूण खर्च २००० रुपये स्थिर आहे.

**कमी लवचिक मागणी $\left(E_p < 1\right)$ :**

वस्तुची किंमत कमी होत असताना वस्तुतिल एकूण खर्चात घट होत असेल आणि किंमतीत वाढ होत असताना एकूण खर्चात वाढ होत असेल तर वस्तुच्या मागणीची लवचिकता एक पेक्षा कमी असते. तक्त्यात किंमत ५० रुपयांवरुन ४० रुपये अशी कमी झाल्यावर मागणीत ४० नगांवरुन ५० नग अशी वाढ झाली परंतु एकूण खर्च २००० रुपयांवरुन १८९० रुपये असा कमी झाला.

किंमत आणि एकूण खर्च यातील संबंध आकृतीच्या सहाय्याने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल;




**आकृती ६.२**

वरील आकृती X अक्षावर खर्च आणि Y अक्षावर किंमत दर्शविली आहे. dc या वरच्या भागात किंमत कमी होत असताना एकूण खर्च वाढत आहे. म्हणजेच किंमत आणि एकूण खर्च यात व्यस्त संबंध आहे म्हणून मागणी जास्त लवचिक आहे. cb या मधल्या भागात किंमत कमी होत असताना किंवा वाढत असताना एकूण खर्च स्थिरच आहे म्हणून मागणीची किंमत लवचिकता एक आहे. ab या खालच्या भागात किंमत कमी होत असताना एकूण खर्च कमी होत आहे. कारण किंमतीतील बदलाच्या तुलनेत मागणीतील बदल कमी आहे. म्हणून मागणी कमी लवचिक आहे.

## ६.३ प्राप्तीची संकल्पना आणि मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता (CONCEPT OF REVENUE AND PRICE ELASTICITY OF DEMAND)

उपभोक्त्यांचा खर्च ही उत्पादकाची प्राप्ती असते. उपभोक्त्याच्या एकुण खर्च हा त्या वस्तुची किंमत आणि खरेदी नगसंख्या यांच्या गुणाकारातून मिळतो.

उपभोक्त्याच्या एकुण खर्च = किंमत × खरेदी नगसंख्या

हा एकुण खर्च विक्रेत्यासाठी एकुण प्राप्ती असते. किंमतीत बदल झाल्यामुळे एकुण खर्च किंवा एकुण प्राप्ती बदलते. यावरुन खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे लवचिकतेचे मोजमाप करता येते.

| **किंमतीतील बदल (वाढ / घट)** | **एकुण खर्चातील बदल बदल नाही** | **किंमत लवचिकता १** |
|---|---|---|
| घट | वाढ | १ पेक्षा जास्त |
| वाढ | घट | १ पेक्षा जास्त |
| घट | घट | १ पेक्षा कमी |
| वाढ | वाढ | १ पेक्षा कमी |


उदा.

| **किंमत** $(P)$ | **मागणी नगसंख्या** $(Q)$ | **एकूण प्राप्ती** $(P \times Q)$ | **किंमत लवचिकता** |
|---|---|---|---|
| ५ | ८ | ४० | एकक |
| ८ | ५ | ४० | |
| ५ | ८ | ४० | एक पेक्षा जास्त |
| ७ | ६ | ४२ | |
| ५ | ८ | ४० | एक पेक्षा कमी |
| ४ | ९ | ३६ | |

## ६.४ किंमत लवचिकतेचा प्राप्तीवरील परिणाम (IMPACT OF PRICE ELASTICITY ON REVENUE) :

**एकूण प्राप्ती :** ग्राहक वस्तुला जी किंमत देतो ती किंमत विक्रेत्याना प्राप्ती म्हणून मिळते म्हणून ग्राहकाने दिलेली एकूण किंमत आणि विक्रेत्याला मिळणारी एकुण प्राप्ती समान असते. खालील आकृतीत किंमत ४ रुपये आहे व विक्री नगसंख्या १०० नग आहे. म्हणून

एकुण प्राप्ती = किंमत × नगसंख्या
= ४ × १००
= ४०० रुपये





आकृती ६.३

## ६.५ एकुण प्राप्ती आणि मागणीची किंमत लवचिकता (TOTAL REVENUE AND PRICE ELASTICITY OF DEMAND) :

ज्यावेळी किंमत बदलते त्यावेळी एकुण प्राप्तीत बदल घडून येतो पण हा बदल किती असेल हे मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते. या संदर्भात मागणीच्या किंमत लवचिकतेचा पुढील दोन शक्यता विचारात घेउ.

**अ) लवचिक मागणी :** मागणी वक्र लवचिक असल्यास किंमत वाढल्यावर एकुण प्राप्ती वाढवण्याऐवजी कमी होते.

खालील आकृतीत मुळ किंमत ४ रुपये इतकी असताना मागणी ५० नग आहे. म्हणून
एकुण प्राप्ती = किंमत × नगसंख्या
= ४ × ५०
= २०० रुपये





आकृती ६.४

जेव्हा किंमत वाढते व ४ रुपयांवरुन ५ अशी होते. तेव्हा मागणी ५० नगावरुन २० नग अशी कमी होते म्हणून प्राप्तीत २०० रुपयांवरुन १०० रुपये अशी घट होते.

एकुण प्राप्ती = किंमत × नगसंख्या
= ५ × २०
= १०० रुपये

मागणी लवचिक असल्यामुळे किंमतीत थोडी वाढ झाल्यास मागणीमध्ये किंमतीतील वाढीपेक्षा जास्त प्रमाणात घट होते म्हणून मागणी लवचिक असताना किंमत वाढल्यास एकुण प्राप्तीत घट होते.

**ब) अलवचिक मागणी :** मागणीवक्र अलवचिक असताना किंमत वाढल्यास मागणीमध्ये घट होते. परंतु किंमतीतील वाढीपेक्षा मागणीतील घट कमी असते म्हणून एकूण प्राप्तीत वाढ होते. हे पुढील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.




**आकृती ६.५**

वरील आकृतीत मुळ किंमत १ रुपया असताना मागणी १०० नग इतकी आहे. जेव्हा किंमत १ रुपयांवरुन ३ रुपये अशी वाढली तर मागणी १०० नगांवरुन ८० नग अशी कमी होते. हा बदल आकृतीच्या उजव्या भागात दाखविला आहे. त्यानुसार

एकुण प्राप्ती = किंमत × नगसंख्या
= ३ × ८०
= २४० रुपये

अशाप्रकारे किंमत १ रुपयांवरुन ३ रुपये अशी वाढत असताना मागणी १०० नगावरुन ८० नग अशी कमी हाते व एकूण प्राप्ती १०० रुपयांवरुन २४० रुपये अशी वाढते.

## ६.६ कर आणि त्यांचे परिणाम (TAXES AND THEIR IMPACT)

करप्रणाली हे सरकारचे महत्त्वाचे धोरण आहे ज्यातून त्यांना अनेक समाजोपयोगी कामांसाठी महसूल मिळतो. हा कर केंद्र, राज्य व स्थानिक असा विभागला जातो. करांचा मानवी जीवनावर अनेक मार्गाने परिणाम होतो.


समजा महानगरपालिकेने वार्षिक आईस्क्रीम महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. या महोत्सवाचा खर्च पुर्ण करण्यासाठी महसुलात वाढ करणे अपेक्षित आहे म्हणून आईस्क्रिमवर ५ रुपये प्रतिनग कर आकारण्याचे ठरविण्यात आहे. व ह्या कराची रक्कम ग्राहक आणि विक्रेते यामध्ये विभागण्याचे ठरले. या प्रस्तावाचे विश्लेषण करण्यासाठी आपल्याला काही साधे प्रश्न विचारात घ्यावे बागतात ते म्हणजेच सरकार वस्तुवर केव्हा कर आकारणार आहे व करभार कोण सहन करणार आहे? वस्तु खरेदी करणारे ग्राहक की विक्रेते? किंवा दोघांमध्ये विभागला तर कर भराचे वितरण कसे होईल? मागणी आणि पुरवठ्याच्या साधनांचा वापर करुन कर भाराचे वितरण कसे होते यावर पुढील विश्लेषण करता येईल.

कराचा परिणाम तपासणीसाठी आपणाला मुळ समतोल आणि नवीन समतोलाची तुलना करावी लागते. आकृतीवरुन हे स्पष्ट होते की, आईस्क्रिमची समतोल किंमत ३० रुपयांवरुन २८ रुपये अशी कमी झाली आहे आणि नगसंख्या १०० वरुन ९० अशी कमी झाली. कारण कर आकारल्या नंतर विक्रेते कमी विक्री करतात आणि ग्राहक कमी खरेदी करतात. म्हणजेच आईस्क्रिम वर कर आकारल्यामुळे आईस्क्रीमची खरेदी-विक्री कमी होते.

या प्रक्रियेत करभार कोणावर पडतो म्हणजेच प्रत्यक्ष कर कोण देतो याचाही विचार करावा लागतो. जरी ग्राहक कराची पूर्ण रक्कम सरकारला देत असेल तरी ग्राहक आणि विक्रेत्यात करभाराचे विभाजन होते. कारण कर आकारल्यानंतर बाजार किंमत ३० रुपयांवर २८ रुपये अशी कमी झाली. म्हणजेच विक्रेत्यांना प्रति नग २ रुपये किंमत कमी मिळते. परंतु ग्राहकांची परिणामकारक किंमत समावेश करुन ८० रुपयांवरुन ३३ रुपये अशी वाढते म्हणजेच ग्राहक सुद्धा करभार सहन करतात. या विश्लेषणावरुन पुढीलप्रमाणे दोन निष्कर्ष मिळतात. पहिला म्हणजे करामुळे बाजारातील खरेदी विक्रीचे व्यवहार कमी होतात. ज्यावेळी वस्तुवर कर आकारला जातो त्यावेळी नवीन समतोल बिंदुत ग्राहक जास्त किंमत देतात आणि विक्रेत्यांना कमी किंमत मिळते. ग्राहक समतोलित किंमतीपेक्षा विक्रेत्यांवरील कराचा बाजार निष्पत्तीवर परिणाम होतो.

### विक्रेत्यांवरील कराचा बाजार निष्पत्तीवर कसा परिणाम होतो (How taxes on seller Effect Market Outcomes) :

समजा विक्रेत्यावर प्रतिनग कर आकारण्यात आला. महानगरपालिकेने असा कायदा केला कि, विक्रेत्याने आईस्क्रीम विक्रीवर ५ रुपये प्रतिनग कर द्यावा. या कायद्याचे परिम काय असतील? या परिस्थितीत कर आकारणीच्या पहिला आधार आईस्क्रीमचा पुरवठा करणाऱ्या विक्रेत्यावर असेल. कारण कर ग्राहकांवर आकारले नाहीत. दिलेल्या कोणत्याही किंमतीला ग्राहकांची आईस्क्रीमसाठी असणारी मागणी पूर्वीप्रमाणेच असेल. म्हणून मागणी वक्रात बदल होत नाही. या उलट विक्रेत्यावर कर आकारल्यामुळे आईस्क्रीम विक्रीवरील खर्च वाढेल. त्यामुळे प्रत्येक किंमती विक्रेता कमी पुरवठा करेल. परिणामी पुरवठा वक्र वरच्या दिशेने सरकेल. या पुरवठा वक्रात होणारे स्थलांतर कमी असेल हे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.




**आकृती ६.६**


आईस्क्रीमच्या कोणत्याही बाजार किंमतीला विक्रेत्यांची परिणामकारक किंमत ५ रुपये इतका कर दिल्यानंतर असेल. उदा. आईस्क्रीमच्या नगांची बाजारकिंमत रुपये आहे. कर दिल्यानंतर परिणामकारक किंमत १५ रुपये इतकी राहील. कर आकारणीची भरपाई म्हणून विक्रेता किंमतीमध्ये कराच्या रकमे इतकी म्हणजे ५ रुपये वाढ करेल. परिणामी पुरवठा वक्र वरील आकृतीत दाखवल्याप्रमाणे $S_1$ $S_2$ असा कर रकमेचा प्रमाणात वरती सरकेल.

### ग्राहकांवरील कर बाजार निष्पतीवर कसा परिणाम करतो (How taxes on buyer effect market outcomes) :

समजा प्रथम वस्तुच्या ग्राहकांवर कर आकारला आहे. त्यानुसार महानगरपालिकेने कसा कायदा केला की, ग्राहकांनी आईस्क्रीमच्या प्रत्येक खरेदी केल्या जाणाऱ्या नगावर ५ रुपये इतका कर द्यावा या कायद्याने ग्राहकांवर आणि आईस्क्रीमच्या विक्रेत्यावर कसे परिणाम होतील या प्रश्नांचे उत्तर समजुन घेण्यासाठी आपणाला मागणी व पुरवठा विश्लेषणातील पुढील तीन टप्पे विचारात घ्यावे लागतात.

१) आपणाला हे निश्चित करावे लागते की, कर करण्याचा पुरवठा वक्रावर परिणाम होईल की मागणी वक्रावर परिणाम होईल ?
२) आपणाला हे निश्चित करावे लागेल, की पुरवठा वक्र किंवा मागणी वक्राचे कोणत्या दिशेने स्थलांतर होते ?
३) या स्थलांतराचा समतोलावर कसा परिणाम होतो याचे परिक्षण करावे लागते.

कराचा पहिला आघात हा आईस्क्रीमच्या मागणीवर होतो. पुरवठा वक्रावर परिणाम होत नाही कारण आईस्क्रीमच्या कोणत्याही दिलेल्या किंमतीला विक्रेते आईस्क्रीमच्या बाजारपेठेत विक्री करतात. या उलट ज्यावेळी ग्राहकांना आईस्क्रीमची खरेदी करतील त्यावेळेस ग्राहकांना कर द्यावा लागेल. म्हणून कर आकारणीमुळे आईस्क्रीमसाठी मागणी वक्राचे स्थलांतर घडून येईल. मागणीचा वक्राचा स्थलांतर कोणत्या दिशेने घडून येईल हे ठरविणे सोपे आहे कारण आईस्क्रीम वर कर आकारल्यामुळे आईस्क्रीमसाठी मागणी कमी होईल. परिणामी मागणी वक्राचे खालच्या दिशेने डाव्याबाजूला स्थलांतर होईल हे खालील आकृतीने अधिक स्पष्ट करता येईल.




**आकृती ६.७**

ज्यावेळी ग्राहकांवर ५ रुप प्रतिनग कर आकारला जातो त्यावेळी वरील आकृतीत दाखवल्याप्रमाणे मागणी वक्र सुद्धा ५ रु. कराच्या प्रमाणात $D_1$ $D_2$ असा खालच्या दिशेने डाव्या बाजूला सरकतो. परिणामी समतोल नगसंख्येत १०० नगांवरुन ९० नग अशी घट होते. विक्रेत्यांना मिळणारी किंमत ३० वरुन २८ रु. अशी कमी होते. ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत ३० रुपयांवरुन ३३ रुपये अशी वाढते. जरी ग्राहकांवर कर आकारला असला तरी करभाराचे विभाजन ग्राहक आणि विक्रेत्यांचे होते.

ग्राहकांवर ५ रुपये प्रति नग कर आकारल्यामुळे ग्राहकांची परिणामकारक किंमत बाजार किंमतीपेक्षा ५ रुपयांनी जास्त राहील. उदा. बाजार किंमत २० रुपये असेल तर ५ रुपये कर आकारल्यामुळे ग्राहकांची परिणामकारक किंमत २५ रुपये राहिल. कारण ग्राहक किंमतीमध्ये कराचा समावेश करुन खर्चाचा विचार करतात. अशा प्रकारे ५ रुपये प्रति नग कर आकारल्यामुळे मागणीवक्र $D_1$ $D_2$ असा कराच्या प्रमाणात खालच्या दिशेने डाव्या बाजुने सरकतो. ज्यावेळी मूळ समतोलाकडून नवीन समतोल प्रस्थापित होईल. त्यावेळी आईस्क्रीमची समतोलीत किंमत ३० रुपयांवरुन ३३ रुपये अशी वाढेल आणि समतोलित नगसंख्या १०० पासून ९० अशी कमी होईल. पुन्हा एकदा कर आकारणीमुळे आईस्क्रीम बाजारपेठेच्या आकारमानात घट होईल. तसेच ग्राहक आणि विक्रेत्यात करभाराचे विभाजन होईल. बाजार किंमत वाढल्यामुळे ग्राहक पूवीपेक्षा जास्त किंमत देतात. विक्रेत्यांना कर आकारणीमुळे पूर्वीपेक्षा कमी किंमत मिळते.

ग्राहकांवर कर आणि विक्रेत्यांवर कर याचा एकत्रित विचार केल्यानंतर आपणाला पुढीलप्रमाणे आश्चर्यकारक निष्कर्ष मिळतो.

वरील विश्लेषणावरुन हे स्पष्ट होते की, ग्राहक आणि विक्रेत्यांवर समान कर आकारले असताना सुद्धा दोन्ही उदा. कर ग्राहकांची किंमत आणि विक्रेत्यांना मिळणारी किंमत यामध्ये समाविष्ट होतो. ग्राहकांवर किंवा विक्रेत्यांवर कर आकारला तरी सुद्धा किंमतीत सारख्याच प्रमाणात वाढ झालेली आहे. दोन्ही उदाहरणात पुरवठा आणि मागणी वक्राच्या परिस्थितीत होणारे स्थलांतर समान आहे. नवीन समतोल बिंदुक ग्राहक आणि विक्रेत्यात करभार विभागला जातो. फरक इतकाच आहे की, ग्राहक किंवा विक्रेता यापैकी सरकारकडे कराची रक्कम कोण जमा करतो.

कर ग्राहकांवर आकारले आहे की, विक्रेत्यांवर आकारले आहे. यावर करभार अवलंबून नसतो तर पुरवठ्याची किंमत लवचिकता आणि मागणीची किंमत लवचिकता यावर करभार अवलंबून असतो. मागणी किंवा पुरवठा यापैकी जी बाजू कमी लवचिक असेल तिकडे करभार जास्त असतो.

## ६.७ सरावासाठी प्रश्न (QUESTIONS)

१) मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता म्हणजे काय ?

२) टीप लिहा - एकूण उत्पन्न / प्राप्ती

३) मागणीची किंमतसापेक्ष लवचिकता आणि एकूण प्राप्ती यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

४) किंमतसापेक्ष लवचिकतेचा प्राप्तीवरील परिणाम थोडक्यात स्पष्ट करा.

५) एकुण प्राप्तीवर मागणीच्या किंमत लवचिकतेचा होणारा स्पष्ट करा.

६) ग्राहकांवरील कराचा बाजार निष्पत्तीवर कसा परिणाम होतो ?

७) विक्रेत्यांवरील कराचा बाजार निष्पत्तीवर होणारा परिणाम स्पष्ट करा.

## ६.७ संदर्भसूची (REFERENCES)


१) सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्र, डॉ. देशमुख, डॉ. विभुते, शेठ प्रकाशन, मुंबई.

२) N. Gregory Mankilo, Principles of Microeconomics, Cengage Learning, 2015.

३) H.L. Ahuja, Advance Economic Theory, S.Chand.

४) प्रा. राम देशमुख, आधुनिक उच्चतर आर्थिक सिद्धांत, विद्या प्रकाशन, नागपूर


❖❖❖❖

**मॉड्यूल ४**

# घटक -७

# परस्परावलंबित्व आणि व्यापार
# (INTERDEPENDENCE & TRADE)

**घटक रचना :**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ विशेषीकरण आणि व्यापार
७.३ निरपेक्ष लाभाचा अर्थ
७.४ संधी त्याग खर्च आणि तुलनात्मक खर्चलाभ
७.५ तुलनात्मक लाभ व व्यापार
७.६ सारांश
७.७ सराव प्रश्न

## ७.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

अर्थशास्त्रात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराची पाळेमुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या विविध भागांपर्यंत पसरलेली आहेत. सदर प्रकरणात आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयक घटकांचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. विशेषीकरण आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यातील संबंध
२. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.
३. तुलनात्मक लाभ व व्यापार यातील परस्परसंबंध अभ्यासणे.

## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

जगातील देशांचे एकमेकांबरोबरचे संबंध हे एकमेकांच्या संबंधावर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची प्रमुख शाखा आहे. विविध राष्ट्रातील आर्थिक घडामोडींचे विवेचन आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केले आहे. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विविध सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापारलाभ, व्यापारधोरणे, विनिमयदर, व्यवहारतोल इत्यादी घटकांचा सखोल अभ्यास केला जातो.

आंतरराष्ट्रीय व्यापारात विशेषीकरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अनेक देश उपभोग्य वस्तूच्या उत्पादनापेक्षा ठराविक वस्तुंचे विशेषीकरण करुन आंतरराष्ट्रीय व्यापार लाभ प्राप्त करण्यावर भर देतात. विशेषीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार होण्यास मदत होते. नवनविन आंतरराष्ट्रीय सिद्धांत प्रस्थापित होत असल्यामुळे व्यापारातील सहभागी देशांना व्यापारलाभ मिळणे शक्य होवू लागले. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणात आपण विशेषीकरण आणि व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत, व्यापारातील विशेषीकरणाचे महत्त्व इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## ७.२ विशेषीकरण आणि व्यापार (SPECILIZATION AND TRADE)

जगातील विविध देश ठराविक वस्तूंच्या उत्पादनांवर भर देताना दिसून येतात ते देश अशा ठराविक वस्तुंमध्ये विशेषीकरण मिळवतात. आपली विशेष उत्पादने दुसऱ्या देशांना निर्यात (विकतात) करुन ते व्यापारापासुनचे लाभ प्राप्त करतात. जागतिक बाजारपेठेत अशा विशेषीकरण असलेल्या वस्तुंना विशेष मागणी असते. जगातील प्रत्येक राष्ट्राकडे असणारी नैसर्गिक, भौगोलिक साधनसामुग्रीतील विविध आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधार असुन त्या देशाला अशा साधनसामुग्रीतील विविधतेमुळे आणि उपलब्धतेमुळे विशेषीकरण प्राप्त होते. अर्थातच त्यामुळे सर्व राष्ट्रांना व्यापाराचा फायदा मिळतो.

आंतरराष्ट्रीय व्यापार हा विविध राष्ट्रांमधील व्यवहार असतो. एका राष्ट्राची जगातील इतर देशांशी वस्तु व सेवांची जी देवाणघेवाण त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार घडून येतो व समृद्ध होतो आणि विशेषीकरण (वस्तु व सेवांमधील) हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार करण्यास सहाय्यकारी ठरते. म्हणूनच विशेषीकरण आणि व्यापार यामध्ये घनिष्ठ संबंध आहे.

**विशेषीकरण म्हणजे काय?**

काही उपभोग्य वस्तुंचे उत्पादन स्वतः करण्याऐवजी फक्त विशिष्ट वस्तुंचे उत्पादन करुन इतर देशांशी आदान-प्रदान (देवाण-घेवाण) करावे, या पद्धतीला विशेषीकरण असे म्हणतात.

विशेषीकरण असलेल्या वस्तुंचे देश प्रमाणापेक्षा जास्त उत्पादन करतात व त्यांची निर्यात किंवा व्यापार इतर देशांतील अतिउत्पादित वस्तुंशी करतात.

विशेषीकरणामुळे समाजात मानवी कौशल्य व क्षमतांनुसार श्रमविभागणी होते. आंतरराष्ट्रीय व्यापारात उपलब्ध साधनसामुग्रीच्या भिन्नतेला लक्षात घेवुन विशेषीकरण व श्रम विभागणीच्या आधारे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. विशेषीकरणामुळे उत्पादनखर्चही (Cost of Production) कमी होतो. त्यामुळे अल्प / कमी किंमतीला वस्तुचा व्यापार करणे शक्य होते. परिणामी जागतिक बाजारपेठेत मागणी वाढुन व्यापारलाभ मिळण्यास मदत होते. उत्पादन खर्चात निरपेक्ष फरक असेल तर विशेषीकरण व व्यापारलाभ शक्य होतो. वस्तुतील विशेषीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून तुलनात्मक लाभ त्या देशांना मिळु शकतो. निव्वळ फायद्याऐवजी तुलनात्मक लाभ ही गोष्ट विशेषीकरणाला अधिक चालना देणारी असते. जेव्हा विविध देश वस्तुंच्या उत्पादनात विशेषतज्ञ होवू इच्छितात तेव्हा वस्तुचे उत्पादन कमीतकमी

वैकल्पिक किंमतीत कसे करता येईल हा महत्त्वाचा प्रश्न असतो. एखाद्या वस्तुच्या उत्पादनात वैकल्पिक खर्चाचा त्याग करणे आवश्यक ठरते. वैकल्पिक खर्च सिद्धांतानुसार एखाद्या देशात 'क्ष' किंवा 'य' वस्तुचे उत्पादन होत असेल तर 'क्ष' चा वैकल्पिक खर्च उत्पादन न केलेल्या किंवा त्याग केलेल्या 'य' वस्तुंच्या किंमतीइतका असतो. या दोन्ही वस्तुंचा विनिमय दर वैयक्तिक खर्च माध्यमातुन व्यक्त केला जातो.

थोडक्यात ज्या वस्तुंच्या उत्पादनाचा किंवा उत्पादकाचा वैकल्पिक खर्च कमी आहे. त्या वस्तुंच्या उत्पादनापासुन तुलनात्मक लाभ जास्त मिळतो. दोन्ही देशांचा एकाच वस्तुच्या उत्पादनातील वैकल्पिक खर्च समान असेल तर व्यापारापासुन फायदा मिळणार नाही. तसेच दोन्ही देशातील वस्तुचे उत्पादनफलन सारखे असेल तरीही असा व्यापार फायदेशीर ठरत नाही म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक लाभ प्राप्त करण्यासाठी भिन्न वैकल्पिक खर्च व उत्पादन फलन असणे अनिवार्य आहे.

ॲडमस्मिथ, डेव्हिड रिकार्डो हॅबरलर अशा अनेक अर्थतज्ज्ञांनी विशेषीकरण आणि व्यापार यातील संबंध सिद्धांताद्वारे विकसित केलेला आहे. सारांशरुपाने असे म्हणता येईल की, विशेषीकरण हे आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धीस चालना देणारे एक विशेष तंत्र आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) विशेषीकरण म्हणजे काय ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ७.३ निरपेक्ष लाभाचा अर्थ (MEANING OF ABSOLUTE COST ADVANTAGE)

**प्रस्तावना :** ॲडम स्मिथने आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथात निरपेक्ष लाभ हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते जर एखादा परकीय देश एखादी वस्तु, आपल्या उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीत उत्पादित करत असेल तर ती वस्तु आपण त्या देशाकडून विकत घ्यावी (आयात करावी) आणि त्या बदल्यात आपल्याकडील विशेषीकरण (कमी उत्पादन खर्च) असलेली वस्तु त्या देशाला विकावी (निर्यात करावी) त्यामुळे व्यापारापासुनचे फायदे (निरपेक्ष लाभ) दोन्ही व्यापारी देशांना मिळण्यास मदत होते.

**निरपेक्ष लाभाचा अर्थ :**

निरपेक्ष खर्च लाभ तत्व म्हणजे एखाद्या उद्योगसमुहाची स्पर्धकांच्या तुलनेत तेवढीच संसाधने वापरुन जास्त उत्पादन घेण्याची आणि विक्री करण्याची क्षमता होय. ॲडम स्मिथच्या

मतानुसार, एका देशाची निर्यात ही दुसऱ्या देशाची आयात असल्यामुळे जर सर्वच देशांनी मुक्त व्यापार व त्यांच्या निरपेक्ष खर्च लाभाशी सुसंगत विशेषीकरण वस्तुंचा व्यापारात उपयोग केला तर त्या सर्व देशांचा फायदा होईल.

ॲडम स्मिथ यांनी परकीय व्यापाराला पायाभूत म्हणून संपूर्ण मूल्य फायद्याचा सिद्धांत मांडला. परकीय व्यापारात दोन देशातील उत्पादनाची परस्पर देवाणघेवाण तेव्हाच होवू शकते जेव्हा दोन्ही देश इतर देशांच्या तुलनेत एखाद्या उत्पादनाची निर्मिती न्युनतम खर्चात करु शकतील. ॲडम स्मिथने अशा प्रकारच्या दोन परिणाम दिसून येतील. एक म्हणजे आंतरराष्ट्रीय विशेषीकरण (वस्तूच्या उत्पादनात) घडून येईल आणि दुसरे म्हणजे विशेषीकरणाबरोबरच श्रमाचे आंतरराष्ट्रीय विभाजन घडून येईल.

ॲडमस्मिथ यांनी निरपेक्ष खर्च-लाभ / सिद्धांत विकसित करताना पुढील गृहितकांचा विचार केला.

१. उत्पादनाच्या मात्रा फक्त श्रमिक आहेत.
२. उत्पादनाची आवश्यकता श्रमिक मात्रांची संख्या वस्तुविनिमय ठरवते.
३. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार आहे.
४. श्रमिक देशात गतिमान तर पूर्णपणे देशादेशांत अगतिमान असतात.
५. स्थिर प्रमाण फलाचा प्रत्यय.
६. आंतरराष्ट्रीय व्यापारात फक्त दोन देश, दोन वस्तु व एकच उत्पादन घटक (श्रम) (२ × २ × १ प्रतिमान) विचारात घेतले आहेत.

**उदाहरण :**

समजा 'अ' आणि 'ब' हे दोन देश असून 'क्ष' आणि 'य' या दोन वस्तुंचे उत्पादन करतात. श्रमाचे घटक किंवा मात्रा उत्पादनखर्च म्हणून विचारात घेतले आहे.

**उत्पादनाचा श्रम खर्च**

| वस्तु / देश | क्ष | य | उत्पादन खर्च गुणोत्तर |
|---|---|---|---|
| अ | २ | १ | १ य = क्ष |
| ब | १ | २ | १ य = - क्ष |

ॲडमस्मिथ यांच्या मते 'अ' आणि 'ब' देश 'क्ष' आणि 'य' वस्तुंच्या आपापसातील व्यापारातून लाभ मिळवू शकतील. 'अ' देश 'क्ष' वस्तुंच्या उत्पादनात आणि 'ब' देश 'य' वस्तुच्या उत्पादनात विशेषीकरण करतो. 'अ' देशाला 'क्ष' वस्तूची निर्यात करुन 'य' वस्तूची आयात केल्याने व्यापार लाभप्रद ठरतो. तर 'ब' देशात 'य' वस्तूची निर्यात (विशेषीकरण) करुन 'क्ष' वस्तुची आयात केल्याने उत्पादन खर्च कमी येतो व व्यापारापासून फायदे होतात. त्यामुळे दोन्ही देशांना श्रमविभागणी आणि विशेषीकरण करुन वस्तु विक्रीचे फायदे आणि अतिरिक्त उत्पादनखर्च कमी करुन आयात वस्तुचे फायदे मिळू शकतात.

सारांश दोन देश, दोन वस्तु व एकच उत्पादन घटक (श्रम खर्च) साधे प्रतिमान घेवुन त्या आधारे स्मिथ यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासुन होणारे लाभ स्पष्ट केले आणि मुक्त व्यापारधोरणाची (Free Trade) आवश्यकता दाखवून दिली. थोडक्यात एखाद्या देशाला वस्तुच्या उत्पादनात निरपेक्ष खर्च लाभ जास्त असेल तर दोन्ही देश व्यापारापासून लाभ प्राप्त करुन घेवू शकतात.

## ७.४ संधी त्याग खर्च आणि तुलनात्मक खर्च लाभ (OPPORTUNITY COST AND COOPERATIVE COST ADVANTAGE)

**अ) संधीत्याग खर्च (Opportunity Cost) :**

कोणत्याही व्यवसायात फायदा मिळवणे क्रमप्राप्त असते, तरीसुद्धा फायदा मिळवण्यासाठी संसाधनाचा पर्याप्त वापर केला पाहिजे. या दोन्हीच्या अभावामुळे काही संधी गमावल्या जातात व त्याचा परिणाम नफ्यावर होतो. संसाधनाचा अभाव किंवा कमतरता ही एक अर्थशास्त्राची महत्त्वाची संकल्पना आहे. संसाधनाच्या अभावामुळे सममूल्यन आवश्यक ठरते व वैकल्पिक खर्च उद्भवतो.

**वैकल्पिक खर्च किंवा संधी त्याग खर्च म्हणजे काय?**

वैकल्पिक खर्च हा गमावलेल्या संधीचे मुल्य होय. “Opportunity Cost means opportunity lost”. व्यवसायामध्ये वैकल्पिक खर्च म्हणजे उद्योग समुहाला भांडवल, सामग्री आणि स्थावर मालमत्तेचा वेगळ्या प्रकारे उपयोग करुन आलेला नफा होय.


अर्थतज्ञ हॅबरलर यांनी वैकल्पिक खर्चाची संकल्पना विकसित केली. त्यांच्या मते एखाद्या देशात ‘क्ष’ किंवा ‘य’ वस्तुचे उत्पादन होत असले तर ‘क्ष’ चा वैकल्पिक खर्च उत्पादन न केलेल्या किंवा त्याग केलेल्या य वस्तुच्या किंमतीइतका असतो. या दोन्ही वस्तूंचा विनिमय दर वैयक्तिक खर्च माध्यमातून व्यक्त केला जातो.

हॅबरलर यांनी संधी त्याग खर्चाचा सिद्धांत उत्पादन शक्यता वक्राच्या सहाय्याने मांडला. वैकल्पिक किंवा संधीत्याग खर्चानुसार उत्पादन शक्यता वक्राचा उतार विविध खर्च अटीनुसार ठरतो. हॅबरलर यांनी संधी त्याग खर्च सिद्धांत मांडतांना पुढील गृहितांचा विचार केला.

१. दोनच देश व दोन वस्तू
२. श्रम आणि भांडवल या घटकांचे उत्पादनासाठीचे स्वामीत्व
३. पूर्ण रोजगार
४. पूर्ण स्पर्धा
५. स्थिर तंत्रज्ञान व प्रत्येक वस्तुच्या किंमतीत सिमांत खर्च समानता.
६. मुक्त व्यापार इत्यादी

**उदाहरण :**

हॅबरलर यांनी वैकल्पिक खर्च सिद्धांत मांडताना उत्पादन शक्यता वक्राचा (Production Possibility Curve) आधार घेतला. किंबहुना उत्पादन शक्यता वक्राचा उपयोग वैकल्पिक खर्च सिद्धांत मांडताना होतो.




**आकृती ७.१**

उत्पादन शक्यता वक्र हा अर्थव्यवस्थेतील 'क्ष' आणि 'य' वस्तुंच्या उत्पादनाचे विविध संयोग दर्शवतो. उत्पादन शक्यता वक्राचा उतार अंतवक्र (concave to the origin) आणि नकारात्मक (Negative Slopes) स्वरुपाचा असतो. वैकल्पिक खर्च सिद्धांतानुसार 'क्ष' वस्तुच्या उत्पादनात वाढ करावयाची झाल्यास 'य' वस्तूच्या नगांचा त्याग करावा लागतो.

वैकल्पिक खर्च सिद्धांताचे श्रेष्ठत्व सनातन सिद्धांताच्या (वास्तव खर्च) तुलनेत अधिक आहे. या सिद्धांताने व्यापार पूर्व आणि व्यापारानंतरची परिस्थिती यावर लक्ष दिले. (उदा. वाढणारे किंवा घटणारे वैकल्पिक खर्च)

**अन्य उदाहरणे :**

१) **युद्धावरील खर्च :** जर शासनाने काही रक्कम युद्धावर खर्च केली तर ती रक्कम शिक्षण, आरोग्य, रस्तेबांधणी, इत्यादी बाबींवर खर्च करता येणार नाही.

२) संगणक दुरुस्त करणाऱ्या कंपनीला एकाच वेळी दोन कामांचे आदेश मिळाले तर त्यांची अर्धी-अर्धी सामग्री एका विशिष्ठ कामासाठी अडकून पडेल. त्यामुळे त्यांना इतर मोठी व फायद्याची कामे मिळणार नाहीत किंवा त्याचा त्याग करावा लागेल.

थोडक्यात सारांशरुपाने वैकल्पिक खर्च संकल्पना वेगवेगळ्या परिस्थितीत वापरली जाऊ शकते. साधनाच्या कमतरतेमुळे एका ऐवजी दुसऱ्या पर्यायाची निवड करावी लागते तेव्हा व्यक्ती किंवा शासन वैकल्पिक खर्चाचा विचार करुन निर्णय घेते.

**आपली प्रगती तपासा :**

१) निरपेक्ष खर्च लाभ ही संकल्पना स्पष्ट करा.
२) वैकल्पिक खर्च किंवा संधी त्याग खर्च म्हणजे काय?

**ब) तुलनात्मक खर्च लाभ (Comparative Cost Advantage) :**

अॅडम स्मिथने सांगितलेली निरपेक्ष खर्च-लाभ तत्व डेव्हिड रिकार्डो यांनी मान्य केले परंतु उत्पादनखर्चात फक्त निरपेक्ष खर्चातील फरकाचा विचार करुन चालणार नाही तर तौलनिक फरक (Comparative difference) विचारात घेणे आवश्यक आहे हे आपल्या सिद्धांतातून दाखवून दिले. डेव्हिड रिकार्डो यांनी १८१७ मध्ये “Principle of Political Economy and Taxation” या ग्रंथातील On Foreign Trade” या सातव्या प्रकरणात तुलनात्मक खर्च लाभाचा सिद्धांत मांडला.

रिकार्डोच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यापार चालू राहण्याचे कारण हे दोन देशांमध्ये निर्यात होणाऱ्या वस्तुच्या उत्पादन खर्चातील फरक हे असते. हा फरक प्रामुख्याने निरपेक्ष फरक, समान फरक आणि तुलनात्मक फरक अशा तीन प्रकारचा असतो. रिकार्डोच्या मते, देशामधील आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पाया तुलनात्मक खर्च लाभ हा आहे. तुलनात्मक खर्च लाभ हा वस्तुचे उत्पादन फायदेशीर होत असेल तर मिळतो.

रिकार्डोच्या मते, समजा दोन देशांपैकी एक देश सर्वच वस्तुंच्या उत्पादनात दुसऱ्या देशांपेक्षा अधिक कार्यक्षम आहे. अशा परिस्थितीतसुद्धा विशिष्ठ वस्तुंच्या उत्पादनात विशेषीकरुन दोन्ही देशांना उत्पादन खर्चातील (श्रमखर्च) तुलनात्मक फरकाच्या आधारे व्यापार फायदेशीर होवू शकतो.

रिकार्डोचा तुलनात्मक खर्च लाभाचा नियम विविध देशांमध्ये होणाऱ्या व्यापाराला प्रत्यक्षात लागु करुन (Applied) तपासता येवू शकतो. थोडक्यात दोन देशात दोन वस्तुच्या उत्पादनखर्चात तुलनात्मक फरक असेल तर दोन देशात आंतरराष्ट्रीय व्यापार होवून त्या दोघांनाही व्यापार लाभ होवू शकतो.

**संधी त्याग खर्च आणि तुलनात्मक खर्च लाभ यातील संबंध :**

कोणताही देश जेव्हा उत्पादन निर्मिती करुन व्यापारात सहभागी होण्याचा विचार करतो तेव्हा तुलनात्मक लाभ मिळवण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक देश उपलब्ध आणि मर्यादित संसाधनाच्या आधारे कमीत कमी खर्चात उत्पादन घेणे पसंद करतो आणि असे शक्य न झाल्यास उत्पादनाची संधी गमावली जाते. अशा गमावलेल्या संधीला किंवा त्यागालाही किंमत असते. तुलनात्मक फायद्याच्या तत्वामुळे दोन देशातील उत्पादन वाढण्यास मदत होते.

**संधी त्याग खर्च व तुलनात्मक खर्च यातील संबंध :**

जेव्हा देश व्यापारात सहभागी होवून विशेषीकरण करण्याचा निर्णय घेतात तेव्हा ते तुलनात्मक खर्चलाभ तत्वाचा विचार करतात. डेव्हिड रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च-लाभ ही संकल्पना प्रथम वापरली. त्यांच्या मते प्रत्येक देशाने आपल्याकडील उपलब्ध संसाधनाचा वापर करुन उत्पादनात विशेषीकरण करावे कि ज्यामध्ये तुलनात्मक खर्च लाभ जास्त आहे. वैकल्पिक खर्च किंवा संधीत्याग खर्च गमावलेल्या संधीचे मुल्य आहे आणि तुलनात्मक लाभ हा एखादा देश कमीत कमी खर्चात किती उत्पादन घेतो त्याच्याशी संबंधीत आहे. त्यामुळे गमावलेली संधी (Opportunity Cost) ही फायद्याच्या किंवा लाभाच्या विरुद्ध आहे. जो लाभ संधी गमावली नसती तर त्या देशाला झाला असता.

**उदाहरण :**

तुलनात्मक लाभ आणि वैकल्पिक खर्च यातील संबंध पुढील उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल. दोन देशांत उत्पादित होणाऱ्या दोनच उत्पादनाचा विचार करण्यात आला आहे. (दोन देश - दोन वस्तु प्रतिमान) तक्ता ७.४ संधी त्याग खर्च आणि तुलनात्मक खर्च - लाभ यातील संबंध.

| जास्तीत जास्त उत्पादन | देश १ | देश २ |
|---|---|---|
| साखर | ३० दशलक्ष | ३६ दशलक्ष |
| कापड | ७ दशलक्ष | २२ दशलक्ष |

वरील उदाहरणात देश २ हा दोन्ही वस्तुच्या उत्पादनात अग्रेसर आहे परंतु तुलनात्मक लाभ कापड उत्पादनात आहे. त्यामुळे देश २ ने कापड उत्पादनातच विशेषीकरण करुन व्यापारलाभ मिळवला पाहिजे. विशेषीकरण व व्यापार या तत्वानुसार देश १ ला साखर उत्पादनात तुलनात्मक लाभ जास्त आहे. त्यामुळे देश १ ने साखर उत्पादनात विशेषीकरण करुन व्यापारलाभ मिळवला पाहिजे.

**विशेषीकरण व व्यापार :**

तुलनात्मक लाभावर अवलंबून जर दोन्ही देशांनी उत्पादन केले तर जागतिक उत्पादन २२ दशलक्ष + ३० दशलक्ष = ५२ दशलक्ष एकक इतके असेल.

**वैकल्पिक खर्च गुणोत्तर :**

कमी संसाधने वापरुन कमी वैकल्पिक खर्चात एखादे उत्पादन देशाकडून घेतले जात असेल तर त्याला तुलनात्मक लाभ आहे. अर्थव्यवस्थेत जेव्हा सर्व साधनाचा कार्यक्षमपणे वापर होतो तेव्हा दोन उत्पादित वस्तुचे व सेवांचे जास्तीत जास्त शक्य असलेले उत्पादन घेता येते व ते उत्पादनशक्यता वक्राच्या सहाय्याने दर्शवता येते. वरील उदाहरणावरुन देश १ ने साखर उत्पादनात (कमी वैकल्पिक खर्च) विशेषीकरण करावे आणि देश २ ने कापड उत्पादनात (कमी वैकल्पिक खर्च) विशेषीकरण करुन व्यापार लाभ प्राप्त करावा.

**आपली प्रगती तपासा :**

१) तुलनात्मक खर्च लाभ म्हणजे काय ?

२) तुलनात्मक खर्च लाभ व वैकल्पिक खर्च यातील संबंध दर्शवा.

## ७.५ तुलनात्मक लाभ व व्यापार (COMPARATIVE COST ADVANTAGE AND TRADE)

कोणताही तुलनात्मक खर्च लाभाचे तत्व विचारात घेवुन उत्पादन निर्मिती केली तर सर्वच देशांना व्यापारापासून लाभ होईल व त्याचे एकत्रित उत्पादन वाढेल. उपलब्ध साधन सामग्रीचा कार्यक्षमपणे वापर केल्यास स्वयंपुर्णता येईल, परंतु उत्पादनात घट होईल, परंतु जर कोणतेही उत्पादन (विशेषीकरण) इतर देशातील निम्म उत्पादन खर्चापेक्षा कमी खर्चात बनविणे हे तुलनात्मक लाभाशी संबंधित आहे.

तुलनात्मक लाभाच्या अवस्थेत उत्पादक एका वस्तुचे उत्पादन दुसऱ्या वस्तुंपेक्षा किती उत्कृष्ठ पद्धतीने करु शकतो हे तपासले जाते. अशी तुलना उत्पादनखर्चा ऐवजी वैकल्पिक खर्चावर केली जाते. तुलनात्मक लाभ ही उत्पादकाची अशी अवस्था आहे की, ज्यात उत्पादक / देश एका वस्तुचे उत्पादन दुसऱ्या वस्तुंपेक्षा जास्त चांगल्या प्रकारे करु शकतो.

व्यापारापासून लाभ आणि विशेषीकरण हे निरपेक्ष लाभावर अवलंबून नसतो तर तो तुलनात्मक लाभावर अवलंबून असतो. तुलनात्मक लाभ व संधीखर्च हे उत्पादनातील विशेषीकरण आणि व्यापाराचा आधार असतात.

रिकार्डोचे तुलनात्मक लाभाचे तत्व हे स्पष्ट करते की, विशेषीकरणामुळे व्यापार घडून येतो व त्यापासून सर्वच देशांना लाभ होतो. प्रत्येक देश तुलनात्मक लाभ असणारे उत्पादन घेतो व त्यापासून व्यापारलाभ मिळवतो. जोपर्यंत विविध देशातील वैकल्पिक खर्च किंवा संधी त्याग खर्चात फरक आहे तोपर्यंत व्यापारापासून लाभ मिळतो असे म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा :**

१) तुलनात्मक खर्च लाभ आणि व्यापार यातील संबध स्पष्ट करा.

## ७.६ सारांश (CONCLUSION)

आंतरराष्ट्रीय व्यापारात विशेषीकरणाला विशेष महत्त्व आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ मिळवण्यासाठी श्रमविभागणी, (ॲडम स्मिथचे निरपेक्ष खर्च लाभ तत्व) तुलनात्मक खर्च लाभ तत्व, वैकल्पिक खर्च किंवा संधी त्याग खर्च तत्वाचा आधार घ्यावा लागतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणणे आणि व्यापारलाभ प्राप्त करणे हे विशेषीकरणामुळे शक्य होते. तुलनात्मक लाभ आणि व्यापार यामध्ये घनिष्ठ असा संबंध आहे. जगातील बरेच देश उत्पादनात विशेषीकरण करुन आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ मिळवतात.

## ७.७ सराव प्रश्न (QUESTIONS)

१. विशेषीकरण आणि व्यापार यातील संबंध स्पष्ट करा.
२. वैकल्पिक खर्च / संधी खर्च आणि तुलनात्मक खर्च लाभाचे वर्णन करा.
३. तुलनात्मक खर्च लाभ आणि व्यापार उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करा.
४. तुलनात्मक खर्च लाभ तत्वाच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ देशांना कसे मिळतात हे स्पष्ट करा.
५. टिप लिहा -
   १) विशेषीकरण आणि व्यापार
   २) तुलनात्मक खर्च लाभ आणि व्यापार

❖❖❖❖

# घटक -८

## व्यापारापासून लाभ व व्यापार धोरण
## (GAINS FROM TRADE AND TRADE POLICY)

**घटक रचना :**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ व्यापारापासूनचे लाभ

८.३ आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च लाभाचे उपयोजन

८.४ व्यापार धोरण

अ) मुक्त व्यापार धोरण

ब) संरक्षण व्यापार धोरण

८.५ सारांश

८.६ सराव प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

आंतरराष्ट्रीय व्यापार हा स्वेच्छेने होतो, त्यामुळे व्यापारामुळे फायदे किंवा लाभ मिळण्याची शक्यता असते. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून प्राप्त होणाऱ्या लाभाविषयी चर्चा आपण या पाठात करणार आहोत. त्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये विचारात घेतली आहेत.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ अभ्यासणे.
२. आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च लाभाचे कसे उपयोजन होते.
३. व्यापारधोरणांचा अभ्यास करणे.
४. मुक्त व्यापार धोरण व संरक्षण व्यापरनिती यातील फरक अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

आज जगातील प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभाग घेतात कारण त्यांना व्यापारापासून लाभ अपेक्षित असतो. व्यापारापासून लाभाचा सिद्धांत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सनातन सिद्धांताचा गाभा होता. व्यापारापासून लाभात देशातंर्गत उत्पादनाबरोबरच विशेषीकरण असलेल्या दुसऱ्या देशातील उत्पादनाचा समावेश होतो. प्रस्तुत प्रकरणात आपण व्यापारापासुनचे

लाभ, आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक लाभ तत्वाचे उपयोजन (Application), व्यापार धोरण इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## ८.२ व्यापारापासूनचे लाभ (GAINS FROM TRADE)

अॅडम स्मिथच्या मते, व्यापारापासुनचा लाभ हा श्रमविभागणी आणि विशेषीकरण यावर अवलंबून आहे. हा व्यापारलाभ निरपेक्ष खर्चातील फरकाने अस्तित्वात येतो. रिकार्डोच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ हा विशेषीकरण आणि तुलनात्मक फरकाने अस्तित्वात येतो. व्यापारापासूनच्या लाभ विश्लेषणात अन्योन्य मागणी आणि व्यापारशर्ती यावर भर जे.एस्. मिल यांनी दिला. थोडक्यात सनातन अर्थतज्ञांपासून आधुनिक अर्थतज्ञांपर्यंत अनेक व्यापार लाभाचे विश्लेषण केलेले दिसून येते.

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभाची व्यापक स्वरुपात विभागणी स्थितीशिल लाभ आणि गतिशील लाभ अशी केली जाते. देशातील उपलब्ध साधनांचा उपयोग करुन स्थितीशील लाभ वाढतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न वाढून सामाजिक कल्याणात वाढ होते. आंतरराष्ट्रीय व्यपराच्या क्षेत्रात तुलनात्मक लाभाच्या तत्त्वाच्या कृतीशील कारणाचा परिणाम स्थितीशील लाभात आहे. स्थितिशील लाभ हे साधनांचा जास्तीत जास्त वापर, सामाजिक कल्याणात वाढ, राष्ट्रीय उत्पन्न यामुळे मिळतात.

व्यापारात गतिमान लाभ ही देशांना मिळवता येतात. गतिशील लाभ हे साधनांचा कार्यक्षम उपयोग बचत व गुंतवणूकीतील वाढ, पायाभूत सुविधांचा विकास, बाजाराचा विस्तार, तंत्रज्ञान, बौद्धिक संपदेत वाढ इत्यादी घटकांमुळे प्राप्त होतात.

जेव्हा देश दुसऱ्या देशाबरोबर व्यापारात प्रवेश करतो तेव्हा तो व्यापारापासून फायदा मिळवतो. उत्पादन खर्च गुणोत्तरातील फरकामुळे व्यापार लाभ होतो. उदा. देश १ व देश २ जेव्हा व्यापारात प्रवेश करतात तेव्हा खर्च गुणोत्तर लक्षात घेवुन देश १ साखर उत्पादनात तुलनात्मक लाभ अधिक मिळवतो तर देश २ कापड उत्पादनात तुलनात्मक लाभ अधिक मिळवतो हे आपण अगोदरच्या प्रकरणात अभ्यासले आहे.

जेव्हा देश व्यापारामध्ये सहभागी होतो तेव्हा व्यापारामुळे वस्तू व सेवांच्या एकुण उत्पादनात वाढ घडून येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला हा व्यापार लाभदायक असतो. विशेषीकरणामुळे असा तुलनात्मक लाभ शक्य होतो.

**व्यष्टी अध्ययन (Case Study) :**

**खर्च लाभ ओळखा :**

**अ)** मुक्ता बर्वे एका वर्षात ५ चित्रपट किंवा १० मालिका तयार करते तर क्रांती रेडकर एका वर्षात २ चित्रपट किंवा ८ मालिका तयार करते. यावरुन त्यांच्यासाठी उत्पादन शक्यता वक्र तयार करा.

**ब)** या उत्पादनात निरपेक्ष लाभ काय आहे ?

**क)** तुलनात्मक लाभ कोणाला मिळतो? त्यांनी कोणत्या एका उत्पादनामध्ये विशेषीकरण करावे?

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यापारापासुनच्या स्थीतिशील व गतिशील परिणामांचे वर्णन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ८.३ आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च लाभाचे उपयोजन (APPLICATION OF COMPARETIVE COST ADVANTAGE TO INTERNATIONAL TRADE)

तुलनात्मक लाभाचे तत्त्व आयातीसाठी देशांचे परस्परांवर असणाऱ्या अवलंबित्वाचे आणि व्यापरातून मिळणाऱ्या लाभाचे वर्णन करते. आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व त्यांचे कौशल्य व कार्यक्षमता यावर तुलनात्मक लाभ निर्धारित होतो. विशेषीकरण असलेल्या वस्तुचे गरजेपेक्षा जास्त उत्पादन घेऊन त्याची इतर देशांना निर्यात करुन व्यापारलाभ मिळवता येतात.

दोन किंवा अनेक देशात विशेषीकरणामुळे किंवा श्रमविभागणीमुळे वस्तुची आयात व निर्यात होते. साधारणतः देश दुर्मिळ वस्तुंची (उत्पादनखर्च जास्त) आयात करतो व आपल्याकडील उपलब्ध वस्तुंची (उत्पादनखर्च कमी) विशेषीकरण करुन निर्यात करतो. त्यामुळे व्यापारात सहभागी असलेल्या देशाला व्यापारापासून लाभ मिळतो.

व्यापारापासुन देशाला लाभ कसा होतो हे खालील उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

समजा भारत व जपान हे दोन देश आहेत. अन्नधान्य व मोटारगाडी या दोन वस्तुंची निर्मिती होत आहे. भारतामध्ये अन्नधान्य उत्पादनासाठी उपलब्ध संसाधने मुबलक प्रमाणात आहेत (भूमी, श्रम इत्यादी) त्यामुळे भारतीय कामगार दरमहा १ मोटारगाडीचे उत्पादन तर २ टन अन्नधान्याचे उत्पादन करतात. दुसऱ्या बाजूला जपानमध्ये मोटारगाडीच्या उत्पादनासाठी पोषक असे औद्योगिक वातावरण आहे. असे असले तरी, जपानचे कामगार दरमहा १ मोटारगाडीचे आणि १ टन अन्नधान्याचे उत्पादन घेतात. यावरुन असे लक्षात येते की, दोन्ही देश मोटारगाडीच्या उत्पादनात समान कार्यक्षम आहेत. त्यामुळे मोटारगाडीच्या उत्पादनात दोन्ही देशांना व्यापारात लाभ नाही.

तुलनात्मक लाभतत्वानुसार, देशाने ज्या उत्पादनात संधी खर्च जास्त असतो त्या उत्पादनाची किंवा वस्तुची आयात करावी. तसेच अशा वस्तु व सेवामध्ये विशेषीकरण करावे की,

ज्यांचा संधी त्याग खर्च कमी असतो. भारतात मोटारगाडीचा संधी त्याग खर्च २ टन अन्नधान्य उत्पादन इतका आहे तर जपानमध्ये १ टन अन्नधान्य उत्पादन आहे. म्हणून भारताला अन्नधान्य उत्पादनात तुलनात्मक लाभ अधिक आहे म्हणून भारत अन्नधान्याची निर्मिती करेल व जपानला निर्यात करेल. जपानला मोटारगाडी उत्पादनात तुलनात्मक लाभ अधिक आहे म्हणून जपान मोटारगाडीचे उत्पादन घेईल व काही उत्पादनाची भारताला निर्यात करेल. थोडक्यात विशेषीकरण आणि व्यापारातून दोन्ही देशांना जास्त अन्नधान्य व जास्त मोटारगाड्या मिळतात. वस्तुतः विविध देशातील व्यापारातील समस्या जास्त गुंतागुंतीच्या आणि क्लिष्ट असतात.

सारांश, विशेषीकरण आणि व्यापार यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांना गरजेपेक्षा जास्त वस्तुचे उत्पादन करता येते व ते इतर देशांना निर्यात करुन आर्थिक सुबत्तता मिळवणे शक्य होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) भारताला कोणत्या उत्पादनात तुलनात्मक लाभ मिळतो ?

२) जपानचे कोणत्या वस्तुच्या उत्पादनात विशेषीकरण आहे ?

## ८.४ व्यापार धोरण (TRADE POLICY)

व्यापारापासून लाभाचा सिद्धांत आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सनातन सिद्धांताचा गाभा होता. अ‍ॅडम स्मिथच्या मते, व्यापारापासून लाभ हा श्रम विभागणी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील दोहोंच्या विशेषीकरणाच्या फायद्याचा परिणाम आहे. तो खर्चातील निरपेक्ष फरकाने अस्तित्वात येतो. डेव्हिड रिकार्डोच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार एवढा सामर्थ्यवान असतो की, ज्यायोगे वस्तूंचे उत्पादन वाढते म्हणून रोजगार राशीत वाढ होण्यास अंशदान असते. व्यापारापासूनच्या लाभात देशांतर्गत उत्पादनाऐवजी व्यापारातून आयात वस्तू प्राप्त करण्यापासून खर्चात बचतीचा समावेश होतो. जे.एस्. मिलने आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ विश्लेषणासाठी जो अन्योन्य मागणीचा सिद्धांत मांडला तो व्यापार शर्तीवर अवलंबून असतो. आधुनिक विश्लेषक आंतरराष्ट्रीय व्यापारापासूनच्या लाभाचे विनिमयापासूनचा लाभ आणि सर्वसाधारण समतोल विश्लेषणावर आधारित विशेषीकरणापासून लाभाचा संदर्भ देतात.

**स्थिती व गतिशील लाभ (Static and Dynamic Gains from Trade) :**

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभाची व्यापक स्वरुपात विभागणी स्थितीशील लाभ आणि गतिशील लाभ अशी केली जाते; त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

**अ) स्थितिशील लाभ :** साधनसामग्री, तंत्रज्ञान उपभोक्त्याची आवडनिवड या घटकांना स्थिर मानून व्यापारातून लाभ मिळतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा लाभ देशांतर्गत उत्पादनाला जागतिक बाजारपेठा श्रमविभागणी विशेषीकरण, मक्तेदारीवर नियंत्रण, सांस्कृतिक सामाजिक विकास, आंतरराष्ट्रीय सहकार्य, परकीय मदत इत्यादी घटक व्यापारातील स्थितीशील लाभ म्हणून विचारात घेतले जातात.

देशातील उपलब्ध साधनाचा उपयोग करुन स्थितीशील लाभ वाढतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न आणि सामाजिक कल्याणात वाढ होते. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रात तुलनात्मक खर्च लाभाच्या तत्वाच्या कृतिशील कारणाचा परिणाम स्थितीशील लाभात आहे. विशिष्ट व्यवहारातून किंवा व्यवहाराच्या मालकीतून निर्माण होणारे लाभ म्हणजे स्थितीशील लाभ होत. स्थितीशील लाभ खालीलप्रमाणे :

**१) साधनांचा जास्तीतजास्त वापर :**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी असे म्हटले आहे की, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रमविभागणी आणि विशेषीकरणापासून फायदा होतो. प्रत्येक देश कोणत्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषीकरण करतो त्यावर तुलनात्मक फायदे ठरतात आणि इतर देशात आयात प्रवेशामुळे त्या देशात तुलनात्मक दृष्ट्या व्यापार फायदेशीर नसतो, म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारात साधनांचा उपयोग जास्तीतजास्त कार्यक्षमपणे केला जातो.

**२) सामाजिक कल्याणात वाढ :**

देशात कमी किंमतीत चांगल्या किंवा आकर्षक, टिकावू व चांगल्या दर्जाच्या वस्तू आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळत असतील तर वस्तूच्या उपभोगात वाढ होते व सामाजिक कल्याण वाढण्यास मदत होते.

**३) राष्ट्रीय उत्पन्न व वृद्धिदरात वाढ :**

देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात श्रमविभागणी आणि विशेषीकरणामुळे वाढ होते. परिणामी अर्थव्यवस्थेच्या उत्पादन आणि रोजगारात वाढ होते. देशाच्या उत्पन्नात आणि वृद्धिदरात सुद्धा वाढ होते.

**४) वास्तविक अधिक्य :**

ॲडम स्मिथ यांनी असे म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे जागतिक व्यापार खुला होतो; किंवा मुक्त होतो त्यामुळे जागतिक बाजारात देशातील जादा उत्पादनाची विक्री होते.

**ब) गतिशील लाभ :**

ज्याचा फायदा आंतरराष्ट्रीय व्यापारात गतिशील लाभ होतो त्या सहभागी देशांची आर्थिक वृद्धी जलद होते. मुख्य गतिशील लाभ पुढीलप्रमाणे :

**१) बचत आणि गुंतवणुकीत वाढ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक फायद्यासाठी वस्तूंच्या उत्पादनाला उत्तेजन दिले जाते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. परिणामी नवीन गुंतवणूकीला संधी उपलब्ध होते व बचत आणि गुंतवणूकीत वाढ होते. त्यामुळे देशाची आर्थिक वाढ होते.

**२) पायाभूत सुविधांचा विकास :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादनाच्या उपक्रमाला उत्तेजन मिळते. परिणामी पायाभूत सुविधांचा आणि सेवांचा विकास होतो. ज्या ठिकाणी उत्पादन उपक्रम व कार्यक्षमता वाहून नेण्याची क्षमता आहे तेथे वाहतूक आणि दळणवळणाचा विकास बँकिंग, विमा, साठवणूक गृहे इत्यादिंचा विकास होतो.

**३) बाजारांचा विस्तार :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील वस्तूंच्या उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होते. बाजाराच्या आकाराचा विस्तार होतो. तसेच अनेक देश मोठ्या प्रमाणावरील, उत्पादनाचा फायदा घेतात आणि अंतर्गत आणि बाह्य अर्थव्यवस्थेच्या पातळीवर लाभ मिळवतात.

**४) साधनांचा कार्यक्षम उपयोग :**

साधनांचा कार्यक्षम उपयोग उच्च उत्पादनाचा तुलनातमक खर्च लाभाच्या तत्वासाठी होतो. परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा, जागतिक साधनांचा कार्यक्षम उपयोग महत्त्वरित्या होतो.

**५) भांडवली साधने (हत्यारे) आणि तंत्रज्ञानाचे महत्त्व :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात विकसनशील देशांना भांडवली हत्यारांची किंवा साधनांची आयात करता येते. भांडवली आणि तंत्रज्ञानातील माहितीच्या साहाय्याने विकसित देशांनी त्यांच्या अर्थव्यवस्थेचा विकास जलद घडवून आणला आहे.

**६) तंत्रज्ञानात वृद्धी :**

नवीन संशोधन, तंत्रज्ञान, नवीन उत्पादन पद्धती यामुळे श्रम आणि भांडवलाची बचत होते. श्रमाच्या बचतीमुळे अधिक श्रमिक इतर क्षेत्रांमध्ये काम करतात; तसेच भांडवलाच्या बचतीमुळे नवीन क्षेत्रांत भांडवल गुंतविता येते.

**७) बौद्धिक संपदेत वाढ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात वस्तू आणि सेवांचीही मोठ्या प्रमाणात देव-घेव होते. सेवांच्या बरोबर बौद्धिक संपदेचीही देवाण-घेवाण होते. एका देशातील ज्ञानाचा दुसऱ्या देशाच्या प्रगतीसाठी उपयोग होतो.

**८) उपभोक्त्यांची आवडनिवड :**

आवडनिवड ही सतत बदलत असते. आंतरराष्ट्रीय व्यापारात या घटकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या घटकांमुळे गतीशील लाभ मिळतात. उपभोक्त्यांची आवडनिवडही स्थिर नसते. जेव्हा निर्यात वाढते तेव्हा वस्तू व सेवांच्या मागणीमध्ये बदल होतो. त्यामुळे नवीन बदलासाठी उपभोक्त्यांची आवडनिवड महत्त्वाची ठरते.

तसेच गतीक्षम लाभामध्ये देशातील साधनसंपत्तीचा दर वाढतो. उत्पादनक्षमता वाढल्याने देशाची निर्यात वाढते व देशातील श्रम व भांडवलाचे प्रमाण वाढते; त्यामुळे व्यापारानंतर साधनसामग्रीत मोठा बदल होतो.

गतीशील लाभ हे प्रमुख लाभ मानले जातात.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यापारापासूनचे स्थितीशिल लाभ कोणते ?
२) व्यापारापासूनचे गतिशील लाभ सांगा.

**व्यापार धोरण (Trade Policy) :**

**१) मुक्त व्यापार धोरण (Free Trade Policy) :**

ज्या आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणात शुल्क (कर) आकारले जात नाही अथवा आयात-निर्यात कोटा निश्चित केला जात नाही. परकीय चलनाच्या देवाण-घेवाणीवर कोणतेही निर्बंध नसतात आणि देशातून निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांना सरकारकडून कोणतेही अर्थसहाय्य दिले जात नाही असे आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरण म्हणजे मुक्त किंवा खुला व्यापार होय.

**व्याख्या :**

i. **ॲडम स्मिथ :** "ज्या व्यापार धोरणामध्ये देशी वस्तू व विदेशी वस्तू असा कोणताही भेदभाव केला जात नाही, विदेशी वस्तूंच्या आयातीवर कोणतेही निर्बंध लावण्यात येत नाहीत, तसेच देशी वस्तूंच्या निर्यातीस कोणतीही विशेष सवलत दिली जात नाही, अशी व्यापार पद्धती म्हणजे खुला किंवा मुक्त व्यापार निती होय."

ii. **जगदीश भगवती :** ज्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणात प्रशुल्क म्हणजेच आयात व निर्यात जकाती नसतील किंवा आयात किंवा निर्यातीची संख्या (Quota) ठरविली जात नाही, तसेच विदेशी चलनाच्या देवाण-घेवाणी वर कसलेही निर्बंध नसतील आणि देशातून निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांना सरकारकडून अर्थसहाय्य मिळत नसेल अशा व्यापार विषयक धोरणास मुक्त व्यापाराचे धोरण असे म्हणतात.

iii. **केरनेस :** सनातन अर्थशास्त्रज्ञांनी खुल्या व्यापाराचा पुरस्कार केला. ॲडम स्मिथ यांना 'खुल्या व्यापार धोरणाचा जनक / प्रणेता' म्हणतात. त्यांनी शासनाने निर्हस्तक्षेपाचे धोरण स्विकारावे व खुल्या व्यापाराचा अवलंब करावा असे विचार मांडले होते. 'खुला व्यापार' या संकल्पनेत निर्बंधरहित व्यापार हा दृष्टीकोन अपेक्षित आहे. म्हणजे आयात निर्यात कर आकारले जात नव्हे असे नाही. आयात वस्तू व निर्यात वस्तूवर जकाती आकारल्या जाणे अपेक्षित असते; परंतु त्याचा उद्देश शासनाला महसुली उत्पन्न मिळवून देणे हा असतो. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी शासनाला महसूली उत्पन्न मिळावे म्हणून पाच टक्क्यांपर्यंत (५%) आयात व निर्यात कर / जकात या खुल्या व्यापराशी सुसंगत आहेत.

## २) खुल्या (मुक्त) व्यापार धोरणाचा समर्थनार्थ व विरोधी युक्तिवाद (Case for and against free trade) :

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी व्यापारवादी विचारसरणीतील उणीवा विचारात घेवून मुक्त व्यापाराचे समर्तन केले. तथापि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात काही युरोपीय राष्ट्रांनी संरक्षण नितीचा स्विकार केला आणि त्याच्या वाढत्या प्रभावामुळे खुले व्यापारी धोरण आणि संरक्षणवाद या दोन्ही व्यापार धोरणातील संघर्ष वाढला. मुक्त व्यापार आणि संरक्षण धोरण यांच्यातील चांगला आणि वाईट (अनिष्ठ) बाजू दाखवण्यासाठी त्यांच्या समर्थकांमध्ये व विरोधकांमध्ये स्पर्धा (चढाओढ) सुरु झाली. त्यातूनच या दोन्ही विरोधविषयक धोरणाचे युक्तीवाद विकसित झाले आहेत.

### १) उत्पादन घटकांचा पर्याप्त वापर :

विशेषीकरणामुळे उत्पादन घटकांचा पर्याप्त उपयोग होतो. त्यामुळे वैश्विक पातळीवरील एकूण उत्पादन घटकांचा पर्याप्त वापर केला जातो. साधने मर्यादित असल्यामुळे त्यांचा पर्याप्त वापर केला जातो. मुक्त व्यापार धोरणामुळे ही संधी निर्माण होते.

### २) नैसर्गिक तत्वाचा वापर :

ॲडम स्मिथ यांच्या मताप्रमाणे जोपर्यंत परकीय देशातील वस्तूंचे उत्पादन खर्चाच्या तुलनेत अधिक सोयीचे व स्वस्त होते तोपर्यंत अशा वस्तूंची आयात दोन्ही देशांना फायदेशीर असते. व्यापारावर जकात आकारणे अनैसर्गिक मानले जाते. मुक्त व्यापारामुळे स्पर्धा निर्माण होते. कमीत कमी खर्चात उत्पादन करण्याचा प्रयत्न केला जातो.

### ३) उपभोक्त्यांना सोयीचे :

जागतिक पातळीवर निर्यात होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांचा उपभोग घेता येतो. उपभोक्त्यांना कोणत्याही वस्तू व सेवांपासून वंचित राहता येत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होते. देशात महाग असणाऱ्या वस्तू परदेशातून आयात करता येतात. परिणामी उपभोक्त्यांना अधिक फायदा होतो.

### ४) बाजारपेठांचा विस्तार :

मुक्त व्यापारधोरण असते तेव्हा जागतिक बाजारपेठ वस्तू व सेवांना पूर्णपणे खुली असते. जगाच्या सर्व बाजारपेठा एकमेकांना जोडल्या जातात, जग ही एक बाजारपेठ निर्माण होते. वस्तू व सेवांचा पुरवठा दूरवर करता येतो. बाजारपेठांचा विस्तार झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादनावर करता येते. त्यामुळे मोठ्या उत्पादनाच्या बचती निर्माण होतात.

### ५) औद्योगिकरणाला साहाय्य :

मुक्त व्यापारामुळे कोणताही देश दुसऱ्या कोणत्याही देशाकडून कच्चामाल आयात करु शकतो. त्यामुळे उद्योग उन्नतीसाठी मर्यादा येत नाहीत. उदा. जपान इतर देशातून लोखंड आयात करुन दर्जेदार उत्पादने निर्माण करतो. औद्योगिक विकासाला मुक्त व्यापार धोरणामुळे चालना मिळते. परिणामी औद्योगिक विकास झपाट्याने घडून येतो.

**६) आयात स्वस्त होते :**

मुक्त व्यापाराचे धोरण स्पर्धा निर्माण करणारे आणि उत्पादनात विशेषीकरण निर्माण करणारे असल्यामुळे सर्वच देशांना आपल्या आयात वस्तू किफायतशीर किंमतीला प्राप्त होतात. याचाच अर्थ आयाती स्वस्त झाल्यामुळे देशाला लाभ प्राप्त होतात.

**७) मक्तेदारीला आळा :**

मुक्त बाजारामुळे वस्तूंचा दर्जा सुधारतो. त्यामुळे ग्राहकांना त्याचा अधिक लाभ मिळतो. परिणामी अर्थव्यवस्थेतील मक्तेदारी नष्ट होते व बाजारपेठेचा दर्जा वाढून बाजारपेठ विस्तारते.

**८) व्यापार चक्राचे नियंत्रण :**

व्यापारचक्रे म्हणजेच तेजी मंदीचे चक्रे नियंत्रण करण्यासाठी मुक्त व्यापार धोरण उपयुक्त ठरते.

**९) भ्रष्टाचारावर नियंत्रण :**

संरक्षित व्यापारी धोरणामुळे आयातीवर निर्बंध घातले जातात. तसेच निर्यातीला संरक्षण दिले जातात. त्यामुळे राजकिय हस्तक्षेप निर्माण होतो. त्यामुळे विविध पक्षाच्या गटबाजीमुळे निर्यातदारांना अनेक प्रकारचे अमिष दाखवले जाते व निर्यातदार सुद्धा राजकीय नेत्यांच्या आश्रयाने पुढे आपलाच माल निर्यात व्हावा म्हणून राजकीय पुढाऱ्यांना लाच देतात. उदा. अल्मार्ट या कंपनीने अमेरिकेला कितीतरी कोटी डॉलर देण्याचे अमिष दाखवून भारतातील बाजारपेठ उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केला होता. परंतु खुल्या व्यापारामुळे अशा भ्रष्टाचारी प्रवृत्तीवर आळा बसतो.

**१०) आंतरराष्ट्रीय सहकार्य :**

मुक्त व्यापार धोरणामुळे आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित होण्यासाठी मदत होते. राजकीय भिन्नता असूनही आर्थिक सहकार्यात वाढ होते.

**११) जलद आर्थिक विकास :**

वरील अनेक मुद्यांचा विचार केला तर मुक्त व्यापार धोरण निश्चितच देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक आहे. पण मुक्त व्यापार धोरणातही काही दोष आढळून आल्यामुळेच सुरक्षित व्यापार धोरण उदयास आल्याचे स्पष्ट होते.

**३) मुक्त / खुल्या व्यापार धोरणाच्या विरोधात युक्तिवाद :**

i. **नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास :** मुक्त व्यापार धोरणामुळे ज्या घटकांना मागणी असते तेथेच ज्याच्या व्यापारातून अधिक लाभ मिळतो अशा वस्तूंची मोठी निर्यात केली जाते. उदा. दक्षिण आफ्रिकेतून मोठ्या प्रमाणावर सोने काढून घेतल्यामुळे त्या देशात खाणीत सोने न राहिल्याने खाणी ओस पडलेल्या आढळतात.

ii. **असमतोल आर्थिक विकास :** ज्या वस्तूच्या उत्पादनात लाभ मिळतो, त्याच वस्तू व सेवा निर्माण केल्या जातात. त्यामुळे काही ठराविक वस्तू, सेवा निर्माण करण्याकडे

देशातील उद्योगांचा कल दिसून येतो. एकाच अर्थव्यवस्थेत अत्यंत मागासलेला भाग आढळतो. त्यामुळे एकूण अर्थव्यवस्थेचा विचार केला तर असमतोल विकासाचे चित्र पहाण्यास मिळते.

iii. **चैनीच्या व अनावश्यक वस्तूंचे उत्पादन :** मुक्त व्यापार धोरणामुळे चैनीच्या किंवा उपभोग्य वस्तूंचे उत्पादन येण्यावर अधिक भर दिला जातो. यामागे नफा मिळवणे हे एकमेव उद्दिष्ट असते. ज्या उपभोग्य वस्तूंना आर्थिकदृष्ट्या सधन वर्गाकडून अधिक मागणी असते. त्या वस्तूंचे उत्पादन घेतले जाते. यामुळे जीवनाश्यक वस्तूंचे उत्पादन घेण्याकडे काहीसे दुर्लक्ष केले जाते.

iv. **अवपुंजन :** मुक्त या व्यापार धोरणावर नियंत्रण नसल्याने निकोप स्पर्धा होणे आवश्यक असते. तरीही स्पर्धेची जागा मक्तेदारी होते. बाजारपेठ काबीज करण्यासाठी वस्तूच्या किंमती जाणीवपूर्वक घटविल्या जातात व वस्तूमधून येणारा तोटा जादा किंमत आकारुन भरुन काढला जातो. परिणामी देशातील लोकांना वस्तू महाग किंमतीला घ्याव्या लागतात.

खुला व्यापार ही नैसर्गिक तत्वावर आधारलेली व्यापार प्रणाली आहे असे सनातनवादी विचारवंत मानत असले तरी या व्यापारी धोरणामुळे अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात धोके किंवा अडचणी निर्माण होतात. त्याचमुळे सन १९३० च्या जागतिक महामंदीनंतर खुली व्यापार धोरणे नकारार्थी बनली.

### ४) संरक्षणाचे धोरण (Protection Policy) :

व्यापार विषयक धोरणे दोन प्रकारची असतात.

१) खुले व्यापार धोरण
२) संरक्षणाचे धोरण

संरक्षण व्यापाराचे धोरण म्हणजे व्यापारावर अनेक बंधने असतात. उदा. जकात कर, आयात कर, निर्यात कर इत्यादि अनेक बंधने लादली जातात. संरक्षित व्यापार धोरणे म्हणजे देशी उद्योगांचे परदेशी उद्योगापासून संरक्षण करण्यासाठी स्विकारलेले धोरण होय.

**व्याख्या :** "देशातील उद्योगाना विदेशी स्पर्धेपासून वाचविण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारावर विविध बंधने घातली जातात, त्यालाच संरक्षित व्यापार धोरण असे म्हणतात."

### १) संरक्षित व्यापार धोरणाच्या समर्थनार्थ युक्तिवाद (Arguments for Protectinism) :

संरक्षित व्यापार धोरणे हे मुख्यत्वे दोन प्रकारे लाभदायक ठरते. हे धोरण स्विकारल्यामुळे आर्थिक लाभ होतात. त्याप्रमाणे काही आर्थिकेतर लाभाचा यामध्ये समावेश होतो, जे पुढीलप्रमाणे :

#### अ) आर्थिक दृष्टीकोन :

#### १) बालउद्योग युक्तिवाद :

प्रत्येक देशातील उद्योगांना सुरुवातीला या अवस्थेतून जावे लागते. उद्योग नव्याने सुरु होताना या दोघांचा सरासरी बदलता व सरासरी स्थिर खर्च जास्त येतो. त्यामुळे उद्योगातून अंतर्गत बचती मिळू शकत नाही. तसेच असे उद्योग बाह्य बचतीपासून वंचित असतात.

**२) उत्पादन खर्च समान :**

संरक्षण व्यापार धोरणामुळे परकीय देशातून आयात होणाऱ्या वस्तूंच्या किंमती कमी असल्यास त्या वस्तूंवर जकाती आकारुन त्यांच्या किंमती आपल्या देशातील वस्तू व सेवा बरोबरच समान करता येतात. त्यामुळे आपल्या देशातील वस्तू, सेवांच्या मागणीवर योग्य तो परिणाम साध्य करता येतो.

**३) देशी संपत्तीची जपणूक :**

देशातील संपत्ती देशात राहण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरते. जर देशातील मौल्यवान संपत्ती व्यापाराद्वारे बाह्य देशात गेली तर देशाची आर्थिक हानी होईल. कारण देशातील वस्तू व सेवांचा जेव्हा वापर होतो तेव्हा देशातल्या संपत्तीत वाढ होते व देशातील संपत्ती बाह्य देशात जाऊ शकत नाही.

**४) व्यापारशर्ती अनुकूलतेसाठी :**

परकीय व्यापाराची अनुकूलता व्यापार शर्तीनुसार निश्चित होते. व्यापारशर्ती जेव्हा प्रतिकूल होतात तेव्हा निर्यात असमतोलकडे झुकते. व्यापार तोलातील प्रतिकूलता कमी करण्यासाठी संरक्षित व्यापार धोरणाचा उपयोग करता येतो. आयात निर्यात धोरणामुळे (बदलाद्वारे) व्यापारशर्ती अनुकूल करुन घेता येतात. विशेषतः अल्पविकसित देशांना या धोरणांचा सातत्याने उपयोग करावा लागतो. कारण त्या देशांची आयात निर्यातीच्या तुलनेत जास्त राहते. या धोरणावर काही मर्यादा येतात.

**५) अवपुंजन :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे आयात वस्तूंवर मोठ्या प्रमाणावर जकात आकारुन अवपुंजन धोरणाला नियंत्रण करता येते.

**६) मुलभूत उद्योग उभारणी :**

अल्पविकसित व विकसनशील देशांना आर्थिक विकास करण्यासाठी मोठ्या व अवजड उद्योगांची उभारणी करणे आवश्यक असते. आयातीवरील अवलंबित्व या देशांना भविष्यात घातक ठरते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात का होईना मुलभूत उद्योगांची सुरुवात करावी लागते. त्यामुळे भविष्यात विकास करणे शक्य होते.

**७) सरकारी उत्पन्नात वाढ :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे दुहेरी लाभ होतो म्हणजेच आयात उद्योगापासून देशातील उद्योगाना संरक्षण मिळते. त्याचबरोबर जकातीपासून उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे निर्यात प्रोत्साहन धोरणामुळे निर्यातीत वाढ होते. निर्यातीपासून देशाच्या संपत्तीत वाढ होते.

**८) देशी बाजारपेठांचा विस्तार :**

परकीय देशातील वस्तूंवर प्रशुल्क जकाती आकारल्यानंतर देशी बाजारातील वस्तूंना संरक्षण तर मिळतेच त्याचबरोबर त्यांची मागणी वाढून बाजारपेठांचा विकास होतो.

### ९) सौदाशक्ती :

कोणताही व्यापार हा सौदाशक्तीद्वारे चालतो. आंतरराष्ट्रीय व्यापारही त्याला अपवाद नाही. जकाती आकारताना किंवा आर्थिक सहाय्य देताना सौदाशक्तीचा वापर केला जातो. त्यात देशाच्या आर्थिक क्षमतेचा विचार होतो.

### ब) आर्थिकेत्तर दृष्टीकोन :

१) देशाच्या संरक्षणावर देशाचे अस्तित्व असते. त्यासाठी संरक्षण साहित्य विदेशातूनच संपूर्ण आयात करणे योग्य असते. त्यासाठी आर्थिक घटकाशिवाय देश संरक्षण विचारात घ्यावे लागते.

२) सामाजिक, सांस्कृतिक जीवनमूल्यांचे अस्तित्व जोपासणे. उदा. हस्तकला, नक्षीकाम यांना संरक्षण देणे.

३) देशभावना म्हणजेच संपत्तीपेक्षाही देशाचे अस्तित्व जपणे, स्वतःच्या देशाबद्दल नेहमीच प्रेम असणे आवश्यक असते. राष्ट्रनिष्ठा सर्वात महत्त्वाची बाब मानली जाते.

४) समाजाला घातक ठरणाऱ्या वस्तू उदा. अमली पदार्थ, मादक द्रव्ये इत्यादी नियंत्रण करणे ही आर्थिक घटकापेक्षा महत्त्वाची मानके आहेत.

५) देशाचे अस्तित्व टिकवण्यासाठी देशाने आपले स्वतःचे वेगळेपण नेहमीच जपले पाहिजे. उदा. आहार, विहार, सवयी.

### ५) संरक्षित धोरणाच्या विरोधी युक्तिवाद (Argument against protection) :

संरक्षित व्यापार धोरण हे समर्थनीय आहे. या धोरणात कोणत्याही प्रकारचे दोष नाहीत असे नाही. या धोरणाचा अवलंब करताना त्यात काही चुकीचे समर्थन केले जाते. या धोरणाला विरोध दर्शविताना काही मुद्दे विचारात घ्यावे लागतात. संरक्षित व्यापारात अनेक नैसर्गिक बाबी बाजूला ठेवल्या जातात त्या ऐवजी परिस्थितीजन्य घटकांच्या आधारे निर्णय घेतले जातात.

### संरक्षित व्यापारी धोरणाच्या मर्यादा / दोष / विरोधी बाजूने युक्तीवाद :

### १) अकार्यक्षम उद्योगांचे अस्तित्व :

ज्या उद्योगांना परकीय स्पर्धापासून वाचवण्यासाठी संरक्षण दिले जाते ते उद्योग आपली कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करत नाहीत व अनेक वर्षे हे उद्योग आपली परकीय स्पर्धेतील कार्यक्षमता दाखवित नाहीत. बाजारपेठेतील अन्य उद्योगांशी स्पर्धा करण्याची आवश्यकता निर्माण न झाल्यामुळे देशांतर्गत उद्योगातील कामगारांच्या कार्यक्षमतेच्या वाढीस चालना मिळत नाही.

### २) एकूण जागतिक व्यापार कमी होतो :

आंतरराष्ट्रीय व्यापार जेवढ्या मोठ्या प्रमाणावर खुला असेल तेवढ्या मोठ्या प्रमाणात एकूण व्यापारात वाढ होतो. बंधने घातल्यामुळे व्यापारात घट होत जाते. प्रत्येक देशाने संरक्षणाचा वापर केला तर व्यापाराचे तत्व नष्ट होते. संरक्षित व्यापार धोरणाद्वारे देशात होणाऱ्या आयातीचे प्रमाण कमी करण्यासाठी आयातीवर जकातीसारख्या करांचे बंधन निर्माण केले जाते.

**३) उपभोक्त्याची आर्थिक पिळवणूक :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे व्यापारी संघ निर्मान होऊन किंमत व विक्रीवर नियंत्रण आणले जाते. दर्जा, किंमत व आवडनिवड या दृष्टीने उपभोक्त्यांची आर्थिक पिळवणूक होते.

**४) साधनसंपत्तीचा अयोग्य वापर :**

संरक्षित व्यापार धोरणामुळे तुलनात्मक लाभाचा विचार मागे पडतो व व्यापाराला कृत्रिम संरक्षण दिले जाते. या धोरणामुळे सर्व साधनसंपत्ती पूर्ण कार्यक्षमतेने वापरली जात नाही. काही साधनसंपत्ती वापरा अभावी वाया जाते. उदा. सरकारी उद्योगाची कार्यक्षमता पूर्ण वापरली जात नाही.

**५) आर्थिक विषमता वाढते :**

संरक्षित धोरणामुळे उद्योगांच्या अप्रत्यक्ष करांचा बोजा सामान्य ग्राहकावर पडतो तर प्रत्यक्ष करातून या उद्योगांना वगळले जाते. त्यामुळे गरीब व श्रीमंत यातील दरी रुंदावते.

**६) भ्रष्टाचाराला प्रोत्साहन :**

उद्योगाना संरक्षण प्राप्त झाल्याने कार्यक्षमता वाढविण्याऐवजी संरक्षण कायम ठेवण्याचाच प्रयत्न हे उद्योग करतात. त्यातून शासकीय पातळीवर भ्रष्टाचारास प्रोत्साहन मिळते.

**७) आंतरराष्ट्रीय संबंध :**

एका देशाच्या आयात बंधनाचा परिणाम दुसऱ्या देशाच्या निर्यातीवर होतो. त्यातून आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधात बिघाड होतात. सहकार्याची जागा संघर्षाने होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) संरक्षण धोरण म्हणजे काय ?
२) संरक्षण धोरणाचे विविध युक्तीवाद सांगा.
३) मुक्त किंवा खुला व्यापार धोरण म्हणजे काय ?

## ८.५ सारांश (CONCLUSION)

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे सहभागी देशांना फायदा होतो. तुलनात्मक खर्च लाभ हा उत्पादनातील खर्च गुणोत्तरावर अवलंबून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापारी धोरण अत्यंत आवश्यक असते. व्यापारी धोरण अवलंबल्यामुळे देशाच्या परकीय व्यापारामुळे लाभ होतो. व्यापारी धोरणात खुला व्यापारी धोरण व संरक्षित व्यापारी धोरणाचा प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यापार-

लाभावर होतो. विविध अर्थतज्ज्ञांनी खुल्या व्यापार व संरक्षित व्यापार धोरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधी युक्तीवाद केलेला दिसून येतो. भारतासारख्या विकसनशील देशात खुला व्यापार धोरणापेक्षा संरक्षित व्यापार धोरणाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते.

## ८.७ सराव प्रश्न (QUESTIONS)

१) आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ स्पष्ट करा.

२) व्यापारापासून मिळणाऱ्या स्थितीशील व गतीशील लाभांचे परिक्षण करा.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च-लाभाचे उपयोजन कोणत्या पद्धतीने केले जाते ?

४) टिप लिहा : आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्च-लाभाचे उपयोजन.

५) व्यापारी धोरण म्हणजे काय ? व्यापारी धोरणाचे स्थितीशील व गतिशील परिणाम स्पष्ट करा.

६) व्यापारी धोरणांच्या विविध परिणामांचा आढावा घ्या.

७) खुल्या व्यापारी धोरणाच्या बाजुने व विरोधात युक्तीवाद मांडा.

८) संरक्षित व्यापारी धोरण म्हणजे काय ? संरक्षित व्यापार धोरणाच्या समर्थनार्थ व विरोधी युक्तीवादाची चर्चा करा.

९) टिप लिहा : खुला व्यापार विरुद्ध संरक्षित व्यापार

❖❖❖❖

## प्रथम वर्ष कला शाखेतील अर्थशास्त्र अभ्यासक्रमांसाठी २०२०-२०२१ पासून सत्रांतीपरीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचा सुधारित नमुना

**परीक्षेचा कालावधी : ३ तास** **एकूण गुण : १०० (प्रती सत्र)**

**सर्व प्रश्नांना २० गुण आहेत आणि सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**
**प्रत्येक प्रश्नांत अंतर्गत निवड असेल.**

प्र. १ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण १) २० गुण
अ
ब
क

प्र. २ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण २) २० गुण
अ
ब
क

प्र. ३ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण ३) २० गुण
अ
ब
क

प्र. ४ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण ४) २० गुण
अ
ब
क

प्र. १ कोणतेही दोन प्रश्न सोडवा. (प्रकरण १,२,३,४ प्रत्येक प्रकरणातून एक प्रश्न) २० गुण
अ
ब
क

❖❖❖❖